साप्ताहिक

# माणूस


१५ सप्टेंबर ८४/२ रुपये



## 'डॉक्टर, मेक मी व्हर्जिन अगेन'

नवा डॉक्टरी धंदा

## एड्स - अमेरिकेतला नवा भस्मासूर



' मी झाडांच्या आणि जंगलांच्या राज्यात आपला पत्ताच गमावतो. कोयनाधरणापासून वासोटा, तापोळा हा प्रवास ' वनराणी ' लाँचमधून करण्याचा छंदच मला जडलेला असतो. ' शिवसागर ' च्या ५०० फूट ते १००० फूट खोलीच्या, ५ मैल रुंदीच्या, ४५ मैल लांबीच्या अफाट पाण्यामध्ये, सह्याद्रीच्या हिरव्याकंच सौंदर्याचा जणु रंग मिसळलेला असतो. या चौखूर उधळणाऱ्या हिरव्या रंगाचा अनेक पद्धतींनी वेध घेत मी रमत असतो. काश्मिरच्या चिनार व डाल सरोवरात शिकाऱ्यांतून फिरून आलेल्यांनी एकदा तापोळा ते कोयनानगर असा ' शिवसागरातून ' फेरफटका मारावा त्यांच्या सहज प्रत्ययाला येईल की, सह्याद्रीच्या कुशीतही एक आनंदाचा प्रचंड डोह विसावलेला आहे. अशा हिरव्या धुंदीत मी असताना, माझ्या हाती बदलीचा हुकूम येतो. बेचैनी वाढते.

आता इतकी वर्षे केलेल्या वासोटा जंगलातील प्रयोगांचं काय ?

पण बदलीचं ठिकाण बदलण्यासाठी कार्यालयाच्या पायऱ्या झिजवण्याऐवजी मी माझ्या वासोटा प्रयोगातील सहकाऱ्यांबरोबर ढेबेवाडी खोऱ्यातील तळमावल्याची वाट चालू लागतो.

वासोट्याने आम्हाला शिकवलं एकाकी जगणं ! वासोटा सांगतो– ढेबेवाडीचं पठार माझंच अंगण ! उचल हा बाडबिस्तरा. माझ्या या बाडबिस्तऱ्याबरोबर असतात माझे हिरवे सोबती. पोपटी पानांचा आंबा, पांढुरक्या शिटचा घेतलेली जांभूळ, अष्टांगांनी फुलणारा गुलमोहर, करवतीदात्यांचा निंब, टिकलीएवढ्या पानांचा चिंच, उंचेला सिल्व्हर ओक, वरवर पाहणारा निलगिरी आणि गडद पानांच्या सागाच्या खुंटी !

आणि ही दोन हजार बाळं घेऊन मी नागटेकडीवरील बरड माळावर रमू लागतो. त्या झाडांचं लाजणं, वाढणं, टवटवणं, रुसणं, आजारी पडणं सारं पहातो. तीही माझ्यावर प्रेम करीत विचारतात, 'गड्या, पाऊस संपेल,उन्हाळ्याची चाहूल लागेल ! मग करपणं, जळणं आमच्या भाळी लिहिलंय. इथे तर तुला प्यायच्या पाण्याचीही भ्रांत ! तर तू आम्हाला कुठून पाणी पाजणार ? '

उत्तराच्या शोधात मी चक्रव्यूहात भटकतोय. माझं अंतर्मन सांगतंय, ' एखादा वनप्रेमी रसिक नागटेकडीवरील माझ्या नव्या प्रयोगाला हिरवी दाद देईलच ! '

# वासोट्याचा हा हिरवा प्रयोग काय होता ?

**एका निसर्गप्रेमीच्या लेखणीतून उतरलेला वासोट्याच्या जंगलातला हिरवा सौंदर्याविष्कार ! आणि वासोटा प्रयोगातली हिरवी सतेज मनं !**

माणूस दिवाळी अंकात . . . .

साप्ताहिक

# माणूस

¤

**वर्ष : चोविसावे**

**अंक : सोळावा**

¤

**१५ सप्टेंबर १९८४**

**किंमत : दोन रुपये**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

¤

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**: पत्ता :**

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

**सुरेश नावडकर**

# सप्रेम नमस्कार..

¤ पुन्हा एकदा प्रतिक्रिया. आपले १ सप्टें ८४ पर्यंतचे सर्व अंक वाचले. 'सप्रेम नमस्कार 'मधील श्रीमती विनया खडपेकर यांचे पत्र वाचले. २८ जुलैच्या अंकातील 'फळ एक तपाचे' या दलितपँथर संबंधित लेखावरील सदर प्रतिक्रियेत त्यांनी इंग्रजी शब्दांना आक्षेप घेतला आहे. परंतु हे शब्द साम्यवादी पोथीतून जसेच्या तसे अपरिहार्यपणे येतात. तेच अधिक स्वाभाविक आहेत.

गैरकाँग्रेसवाद हा नकारात्मक आहे. त्याला विधायक पर्याय हवा आहे हे सर्वांना समजते आहे; परंतु कळतंय पण वळत नाही अशी अवस्था आहे तोपर्यंत कोण काय करणार? श्री. चरणसिंग यांना जाट लिडर म्हणणे त्यांच्या नेतृत्वाचा अपमान आहे, त्यांना यापुढे 'जागतिक नेता' म्हणायला हवे.

'अनुभव' या सदरात सौ. सुधा सोमण यांनी 'त्यांच्याशी कसं वागायचं?' हा प्रश्न उभा केलाय. आपत्ती आहे खरी; पण उत्तरही त्यांनी लेखाच्या शेवटी दिलंय! 'त्या क्षणी मनाचा कौल मिळेल तसं वागते.' हेच ते उत्तर आहे. नाही तरी ही निरनिराळी सोंगं माणसं काही हौसेने घेत नाहीत. पोटाची खळगी भरण्यासाठीच हे चालतं ना! मग आपल्याकडच्या चार चार पैशांनी, की जे गेल्यानं आपलं फारसं काही बिघडलेलं नसतं, आपल्या आयुष्याची परीटघडी काही बिघडलेली नसते. त्यांच्या पोटाची खळगी भरायला मदत होत असली तर एवढे मनाला लावून घेण्यासारखे काय आहे? हां, त्यांनी आपल्याला फसवलं ही एक दुखरी बोच रहाते हे मान्य; पण आपल्या आजच्या षंढपणाने जगत असलेल्या जीवनात किती तरी जणांकडून आपण नाही का फसवले, नागवले जात आहोत? त्यापेक्षा हे फसणं एखाद्या गरिबाच्या पोटापाण्यासाठी तरी कारणी लागलं असे म्हणावे आणि त्रास करून घेऊ नये हे बरे.

'कुंपण आणि आकाश' व 'गारांचा पाऊस' या दोन लेखमाला अनुक्रमे श्रीमती मंगला गोडबोले व श्रीमती शोभा भागवत यांनी साधारणपणे एकाच वेळी सुरू केल्या असाव्यात. दोन्ही विचारप्रवर्तक आहेत. पैकी 'कुंपण आणि आकाश'चा समारोप या अंकामध्ये होत आहे. या बावीस लेखांच्या प्रपंचात प्रामुख्याने मध्यमवर्गीय स्त्रीला जागृत करून तिचे स्वत्व तिने जपावे, नव्या सुयोग्य जाणिवांनी शृंखलारहित, स्वावलंबी, खऱ्या अर्थाने स्वतंत्र जीवन जगावे व जीवनाची खरी गोडी चाखावी, हा दृष्टिकोन त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगांच्या योगे मांडला आहे. मी हे सर्व लेख वाचले आहेत. त्यांचे स्वागतच आहे. जाता जाता कोणीही निसर्ग किंवा प्रकृति बदलू शकत नाही एवढे मात्र जरूर सांगावंसं वाटतं. याचा विस्तार करण्याची जरूर नाही. समारोपाचा हा लेख प्रामाणिक कथनामुळे हृद्य वाटला. शोभा भागवत याही थोड्याशा शब्दांत पण बरंच उपयुक्त सांगून जातात.

श्री. दि. वि. गोखले यांचीही प्रतिक्रिया वाचली. 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'वर त्यांनीच लिहावे असे मी या पत्राद्वारे त्यांना नम्रपणे सुचवीत आहे.

३१ जुलै ८४ **श्री. रमेश वामन परांजपे**

आपण आपल्या १६ जून ते ४ ऑगस्ट पर्यंतच्या अंकांमध्ये 'मन:चक्षूंचे सामर्थ्य' या विषयावर डॉ. किशोर फडके यांचे लेख प्रसिद्ध केले आहेत. याबद्दल मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो. यासारखे दर्जेदार लेख छापून आपण लोकांच्या ज्ञानामध्ये जी भर घातली ती अमूल्य आहे. यामुळे आपल्या साप्ताहिकाची प्रतिमा आणखी उजळेल.

७ ऑगस्ट ८४ **डॉ. वि. ना. देशपांडे**
**ठाणे**

¤ मी गेली १५ वर्षे 'माणूस' साप्ताहिक वाचत आहे. 'माणूस' इतका वाचनीय असतो की माझ्यासारख्याजवळ प्रशंसा करण्यास शब्द नाहीत. असेच वाचनीय अंक मिळावेत ही विनंती. दि. ४ ऑगस्ट १९८४ अंकातील मंगला गोडबोले यांचे विचार आवडले.

८ ऑगस्ट ८४ **काशिनाथ शं. शेटे**
**कोल्हापूर**

पुणे वार्ता

# समाजाला परवडणारे तंत्रज्ञ-डॉक्टर्स तयार व्हावेत

लोकशाहीमध्ये विचारस्वातंत्र्य आणि कृतिस्वातंत्र्य बहाल केलेलं असतं; पण पुणेकर यातील पहिल्या स्वातंत्र्याचा मनमुराद उपभोग घेतात. त्यामुळे हेमंत-व्याख्यानमाला आणि वसतव्याख्यानमालाच काय पण प्रत्येक ऋतूतच इथे वैचारिक पाऊस धो धो कोसळत असतो.

गणेशोत्सवामध्ये गायकवाडवाड्यात होणारा परिसवाद हा त्यापैकीच एक. एकाच विषयावर एकाच मताचे लोक बोलावले तरीसुद्धा जिथे खडाजंगी होते तिथे दोन गटच पडल्यावर काय होत असेल याची कल्पनाच केलेली बरी ! म्हणूनच वक्त्याचे विचाररण, सयोजकाची विषयाची आणि वक्त्यांची निवड आणि श्रोत्यांचा भरघोस प्रतिसाद याची श्रीगजाननाच्या साक्षीने होणारी जाहीर मैफल दरवर्षी खूपच रंगते.

पण या वर्षी काय झाले कुणास ठाऊक ! या वेळी या मैफलीला काहीशी समन्वयाची, एकमताची कळा आली होती. सगळे तारस्वरातले आवाज एकदम खालच्या पट्टीत आले होते. त्यामुळे आपण गायकवाडवाड्यातील परिसंवाद ऐकतो आहोत की भा. इ. सं. म. मधले निबधवाचन असा प्रश्न पडला. ५ व ६ सप्टेंबर या दोन दिवस 'विनाअनुदान महाविद्यालयाची गरज काय ?' या विषयावर सवाद झाला आणि बहुताश वक्त्यानी या महाविद्यालयाना कडाडून विरोध केला. डॉ. ह्. कृ. पराजपे अध्यक्षस्थानी होते.

सरकारच्या या सदर्भातील धोरणाला एकमुखी विरोध करताना, विनाअनुदान समर्थनार्थ माडले जाणारे सर्व मुद्दे या प्रसगी वक्त्यानी खोडून काढले. विशेषत: विना-अनुदान महाविद्यालयांच्या निमित्ताने एकंदरच शिक्षणपद्धतीचा आणि वैद्यकीय महाविद्यालयांच्या बाबतीत आपल्या आरोग्याबद्दलच्या स्थितीचा या वेळी विचार झाला.

सुरुवातीलाच अध्यक्षानी काही प्रश्न उपस्थित करून विषयाची रूपरेखा स्पष्ट केली. विना-अनुदान महाविद्यालयाची गरज का वाटू लागली ? आजचे शिक्षण तरी समतापूर्ण आहे का ? सर्वच शिक्षणसंस्थाना सरकारी मदत देणे योग्य की अयोग्य ? त्यानतर वैद्यकीय क्षेत्रातील व शिक्षणक्षेत्रातील वक्त्यानी आपले विचार माडले.

**डॉ. अरविंद पटवर्धन** : समाजाची गरज ओळखून अभ्यासक्रम आखला जात नाही. व्यावसायिक शिक्षण द्यायचे तरी कुणासाठी ? याचा पुनर्विचार करण्याची वेळ आलेली आहे. वैद्यकीय उपचारांचा आणि आरोग्याचा केंद्रबिंदू डॉक्टर नव्हे. राहणीमान सुधारण्याचे प्रयत्न हा आरोग्याशी सबधित सर्वात प्रमुख भाग आहे. १) कुपोषण २) दूषित पाणी हे दोन घटक ग्रामीण भागातील अनारोग्याला कारणीभूत आहेत आणि त्यासाठी शासन काय करीत आहे ह्याचा विचार झाला पाहिजे आजचे एम. बी. बी. एस. डॉक्टर क्षय आणि मलेरिया बरा करू शकत नाहीत. खरं तर मध्यम दर्जाच्या तंत्रज्ञाची विकसनशील देशाना आवश्यकता असते आणि मध्यम दर्जाच्या डॉक्टरांचीही. उच्च शिक्षित व्यावसायिक या समाजाला खरोखर परवडतात का? उच्च शिक्षण घेण्यासाठी सरकारचा खर्च आणि ते घेतलेल्यानी समाजावर लादलेला खर्च हा बोजा कशासाठी ?


**कु. सीमा पुंडले** : लोकसंख्येच्या प्रमाणात डॉक्टर्स हवेत म्हणून त्याचे घाऊक उत्पादन करण्याची जरुरी नाही. वर्गभेद वाढविणारी ही नवी महाविद्यालये तावडतोब बंद केली पाहिजेत. खाजगी सस्था म्हणे कार्यक्षम असतात म्हणून त्यांना परवानगी दिली जाते म्हणजे सरकारने अकार्यक्षमतेची जबाबदारी झटकण्याचाच हा प्रयत्न आहे आणि असे असेल तर सर्वच खाती देऊन टाकून राजकारण्यानी बाजूला व्हावे. आजचे शिक्षण तरी कुठे योग्य आहे ? असा युक्तिवाद केला तरी भ्रष्ट शिक्षणाच्या भ्रष्ट नकलेचे समर्थन होऊ शकत नाही.

इतरही वक्त्यानी याच मुद्द्यावर विना-अनुदान महाविद्यालयाना कडाडून विरोध केला. फक्त दोन विरोधी मुद्दे माडले गेले ते प्रा. प्रकाश जोशी व गो. कृ. कान्हेरे यानी माडले. जोशींचे म्हणणे असे की, कर्नाटकातले विद्यार्थी येथे येऊन व्यवसाय करतात त्यापेक्षा मराठी विद्यार्थी इंजिनियर झाले तर ते हवे आहे. सरकारी सेवामध्येही हे नवीन इंजिनियर पाहू शकतील. तर कान्हेरे यानी श्रीमंत–गरीब दरीच्या आक्षेपाबद्दल बोलताना 'श्रीमतानी काय घोडे मारले आहे ?' असा सवाल केला व ते म्हणाले, 'दारू आणि इतर तत्सम क्षेत्रात पैसा उडविण्यापेक्षा शिक्षणात पैसा उडविणे केव्हाही श्रेयस्कर आहे आणि हा पैसा समाजाच्या कारणीच लागू शकेल.'

या विरोधी मताना फारसा आधार आहे असे वाटत नाही. सत्तेवर नसलेल्यांची ज्याप्रमाणे सोय करण्याचे राजकारणात निरनिराळे मार्ग असतात त्याप्रमाणे श्रीमंत विद्यार्थ्यांची सोय लावण्यासाठी आणि संपत्तीचे एक साधन मिळविण्यासाठी ही महाविद्यालये काढली जात आहेत. डॉ पटवर्धन व डॉ. फडके यानी सागितल्याप्रमाणे समाजाला परवडणारे तंत्रज्ञ व डॉक्टर्स तयार व्हावेत. प्रत्येक खेड्यात आरोग्य–शिक्षक तयार करावा त्याला काही सामान्य रोगावरच्या उपाययोजनांची पूर्ण माहिती असावी.

हे सगळे विचारमंथन ऐकल्यावर प्रकर्षाने एक गोष्ट जाणवली की, शासनाचे कोणतेही नवे निर्णय वादग्रस्त आणि टीकास्पद बनत आहेत आणि याचे कारण कोणत्याही मूलभूत धोरणाची विशिष्ट ध्येयाने अमलबजावणी होत आहे असे दिसत नाही. या घिसाडघाईने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कोणताही धोरणात्मक भाग नाहीये. गेल्या ३५–४० वर्षांत सामाजिक-आर्थिक रचनेत चागला बदल करण्याचा काहीएक निश्चित प्रयत्न झाला असता तर ही वेळ आली नसती. लोकजीवनात भ्रष्टाचार हा शिष्टाचार झालेलाच आहे. विना-अनुदान महाविद्यालये अधिकृतरीत्या त्यात आणखी थोडी भर टाकताहेत एवढेच

—निरंजन



# मुंबापुरी

## □ मिसिंग यू बिटरली

मुवईत सध्या कुठेच मस्का मिळत नाहीये. इराण्याच्या हॉटेलातून आणि सामतांच्या दुकानातून लोणी–चक्का–तूप वगैरे मिळत असेल. आम्ही सागर, अमूल बटरचं सांगतोय. दहिसरच्या कांजरपाड्यापासून ते थेट कुलाब्याच्या पास्तालेनपर्यंत कुठेही विचारा अमूल मस्का मिळत नाही.

अमूल सागर हा सरकारी मस्का आहे. आता हा मस्का मिळत नाही याचा अर्थ सरकारी दरबारी आता नुस्ता मस्का लावून कामं होत नाहीत असा शेरा एकानं मारलाय हे ऐकून आम्ही अर्थातच सचित झालो आहोत. मस्का मिळत नाही इथपर्यंत ठीक आहे हो ! पण मस्का लावण्याचं महान ट्रेडिशन बंद होतंय असा जर याचा अर्थ असेल तर हे निश्चितच चिंताजनक आहे.

मस्का लावणे ही आमच्या देशाची मोठी प्राचीन आणि दैदीप्यमान अशी परपरा आहे. पूर्वीच्या काळी राजे-महाराजे स्तुतिपाठकाचा ताफा जवळ बाळगत असत. भर दरबारात नवाबांच्या आस्त्या खानदानाची प्रशसा करणारी कवन गायिली जात. महंमद शाह रंगील्याने तर आपल्याजवळच्या एका भाटाला सरसेनापती करून टाकला होता म्हणतात !

ही थोर परपरा पुढच्या काळात चालत राहिली. ज्या उत्तरप्रदेशात स्तुतिपाठकाना थांड म्हणून हिणवण्यात येते तिथेच ही परंपरा फोफावत राहिली. सजय गाधीचे जोडे आपल्या रेशिमकाठी धोतराने टिपणारे मुख्यमत्री उत्तरप्रदेशचेच बर ! पुढे अजय्याप्रभृतीनी दक्षिणेत हीच परपरा पुढे चालवली.

अशी ही दिव्य प्रथा पुढे कशी चालवावी याचा विचार करण्यासाठी वसतदादांनी एक समिती स्थापन करावी. हुसेन दलवाई, राममनोहर त्रिपाठी, मनोहरमामा फाळके वगैरेंना सदस्य करावे, अध्यक्ष म्हणून बाबूराव भापसे आहेतच, समितीच्या निमत्रक म्हणून इद्रायणी सावकार असो द्याव्यात. या समितीचे खास सल्लागार म्हणून खुशवंत सिंगना घेतल्यास उत्तम !

दरम्यान आम्ही 'लाइट ऑफ एशिया' मध्ये मस्का–पाव मिळतो किंवा नाही याचा शोध घेतो. अमूल–सागर मिळत नाही ना, म्हणून या इराण्याला किती मस्का लावावा लागतो खरच, अटरली बटरली अमूल, मिसिंग यू बिटरली !

## □ हिस्टेरिया !

आतरराष्ट्रीय कीर्तीचे संगीततज्ञ झुबिन मेहता पुढच्या आठवड्यात मुवईत येताहेत सगीतप्रेमी मुबईकराना याचा नक्कीच आनद होईल. सगीताच्या दुनियेत आपल्या नावाची पताका सर्वदूर फडकवणारे झुबिन मेहता खुद्द मुबापुरीचेच आहेत.

पण झुबिनच्या नावाने सध्या मुबईत अक्षरश. हिस्टेरियाच झालाय. प्रत्येकाला मेहताच्या कार्यक्रमाची तिकिट (हो तिकिट, तिकिट नव्हे) हवीहवीशी वाटताहेत. जेवढं तिकिट महाग तितकी मागणीही ज्यादा. नॅशनल सेंटर फॉर द परर्मोफिंग आर्टस्, टाइम अॅण्ड टॅलेण्टस् क्लब, काउन्सिल फॉर कल्चरल अफेअर्स या सगळ्या संस्थाचे कार्यकर्ते तर अक्षरश बेजार झालेत. जो तो तिकिट मागतोय. प्रेसवाले वेगळीच दादागिरी दाखवत बसतात. शेवटी असा एक प्रश्न मनाला शिवतो की, झुबिनच्या या कार्यक्रमाला येणाऱ्यांपैकी सगीताचे सच्चे दर्दी किती असतील अन् झुबिनला स्टेटस् सिबॉल मानणारे किती असतील ?

मुवईत पाश्चात्य सगीताचे रसिक आहेत. टाइम अॅण्ड टॅलेण्टस् क्लब, बाँबे मॅड्रिगल सिगर्स, एनसीपीए, मॅक्स मुल्लरभवन वगैरे सस्थानी पाश्चात्य सगीताचा ध्वज तेवत ठेवला आहे यात वाद नाही

परतु झुबिनच्या कार्यक्रमाला भाऊगर्दी करणारे लोक वेगळे आहेत. त्याच्या लेखी झुबिनचा कार्यक्रम ही एक इव्हेन्ट आहे. वॅग्नर, मोझार्ट आणि बेथवनशी काडीमात्र ओळख नसलेले बाजारबुणगे केवळ फॅशन म्हणून झुबिनच्या कार्यक्रमाला जाणारेत. त्याना झुबिन आवडतो अनुप जलोटाही चालतो. ताजमध्ये 'शमाखाना' असला तर तिथेही हे सफारी घालून असतात. कुमार गधर्वलाही गर्दी करतात. 'अर्धसत्य'ला भरभरून येतात अन् व पु. काळ्याच्या, पुलदेंच्या कार्यक्रमातही येऊन बसतात तेंडुलकराच्या प्रकट आत्मचिंतनालाही शबनम बॅग घेऊन येतात.

वर्तमानपत्रवाल्याचा ह्या सगळ्या चालूबाजीत सिंहाचा वाटा आहे. कुणालाही एका रात्रीत पर्सनॅलिटी करून टाकायच. भीमसेनजीच्या मैफलीला म्युझिकल हॅपनिंग म्हणायच अन् एक फीव्हर, एक लहर बाधून टाकायची. मूळ सगीत राहिल बाजूला, किशोरीची हेअरस्टाइल, कुमारजीच्या शालीवरचे भरतकाम आणि झुबिनच्या शिप्याच नावगाव यातच ही मॅगजिनवाली मडळी गुतून बसतात.

मागे एकदा झुबिन मेहता मुबईत आला होता झाली सतरा–अठरा वर्षं. झुबिनने त्या भेटीत आपल्या भायखळ्यातल्या सेंट मेरी शाळेला भेट दिली. त्या वेळी बीटल्सचा जमाना होता. मुलं कपाळावर साधनाकट केस ठेवत असत. पायबद तुमानं घालून गांज्याचे अड्डे शोधण्याचा तो काळ होता. झुबिन त्या वेळी आला अन् गेला ते कुणालाच कळलं नाही अन् आता......?

## □ निदान चहापानास . . . !

मुवई महापालिका बरखास्त झाल्यापासून हिमालयातील काळविटासारखे नगरसेवकाचे दर्शन दुर्लभ झाले आहे. त्यामुळे दर आठवड्याला टीका तरी कोणावर करायची असा आमच्यापुढे प्रश्न पडला आहे.

मुबापुरी आता संपूर्णपणे सुखथनकर, अफझलपूरकर आणि सोमण ह्या तीन शिलेदाराच्या (अलेक्झाडर ड्युमाचे नव्हेत !)

आधिपत्याखाली असली तरी कारभारात काही विशेष सुधारणा नाही. गल्लीबोळामध्ये अजूनही नेहमीसारखा कचरा साठतो आहे आणि दोन सरी जास्त पडल्या तर गटारे तुडुंब भरून वाहात आहेत. या बरखास्तीचा फायदा घेऊन बीइएस्टीच्या पु. वा. केरकरानी मात्र महिनाभरात दोनदा दरवाढ जाहीर केली. तिला असीरसाहेबानी तात्पुरता ब्रेक लावला आहे.

या बरखास्तीमुळे प्रशासकाचा लोकप्रतिनिधीशी संबंध पार तुटला आहे. यावर उपाय म्हणून सुखथनकरानी आता मुंबापुरीतील आमदाराना आणि खासदाराना दर आठवड्याला भेटण्याची योजना आखली आहे. ह्या सभा ते महापालिकेच्या सभागृहातच भरवितात. मात्र या सभांना नगरसेवकच काय पण पालिकेतील गटप्रमुख किंवा माजी नगरपित्यानाही निमंत्रण नसते पत्रकारानाही ह्या सभेत प्रवेश नाही. सुखथनकराना असे वाटते की, पत्रकार आले की हे आमदार आणि खासदार केवळ वृत्तपत्रासाठीच भाषणे करतील आणि मूळ प्रश्न बाजूलाच पडतील. शहराच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधीशी चर्चा आणि तीही महापालिकेच्या सभागृहात– मग पत्रकाराना विरोध कशासाठी ? महापालिका प्रशासकपालिकेला आणि मुंबापुरीला स्वतःची खाजगी मालमत्ता समजतात की काय, असा प्रश्न सर्व लोकहितवादी पत्रकाराना पडला आहे. सुखथनकरांच्या ह्या निर्णयामुळे वार्ताहरानी सध्या त्यांच्या ह्या सभानंतरच्या पत्रकार परिषदावर बहिष्कार घातला आहे. असो.

विघ्नहर्ता गणपतीचा उत्सव नुकताच संपला. आम्ही त्याच्यापुढेच साकडे घातले होते की, त्याने फील्डमार्शल द. म. सुखथनकराना सुबुद्धी द्यावी जेणेकरून ते पत्रकाराना कमीतकमी लोकप्रतिनिधीबरोबर चहापानास तरी सभागृहात बोलावतील.

—विष्णू जयदेव


राजहंसची दोन नवी विज्ञान प्रकाशने

## तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय

विज्ञानातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी
—तुम्हाला बिरबल बनवू शकणाऱ्या !
तुम्हाला माहीत हवेत, करता येतील असे अनेक गमतीदार वैज्ञानिक प्रयोग—
—तुम्हाला जादूगार बनविणारे !
आज अंतराळयुगात, साऱ्या विश्वात मानवाने केलेला मुक्त संचार.
जो तुम्ही समजावून घ्यायला हवा.
—नाहीतर तुमचा रिप व्हॅन विंकल बनेल !

□

## । विज्ञानेश्वरी ।

परग्रहावरून येणाऱ्या संदेशासारख्या अनेक नव्या गोष्टी
तुमचा मित्र बनून तुमच्या कानात सांगणारी !

विज्ञानेश्वरेतील कांही अध्याय आहेत—

* झोपा आणि विद्वान् व्हा.
* युरी गिलरला जमाल गोटा मिळतो त्याची गोष्ट
* पिरॅमिडचे गुपीत
* तुमच्या नशिबाचे गणित
* भेदिले सूर्यमंडळा...

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

लेखक : दत्तप्रसाद दाभोळकर
**किंमत : प्रत्येकी वीस रुपये**
रुपये चाळीस पाठवल्यास दोन्ही पुस्तके घरपोच मिळतील.

# ' आधुनिक कवितेतील प्रचलित प्रवाह ' चर्चा आणि चिंतनात रंगलेला परिसंवाद

दिल्लीतील वाय् एम्. सी. ए. सी.ची वास्तू छान प्रशस्त आहे वाय्. एम्. ए म्हणजे यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन. याच इमारतीत यूथ होस्टेल आहे अनेक परदेशी लोक इथे उतरतात. निरनिराळ्या देशांतील गौरकाय स्त्री-पुरुष इथे मजेत विश्राम करताना दिसतात डावीकडे मागील बाजूस खुले पटांगण आहे त्यासमोर स्टेज आहे. तिथे अनेक कार्यक्रम होत असतात. उजवीकडील [कोपऱ्यात एक मोठा कॉन्फरन्सहॉल आहे. एअरकंडिशन्ड. वरच्या मजल्यावरही एक कॉन्फरन्सहॉल आहे. तो भव्य, प्रशस्त आहे तिथेही एक स्टेज आहे. मागे डावीकडे मोकळा डायनिंगहॉल आहे बुफेसाठी.

या वरच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये नुकताच एक परिसंवादाचा कार्यक्रम झाला. ऑथर्स गिल्ड ऑफ इंडियाची दिल्ली शाखा आणि साहित्यकला परिषद यांच्या वतीने, एखाद्या विषयावर अनेक भारतीय भाषांतील अभ्यासपूर्ण निबंध सादर केले जातात. त्यावर वक्ता-अध्यक्ष आणि श्रोते यांच्यात भरपूर चर्चा होते वक्ता अभ्यासू असेल तर विचारलेल्या प्रश्नावर अनेक दृष्टींनी प्रकाश टाकू शकतो. प्रस्तुत परिसंवादाचा विषय होता ' आधुनिक कवितेतील प्रचलित प्रवाह ' आतापर्यंत या विषयावर दोन परिसंवाद झाले. सिंधी, मल्याळम्, बंगाली आणि मराठी, तमिळ, उडिया या भाषांतील कवितांचा त्यात परामर्श घेतला होता. गुजराती, आसामी नि तेलगू या भाषांतील कवितांवरील परिसंवाद म्हणजे याचा तिसरा टप्पा. या तीन भाषांतील कवितांमधील प्रचलित प्रवाहांवर निबंध सादर केले गेले

सकाळी ११ वाजता न्यायमूर्ती ओ. चिन्नाप्पा रेड्डी यांच्या हस्ते या परिसंवादाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम झाला अध्यक्षस्थानी होते दिल्लीचे चीफ एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर श्री. जगप्रवेश चंद्र. त्यानंतर चहापान झाले. दुपारी १२-३० वाजता डॉ. महेंद्र दवे यांनी आपला ' करंट ट्रेन्ड्स इन गुजराती पोएट्री ' हा निबंध वाचला ' लायब्ररी ऑफ काँग्रेस युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका 'मध्ये गुजराती विभागातील ग्रंथ-निवड-परीक्षणाचे काम पाहणारे श्री. दीपक मेहता हे अध्यक्षस्थानी होते. निबंधवाचनानंतर थोडीशी चर्चा होऊन १॥ वाजता भोजनासाठी मध्यंतर झाले. ऑथर्स गिल्डच्या दिल्लीशाखेचे सेक्रेटरी रिटायर्ड कर्नल गौतम शर्मा हे जातीने सर्व चोख व्यवस्था ठेवीत होते. या वयातही त्यांच्या ठिकाणी असलेला उत्साह, आवड, कामातील नेटकेपणा आणि तडफ पाहून फार कौतुक वाटले; भोजनाला ते सर्वांना हसतमुखाने आणि आग्रहाने नेत होते. त्यामुळे जेवणही प्रसन्न चित्ताने, गप्पा-टप्पात मजेत पार पडले, तासभर जेवण-विश्रांती आटोपून सर्वजण पेपरवरील चर्चेसाठी सुसज्ज झाले. २॥ ते ४॥ पर्यंत प्रश्नोत्तरे आणि चर्चा यांना चांगला रंग भरला.

डॉ. दवे यांच्या निबंधाचा सारांश असा—

' गांधीयुगातील समर्थ कवी श्री. उमाशंकर जोशी यांची सुप्रसिद्ध कविता ' हूँ छिन्न भिन्न छूँ ' १९५६ मध्ये प्रसिद्ध झाली आणि या कवितेपासूनच नवकवितेची सुरुवात झाली. १९३० मध्ये 'विश्वशांती 'ची कविता लिहिणारा हा कवी म्हणतो, ' मी छिन्न-विच्छिन्न झालो आहे. ' या महायुद्धोत्तर नवकवितेत हा ' मी ' कवितेच्या केंद्रस्थानी दिसतो. महायुद्धानंतरच्या भीषण आणि दारुण सामाजिक परिस्थितीत या ' मी ' चा देवावरील विश्वासही उडाला आहे निरंजन भगत या कवीने म्हटले की, प्रथम देवाच्या नावाला काट मारा या ' मी 'चा दुसऱ्या माणसावरील विश्वासही उडाला आहे. ' सर्व माणसे एकमेकांशी बोलतात; परंतु ते एकामेकाशी संभाषण करीत नाहीत ' असे या नवकवींना दिसून येते या ' मी ' चा स्वत वरील विश्वासही उडाला आहे ' मी भिंतीच्या दोन्ही बाजूंना उभा आहे आणि मी स्वत ला भेटू शकत नाही ' असे कवी सितांशु म्हणतात. लाभशंकर ठाकर यांनीही आपल्या कवितेत हाच प्रश्न उपस्थित केला आहे

## चर्चा रंगली

... यंत्रयुग, चाकोरीबद्ध शहरी जीवन, अणुबाँब, हिरोशिमाची शोककथा, भारताची फाळणी, महात्मा गांधींचा वध, भयानक सत्तापिपासा, दारिद्र्य यांनी अस्वस्थ झालेले संवेदनशील लेखक अनिश्चिततेच्या जगात ढकलले जात होते. यातूनच कवितेच्या नवतेने जन्म घेतला. भाषा, छंद आणि रचनेचे नवीन नवीन प्रकार या वेळी उदयास आले. ही नवकविता म्हणजे धुमसत्या ' मी ' चा मुक्त आविष्कार करण्याचा महान प्रयत्न होता. उमाशंकर जोशींपेक्षाही खऱ्या अर्थाने नव असलेला कवी म्हणजे श्री. सुरेश जोशी. त्याला सर्व सृष्टी विषमय वाटू लागते. चंद्र त्याला काळोखसर्पिणीचे अंडे भासू लागते— ' This full moon is an egg of the black she-serpant of darkness. ' सुरेश जोशींची प्रतिमासृष्टी व शब्दकळा नवीन आणि समृद्ध आहे.

...लाभशंकर ठाकर हे या नवकवितेच्या प्रवाहातील प्रमुख कवी. ' आभासी मृत्यूनो गीत ' लिहिणारा राजीव पटेल हाही नवकवीच. वयाच्या तिसाव्या वर्षीच मृत्यू पावलेला. सुप्त मनाच्या दुनियेला कविताबद्ध करणारे सितांशु यशश्चंद्र हे एक या काळातील समर्थ कवी. रमेश पारेख आणि अनिल जोशी हे थोर प्रयोगशील कवी, तर अदिल मन्सूरी, चिनू मोदी आणि राजेंद्र शुक्ल हे प्रयोगात्मक गझलकवी होत.

... गुजराती नवकवितेवर फ्रेंच कवी बॉद्लेअर, जर्मन कवी रिल्के, स्पॅनिश कवी लोर्का आणि इंग्लिश कवी टी. एस्. इलियट यांचा प्रभाव अनेक बाबतीत पडला होता. प्रतीकात्मता, कल्पकता आणि वस्तुनिष्ठ संबंध हे त्यातील काही प्रभावी घटक. या घटकांचा प्रभाव असला तरी गुजराती कविता तशी स्वतंत्र आहे. ती अनुकरणात्मक नाही '

या निबंधावर अनेक प्रश्न उपस्थित केले

गेले 'या काळातील गुजराती कवयित्री कोण ?' या डॉ अवतार पेन्नाथूर नामक मानसशास्त्रज्ञ स्त्रीच्या प्रश्नाला उत्तर देताना डॉ दवे म्हणाले की, गाधीकाळानतर काही स्त्रिया कविता लिहू लागल्या. अध्यक्ष मेहता म्हणाले, 'तत्कालीन सामाजिक परिस्थिती फारशी अनुकूल नसल्यामुळे त्या काळातील स्त्रियाना काव्यलेखनातील उंची गाठता आली नाही पुरीबाई, दिवाईबाई याचे त्या काळातील लेखन 'याही थोड्या फार लिहीत असत ' ( They also ran ') या प्रकारचे होते पुढे पुडलिका तापडियासारखी कथा-लेखिका मात्र चागल्या प्रकारचे लेखन करीत होती.

दिल्ली युनिव्हर्सिटीतील तमिळचे रीडर डॉ. बालासुब्रह्मण्यम् यानी एक आक्षेपपर प्रश्न विचारला. 'नवकवींनी शब्दाना अर्थापासून मुक्त करण्याचा प्रयोग केलेला आहे.' या. डॉ. दवे याच्या विधानावर आक्षेप घेताना ते म्हणाले की, 'अर्थसमुच्चय मनात निर्माण झाला की, शब्द अवतरतात. मग शब्द हे अर्थापासून वेगळे होऊ पाहतात या म्हणण्याला काही अर्थ नाही.' यावर डॉ. दवे यानी म्हटले की, काही शब्द हे निरर्थक असतात; परतु कवितेच्या सदर्भात त्याना अर्थ प्राप्त होतो. सिताशूच्या कवितेतील एक उदाहरण देऊन त्यानी सागितले की, यंत्र-युगात मनुष्याचा आत्मा कसा चिरडला गेला आहे, याचे चित्र उभे करण्यासाठी कवीने 'टॅक, बॅक हॅक... कक्' असा शब्दसमुच्चय वापरला. तथापि यातील पहिला शब्द सोडला तर बाकी शब्दाना स्वतत्रपणे अर्थ नाही. फक्त ते सर्व शब्द मिळून चिरडण्याची कल्पना व्यक्त होते.

याचे अधिक स्पष्टीकरण करताना डॉ. निशिकात मिरजकर म्हणाले की, 'कवितेतील शब्दाना सूचकार्थ किंवा व्यग्यार्थ असतो. कवी कुठल्या तरी अनुभवाच्या शोधात असतो. हा अनुभवाचा शोध म्हणजे कविता असते. विजय कारेकराची 'एक' ही कविता उदाहरणादाखल घेऊन 'एक' या शब्दाच्या आवर्तनानी व्यक्तित्व-शून्य माणसाचा समुदाय कसा व्यक्त झाला आहे आणि शेवटी 'च्यायला, एक कुठे गेला ?' असा प्रश्न विचारताना या यात्रिक जीवनपद्धतीत जगणारामध्ये 'स्व'चे अस्तित्व कसे हरवून गेले आहे, याची तीव्र जाणीव कवी व्यक्त करतो, हे त्यानी स्पष्ट केले. 'एक' या शब्दाचा अर्थ येथे रूढार्थापेक्षा किती वेगळा आहे आणि केवळ चार शब्दानी गुफलेल्या या कवितेचा आशय कसा व्यापक आहे, याचे त्यानी विवेचन केले. विजय कारेकराची ही कविता अनेक श्रोत्याना खूप आवडली

सध्याकाळी ४॥ पर्यंत चर्चा चागली रगली. अध्यक्ष मेहता यानी परिसवादाचे सचलन उत्कृष्ट केले. त्याची अभ्यासू, समतोल विचारपद्धती त्याच्या बोलण्यातून दिसून येत होती चहापानानंतर पहिल्या दिवसाचा कार्यक्रम सपला

दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम सकाळी १० वाजताच सुरू झाला आसामी कवितेवरील पेपर प्रख्यात साहित्यिक श्री नवकात बारुआ वाचणार होते तथापि आसाममधील महापुरामुळे ते दिल्लीला येऊ शकले नाहीत. त्यानी पोस्टाने पाठविलेला पेपरसुद्धा सयोजकांना मिळू शकला नाही. तेव्हा त्यांच्याऐवजी ऐनवेळी श्री ठाकूर यानी त्या विषयावर आपली टिपणे वाचली. त्यावर चर्चा झाली नाही.

दुपारी १२ वाजता तेलगू कवितेवर डॉ. आय्. पाडुरगराव यानी आपला निबंध वाचला. डॉ पाडुरगराव हे लोकसेवा आयोगाच्या हिंदी विभागाचे डायरेक्टर असून तेलगू, हिंदी आणि इग्लिशमध्ये त्यानी सुमारे ४० ग्रथ लिहिले. त्याचा निबंध खरोखरीच उत्कृष्ट होता. अध्यक्षस्थानी दिल्ली विद्यापीठातील तेलगूचे प्राध्यापक श्री. वीरेशलिंगम् होते

## एकाच प्रेरणेचे पडसाद

डॉ. पाडुरगराव यानी आपल्या निबधाच्या सुरुवातीलाच कवितेचे नेमके स्वरूप आशयगर्भ शब्दात व्यक्त केले. 'Poetry is the language of the soul, while prose reveals the soul of language. One is mystic by nature and the other one is realistic in form and expression...Modern poetry, in almost all the Indian languages including Telugu, seems to have chosen a mean between the two to fit into the pattern which can be turned neighter prosaic nor poetry. It combines in it the best of the both. आपल्या गूढ आणि भौतिक अनुभवाचा आविष्कार करण्यासाठी नवकवितेचे हे माध्यम आपल्याला आदर्श वाटले अनुभवाची विविधता आणि नवता ही नवकवितेची नजरेत भरणारी दोन वैशिष्ट्ये गेल्या २०–३० वर्षांत तेलगू काव्यात जेव्हा नवा प्रवाह दिसून येत होता, त्याच वेळी अभिजात काव्येही निर्माण होत होती. 'आद्यपुराणम्', 'जनप्रिय रामायणम्', 'रघुनाथीयम्' आणि 'पोतनाचरित्रम्' ही पारपारिक पद्धतीची अभिजात काव्ये एकीकडे तर दुसरीकडे अत्याधुनिक क्रातिकारक कविता 'मंतर' मानवडु' (ज्वाला आणि मानव), 'तिमिरम् तो समरम्', 'तिमिरद्वद्व', 'गुडिसेलु कलिपोटुन्नयि' (झोपड्या पेटत आहेत) आणि दिगबरपथाच्या कवीच्या खुल्या परतु सुदर कविताही त्याच वेळी निर्माण होत होत्या या दोन टोकाच्या कवितावरोबरच तेलगू भाषेत काही उत्कृष्ट भावगीते, चित्रपटगीते, यात्रिकगीते इत्यादी प्रकारच्या कविताही उदयास आलेल्या दिसतात नवकवितेत मुक्तछद, मुक्तके याचा वापर दिसून येतोच. त्याचबरोबर विषयातही विविधता दिसते दैनदिन जीवनातील सामान्य विषयापासून ते विश्वाच्या अंतिम सत्यतत्त्वात विलीन होण्यापर्यंतचे विषय त्यात आढळतात

गुर्झार व्यकट अप्पाराव या कवीने (१८६२ ते १९१५) तेलगू कवितेत बोलीभाषा आणि नवीन वृत्ताचा वापर करण्यास सुरुवात केली. नारायण बाबू, मुदू कृष्णा यानी विषयातही नाविन्य आणले. कवी श्री श्री याच्या 'महाप्रस्थानम्'च्या लोकप्रिय काव्यरचनेने तर जुन्या काव्याची कोडीच फोडली. अनेक कवयित्रीही वास्तवदर्शी कविता लिहू लागल्या. १९४५ मध्ये 'अभ्युदय रचयितालासगम' नामक प्रगतिशील सस्थेची स्थापना झाली हळूहळू तिने क्रातिकारी रूप धारण केले आणि तिचे 'विप्लव रचायतासगम'मध्ये रूपातर झाले. परिणामत सतप्त तरुण कवीचा पुराणमतवादी, सनातनी वर्गाशी प्रकट संघर्ष सुरू झाला. कुदुरी कवीने मुक्तछंदाची प्रतिष्ठापना केली. कविता ही हृदयाहृदयाचा सवाद साधणारी, थेट, साधी सरळ असली पाहिजे.

अभिजात, सौंदर्यवादी, प्रागतिक, क्रातिकारक, नेमस्त असे विविध प्रवाह एकाच वेळी विकास पावत असताना, स्वत.ला

'दिगंबरकवी' म्हणवणाऱ्या सहा कवींचा एक गट तेलुगू काव्यात धडाक्याने अवतरला. नग्न मुनी, निखिलेश्वर,' ज्वालामुखी, करवंद राजू, भैरवय्या आणि महास्वप्न या त्या सहा कवींनी, आपल्या काव्यातून भ्रष्ट समाजाच्या वास्तवाचे उघडे-नागडे चित्रण केले. लौकरच पैंगंबरकवी नामक दुसरा गट जुलै १९७० मध्ये अस्तित्वात आला. सुगमबाबू, देवीप्रिय, किरणबाबू, कमलाकांत आणि ओल्गा या ५ कवींनी हा गट स्थापन केला. त्यांच्या कवितेने क्रांतीच्या वाटेने सुधारणेचा पुरस्कार केला. मात्र तेलुगू कवितेत एकाच वेळी भिन्न भिन्न प्रवाहांच्या कविता निर्माण होत असणे हे आविष्काराचे निरोगी लक्षण आहे. औद्योगिक विकास आणि शास्त्रीय प्रगती यांच्या या काळात काव्य निरर्थक ठरेल अशी भीती काहीजणांना वाटते. तथापि तेलुगू काव्याचे सद्यःकालीन चित्र पाहता ही भीती निरर्थक आहे असे म्हणावे लागेल.'

पेपरवाचनानंतर थोडी चर्चा झाली. नंतर १ ते २ लंचब्रेक होता. विविध रुचकर पदार्थांनी भोजन समृद्ध होते. २ ते ४ पर्यंत चर्चा चांगली झाली. अनेकांनी पेपरची प्रशंसा केली. आधुनिकतेचा आणि धर्माचा काही संबंध आहे का? क्रांतीमध्ये स्त्रियांनी भाग घेतला होता का? इत्यादी प्रश्न विचारले गेले. तेलुगू काव्यातील नाद-सौंदर्य जाणवून देण्यासाठी डॉ. पांडुरंगरावांनी एका तेलुगू पार्श्वगायकास तेलुगू कविता गायला सांगितले; परंतु निबंधावरील चर्चेच्या वेळीही पुन्हा त्या गायकाने चर्चेत भाग घेताना गाणे म्हणण्यातच अधिक वेळ घालवला. श्रोत्यांना त्याचे हे अनौचित्यपूर्ण वर्तन आवडले नाही.

४ ते ५ समारोपाचा कार्यक्रम झाला. समारोपाचे भाषण दिल्ली विद्यापीठातील हिंदी विभागाचे निवृत्त विभागप्रमुख डॉ. नगेंद्र यांनी केले. अध्यक्षस्थानी शिक्षणखात्याचे सचिव श्री. एम. सी. वर्मा होते. सर्वच भारतीय भाषांमधील काव्यात प्रचलित प्रवाह सारख्याच स्वरूपाचे आहेत, एकाच प्रेरणेचे पडसाद भारतभर सर्वत्र थोड्याफार फरकाने उमटलेले आहेत, हेच या परिसंवादातून जाणवले.

—ललिता मिरजकर

## स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया

३८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त यंदा एक महत्त्वपूर्ण प्रदर्शन दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागाराने भरविले होते. या प्रदर्शनाचा विषय होता— 'स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया.'

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदर जवळजवळ १२३ वर्षांपासून स्त्रिया देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. त्या काळी समाजात स्त्रीला स्वतंत्र स्थान नव्हते. अनेक अनिष्ट प्रथा समाजात होत्या. बुरसटलेल्या विचारांचा पगडा समाजावर होता. अशा स्थितीत कसलीही पर्वा न करता देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक भगिनींनी आपले बलिदान केलेले आहे.

ह्या लढ्यातील कित्येक स्त्रिया तर अज्ञातच आहेत. त्यांची कुणाला माहितीही नाही. अशा या वीरांगनांची माहिती गुप्त अहवाल, सरकारी गॅझेटमधील मजकूर, त्या वेळच्या वर्तमानपत्रांची कात्रणे, काही पत्रे, ब्रिटिश सरकारने काढलेले हुकुमनामे या वीरांगनांनी सरकारला लिहिलेली पत्रे, अशा अनेक दस्तैवजातून व अनेक दुर्मिळ छायाचित्रांतून स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांची माहिती या प्रदर्शनात मांडली होती.

प्रदर्शनाची सुरुवात कित्तूरची राणी चेन्नमापासून झाली. १८२४ मध्ये राणी चेन्नमाने दक्षिणेचा कमिशनर विल्यम चॅपलिन यांना पत्र पाठवून कळविले होते की, 'आम्ही लढाईच्या विरुद्ध आहोत. तुमच्याकडून लढाईची सुरुवात झाल्याशिवाय आम्ही पुढे येणार नाही!' चेन्नमाने कमिशनरला लिहिलेले हे पत्र व राणीचे घोड्यावरील व समाधिस्थ असे छायाचित्रही प्रदर्शनात होते.

राणी जिंदल कौर, बेगम झीनत महल, अवधची बेगम हजदतमहल, झाशीची राणी लक्ष्मीबाई या १८५७ च्या वीरांगनांच्या सहभागाचा आलेख अनेक दस्तैवजांतून मांडला होता. हजरत महलने १८५७ मध्ये शहाजहानपूर व पीलीभीतवर आक्रमण झाले असताना सामना कसा करायचा याबद्दल इन्तझाम—



नानासाहेब पेशवे यांच्या मैनादेवी या मुलीला ब्रिटिशांनी जिवंत जाळले

उल–दुलाह याला पत्र पाठवून काही सूचना केल्या होत्या. ते पत्र व या बेगमाची छायाचित्रेही तेथे माडली होती

राणी लक्ष्मीबाईंच्या हालचालीसबधी माहिती देणाऱ्या गुप्त पत्रव्यवहारात जालानच्या ताईबाई व गोरखपूरच्या राणीचा उल्लेख होता. राणीच्या मृत्यूसंबधी व शौर्यासंबधीची पत्रेही प्रदर्शनात होती. बहादूरशहा जफरची पत्नी बेगम झीनत महलला आणखी चारजणींबरोबर रंगूनला हाकलून दिल्याचे गव्हर्नरजनरलचे एक पत्र आणि नानासाहेब पेशव्याची मुलगी मैनादेवीला जिवत जाळले ह्यासबधी माहिती असणारे त्या वेळी छापलेले एक पुस्तक व मैनादेवीचा दुर्मिळ फोटोही ह्यात होता.

प्रदर्शनातील दुसरा टप्पा कॉंग्रेसपासूनच्या इतिहासाचा होता. १८९० मध्ये प्रथमच स्त्रियाचा एक गट कॉंग्रेसअधिवेशनाला हजर होता आणि त्यात कादंबिनी गागुली ह्या महिलेने फिरोजशहा मेहताचे आभार मानण्याचे भाषण केल्याचे कॉंग्रेस पत्रिकेवरून दाखविले होते.

रवीद्रनाथ टागोराची भाची सरलादेवी घोषाल यानी नामदार गोखल्याना त्याच्या कार्यासबधी प्रशसा करणारे एक पत्र पाठवले होते. क्रातिकारी विचार असणाऱ्या ह्या महिलेने शारीरिक शिक्षण देण्यासाठी क्लब सुरू केल्याचे व 'लखीर भडार' नावाचे स्वदेशी मालाचे दुकान कलकत्त्याला काढल्याचे स्टीव्हन्सन मूर ह्या पोलीसअधिकाऱ्याने आपल्या गुप्त पत्रात नमूद केल्याचा दस्तऐवजही प्रदर्शनात माडला होता.

देशाच्या स्वातत्र्यलढ्यात स्वकीयाबरोबर परकियानीही भाग घेतल्याचे दाखले, पत्रके, पत्रे व त्याची भाषणे असलेली वर्तमानपत्राची कात्रणे माडली होती. १९०२ मध्ये मादामकामा यानी पॅरिसच्या जागतिक परिषदेत तिरगी झेंडा प्रथम फडकविला. ह्या तिरगी झेंड्यावर 'वदे मातरम्' लिहिलेले होते व सूर्य–चद्र, तारे काढलेले होते. अॅनी बेझान्ट' भगिनी निवेदिता व मार्गारेट कझिन्स ह्यानी स्वातत्र्यलढ्यात कसा भाग घेतला होता तेही सुरेख माडले होते.

क्रातिकारकाच्या माताचा स्वातत्र्यलढ्यातील सक्रिय सहभाग दाखविणारा हा प्रदर्शनी विभाग विशेष उल्लेखनीय आहे. इंदोरच्या रीजटने गव्हर्नरजनरलला पाठविलेल्या एका गुप्त पत्रात म्हटले होते की, 'अलीबधूची मातोश्री भोपाळला आल्यावर तिचे लोकाकडून भव्य स्वागत झाले.' तसेच भगतसिग, चद्रशेखर आझाद आणि राजगुरु याना लाहोर जेलमधून पळून जाण्यासाठी सुखदेवच्या आईने मदत केल्याचाही रिपोर्ट थक्क करणारा होता!

महात्मा गाधीच्या समकालीन अनेक महिलाचा उल्लेख ह्या प्रदर्शनात केला होता. ह्या अलीकडील काळातील सर्व भगिनी परिचित आहेत कस्तुरबा गाधी, स्वरूपरानी नेहरू, विजयालक्ष्मी पडित, कमला नेहरू, सरोजनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, अरुणा असफअली ह्याच्याव्यतिरिक्त अपरिचित भगिनी म्हणजे 'मातगिनी हाजरा' ह्याचा मृत्यू पोलिसांच्या गोळीबारात हातात तिरंगा घेतलेल्या अवस्थेत १९४२ मध्ये झाला. स्त्रियांनी दारूबदीसाठी कसा लढा दिला ते वर्तमानपत्रातील व सरकारी कागदपत्रातील मजकूर व छायाचित्रावरून दाखविण्यात आले होते. कीकडाच्या सुबम्माला पकडल्याचे व एक वर्षाच्या कैदेनतर सोडल्याचे वर्तमान दाखविणारे 'हिंदु' चे कात्रणही यात होते.

नेताजी सुभाषचद्र बोस याच्या आझाद हिंद फौजेतील राणी झाशी रेजिमेन्टचे नेतृत्व करणाऱ्या कॅप्टन लक्ष्मीचाही आलेखाद्वारे व काही छायाचित्रांद्वारे उल्लेख होता.

'स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया' हे प्रदर्शन माडण्यामागचा आयोजकाचा हेतू स्तुत्य आहे. हे प्रदर्शन पाहताना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. त्या अशा की, प्रदर्शनाचे दोन भाग आहेत. एक कॉंग्रेसस्थापनेपूर्वीचा व दुसरा कॉंग्रेसस्थापनेनतरचा. ह्या दोन्ही भागात समतोल राखलेला नाही. कॉंग्रेसस्थापनेनतर देशाला स्वातत्र्य मिळेपर्यंत स्वातत्र्यलढ्यात भाग घेणाऱ्या भगिनीबद्दल माहितीही जास्त आहे व छायाचित्रेही जास्त आहेत.

इग्रजापूर्वीही हा देश गुलाम होता, त्या वेळी देशातील प्रत्येक प्रातातून अनेक भगिनींनी देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्राण पणाला लावले होते. त्या अज्ञात आहेत. हे प्रदर्शन राष्ट्रीय पातळीवर असल्यामुळे आयोजकानी अशा सर्व वीरागनाची माहिती गोळा करून त्यासबधीचे दस्तैवज प्रदर्शनात माडावे आणि हे प्रदर्शन देशभर दाखवावे त्याखेरीज हे प्रदर्शन परोक्षपणे प्रचारकी थाटाचे आहे हा आक्षेप दूर होणार नाही.

–सौ. प्रज्ञा तपस्वी


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

डॉ. आयडा स्कडर
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो सत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे प्रेरणादायी
चरित्र.

एक होता कार्व्हर
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# औपचारिकतेतूनच लोकशाही हुकुमशाहीत परावर्तित होईल

बाबुराव चंदावार

दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुका या वेळी पुन्हा होतील (किंवा होणारही नाहीत) त्या होतील असे गृहीत धरूनच सध्या देशातले वातावरण तयार होत आहे ते व्हायलाही पाहिजे कारण लोकशाहीमध्ये निवडणुकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे म्हणून विधानसभा, लोकसभेसाठी मनाजोगे प्रतिनिधी निवडण्यासाठी राज्यघटनेने पुरस्कृत केलेला व लोकाना प्राप्त झालेला अधिकार वापरण्याची दर पाच वर्षांनी एकदा येणारी सधी ही लोकशाहीच्या सदर्भात पवित्र कर्तव्य बजावण्याचीच मानली जाते

अर्थात भारतीय राज्यघटनेला अनुसरून निर्माण झालेल्या लोकशाहीच्या राज्यकारभारातून व निवडणुकातून लोकशाहीविषयक पवित्र कर्तव्याचा नि शक अर्थबोध गेल्या चौतीस वर्षांत ( शक्य ) झाला आहे, असा निष्कर्ष काढण्याचे धैर्य मात्र कोणालाही होणार नाही कारण निवडणुका व सर्व स्तरावर चाललेला लोकशाहीचा राज्यकारभार हे दोन्ही लोकाना समाधान देऊ शकलेले नाहीत. सतत खदखदत राहिलेल्या व सध्या खदखदत असलेल्या असतोषाच्या वातावरणावरून तरी याचे प्रत्यतर येत आहे—आले आहे या वेळी हा असतोष पराकोटीला पोचलेला दिसतो इतका की देशात सर्वत्र व्यापून उरलेल्या हिंसाग्रस्त परिस्थितीत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्यासाठी सरळसरळ सेनेचा अनिर्बंध उपयोग केला जात आहे परकीय आक्रमणापासून देशाचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्या सेनेवर आहे ती सेना अतर्गत स्थितीतली हिंसा शमविण्यासाठी वारवार वापरली जात आहे तरीही हिंसा शमण्याऐवजी अधिकच प्रस्फोटक झाली व होत आहे यावरून देशातला असतोष अत्युच्च शिखरावर पोचलेला आहे हे सिद्ध करणे सहज शक्य झाले आहे. असे असताना निवडणुका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी व लोकशाहीचा राज्यकारभार निर्धास्तपणे चालविण्यासाठी, निवडणुकात सहभागी होऊन आवश्यक ते पवित्र कर्तव्य करण्याची स्वयस्फूर्त इच्छा लोकात खरोखरच शिल्लक उरत असेल असे का मानायचे ? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने स्वत च शोधायला हवे आहे कारण या प्रश्नाचे उत्तर इतर कोणीही देऊ शकणार नाही आणि जे इतर उत्तर देतील ते खरे उत्तर देणारही नाहीत असेच मानले पाहिजे अर्थात खरे उत्तर न देणे ही शुद्ध फसवणूकच असते – आहे ती वारवार होत आलेली आहे या फसवणुकीतून सुरक्षितपणे बाहेर पडावयाचे, हा निश्चय लोकानी केल्यास ते निश्चितच बाहेर पडू शकतील आणि बाहेर पडून त्याना लोकशाहीविषयक करावयाचे पवित्र कर्तव्यही ते करू शकतील ही फसवणूक नेमकी कशा कशा बाबतीत होत आहे हेच प्रथम लक्षात घ्यायला हवे आहे. हे लक्षात येण्यावरच बाकीचे सर्व लक्षात येणे शक्य होऊ शकणारे आहे.

## राज्यघटना व इच्छाशक्ती

लोकशाहीची राज्यघटना म्हणून जे काही अस्तित्वात आहे, तेवढ्याने लोकाना लोकशाहीची हमी देता येणे शक्य झाले आहे असा एक भोळसट समज बहुतेक सर्व हळव्या लोकशाहीवाद्याचा झालेला आहे यामुळे लोकशाहीची राज्यघटना, लोकशाहीची प्रेरणा सुरक्षित करण्यास पुरेशी पडत नाही, आजवर पुरेशी पडलेली नाही या वास्तविक स्थितीचे भान या लोकशाहीवाद्याना एकदाही झाले नाही—अद्याप होतही नाही लोकशाहीची प्रेरणा ही लोकाच्या इच्छाशक्तीतून निर्माण झालेली असते, असू शकते. ही इच्छाशक्ती मुळात नसल्यास लोकशाहीच्या दृष्टीने राज्यघटना ही निरुपयोगीच ठरत असते चलाख राजकारणी राज्यघटना निरुपयोगी ठरवीतही असतात तेव्हा लोकशाहीच्या इच्छाशक्तीचाच खरा प्रश्न आहे ही इच्छा लोकात शक्तिरूपानेच असावी लागते म्हणजे इच्छाशक्ती प्रभावी जाणिवेतून येत असते—यायला हवी आणि ती लोकाचीच असावयालाही हवी तेव्हा लोकशाहीच्या इच्छाशक्तीला फुलविणारी जाणीव व लोकशाहीची राज्यघटना या दोहोमधल्या फरकामधली मौलिकता लक्षात न घेण्याची चूक लोकशाहीवाद्याकडून अनवधानाने घडत असते (सत्तालोलुप चलाख राजकारणी अवधान ठेवूनच ही चूक करतात ) यामुळे राज्यघटनेविषयीची हळवी आस्थाच तेवढी या लोकशाहीवाद्याजवळ शिल्लक राहू शकते व लोकशाहीच्या जाणिवेची शक्तिरूपात वाढ करणे कमी महत्त्वाचे ठरते लोकशाहीची उपलब्ध असलेली राज्यघटना निरर्थक ठरविण्याच्या हेतूने या ठिकाणी लोकशाहीच्या जाणिवेचा प्रश्न लक्षात घेणे मला अर्थातच अभिप्रेत नाही राज्यघटनेमुळेच केवळ लोकशाहीची जाणीव सुरक्षित करणे व ती वाढीला लावणे शक्य आहे असा जे दुराग्रह बाळगतात त्याच्या अज्ञान-अध काराचे वस्तुनिष्ठ दिग्दर्शन करणेच केवळ या ठिकाणी मला अभिप्रेत आहे अर्थात लोकशाहीची राज्यघटना लोकशाहीला सहाय्यभूत होऊ शकते, पण ती लोकशाहीची प्रेरणा जनमानसात फुलवू व टिकवू शकते असे म्हणता येत नाही

राज्यघटनेत अतर्भूत असलेली लोकशाही व लोकाच्या प्रेरणेची लोकशाही असा फरक करूनच लोकशाहीच्या भवितव्याचा विचार करायला हवा. याविना तिचे भवितव्य सुरक्षित व्हायचेच नाही आणि असा फरक करून विचार केल्याशिवाय आजच्या एकूण लोकशाहीवरील सकटाचा अर्थही लावता येणार नाही

## सत्ताधाऱ्यांना सुवर्णसंधी

राज्यघटनेतून लोकशाहीच्या औपचारिकतेचा विस्तार केला जातो. औपचारिक ससदीय कार्यपद्धती यातूनच अस्तित्वात येत असते—आली आहे या औपचारिकतेला जे अपरिहार्यपणे महत्त्व येते ते लोकशाहीचेच महत्त्व असते, असा खुळेपणा लोकाना जोपा-

सण्यास भाग पाडण्याची किमया करणे औपचारिकतेला शक्य होत असते म्हणून औपचारिकतेला भाळूनच लोकशाहीचा विचार करण्याची प्रथा निर्माण झाली आहे, पण यामुळेच लोकाच्या लोकशाही प्रेरणेचा सोयिस्करपणे विसरही पडतो तो विसर पडण्याच्या स्थितीतच समदीय औपचारिकता अकारण महत्त्वाला चढते आणि लोकामध्ये लोकशाहीविषयीची प्रेरणा नसली तरीही प्रत्यक्षात लोकशाही आहे, असा आभास निर्माण केला जातो तेव्हा राज्यघटनेतून येणाऱ्या लोकशाहीच्या औपचारिक कार्यपद्धतीलाच लोकशाही मानून लोकाच्या लोकशाहीविषयक प्रेरणेचा अपरिहार्यपणे उपहास व अनादर केला जातो व निवडणुकीपुरतेच लोकशाहीची लोकामधली प्रेरणा आठवण ठेवण्याइतक्या निकृष्ट पातळीवर जाऊन पोचते. आज ती तशी पोचलेली आहे म्हणून शासन व शासनकर्ते औपचारिक कार्यप्रणालीच्या आधारानेच लोकमताची अवहेलना करू शकतात, करतात लोकनियुक्त प्रतिनिधीच्या राज्यमन्त्रिमडळाला राज्यपालाकरवी बडतर्फी करण्याची किमया यातूनच केली जाते याचे प्रत्यतर या देशात अनेक बाबतीत आलेले आहे सध्या काश्मिर–आध्रचा प्रश्न चागलाच धुमसत असल्यामुळे याचे आलेले प्रत्यतर नेहमीपेक्षा अधिक प्रमाणात स्पष्ट झाले आहे, एवढेच म्हणता येण्यासारखे आहे ! अर्थात हे स्पष्ट होताना केंद्रसत्ता लोकाच्या इच्छेला डावलून लोकाच्या लोकशाही अधिकाराची अवहेलना करण्यास धजते व लोकद्रोही स्वरूपात प्रगट होण्याची लक्षणेही स्पष्ट होऊ लागतात केन्द्रसत्तेच्या बाबतीत या वेळी ही लक्षणे सुस्पष्ट होत आहेत. अर्थात या लक्षणातून लोकशाही नष्ट करण्याचा राज्यकर्त्यांचा हेतू उघड होत असतो तो तसा या वेळी उघड होत आहे कोणत्याही लोकशाहीवाद्याच्या मनात याविषयी शका राहिलेली नाही असे वाटते, पण राज्यकर्त्यांचा हा हेतू सासदीय कार्यपद्धतीच्या औपचारिकतेला अवास्तव महत्त्व दिल्यामुळेच सुसघटित होऊन शेवटास जातो व सत्तापिपासू राज्यकर्त्यांना ही औपचारिकता सुवर्णसधीच निर्माण करून देत असते, हे प्रामुख्याने लक्षात घेण्याची आवश्यकता आहे कारण जे हे लक्षात घेत नाहीत, ते निव्वळ राज्यकर्त्यांच्या हेतूचा अशुद्धपणा किंवा भ्रष्टाचारपणाच तेवढा महत्त्वाचा मानून त्याविषयी राज्यकर्त्यांना सदोदित दोषी ठरवितात अर्थात सासदीय कार्यपद्धतीच्या औपचारिकतेत या अशुद्धपणाला व भ्रष्टतेला भरपूर सधी उपलब्ध झालेली आहे, याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करतात म्हणून याविषयी ते काहीही बोलण्याचे हेतुपुरस्सरच टाळतही असतात अशा टाळाटाळीतूनच लोकाच्या लोकशाहीविषयक प्रेरणेचे महत्त्व नाहीसे होते व लोकात यायला हवी ती कृतिशीलता येत नाही. हे या देशात सत्त्याहत्तरच्या केन्द्रातल्या सत्तापरिवर्तनानंतर एकदा प्रत्ययास आले आहे म्हणूनच लोकशाहीच्या दृष्टीने सत्याहत्तरआधीपेक्षा जास्त भयकर नवा पेचप्रसग निर्माण झालेला आहे. सध्याच्या राजकीय वातावरणात हेच स्पष्ट दिसू लागले आहे म्हणजे सत्तारूढाच्या लोकशाहीविरोधी वर्तणुकीचा विरोध करण्याची आकाक्षा ही निव्वळ सत्तापरिवर्तनापुरतीच असल्याचे यातून सिद्ध होऊ शकते अर्थात समदीय औपचारिकतेचे लोकशाहीला घातक ठरणारे वर्चस्व नष्ट करण्याची व यातून अपरिहार्यपणे उद्‌भवणाऱ्या लोकशाही द्रोहाच्या बाबतीत नि सकोच प्रतिपादन करून लोकाची लोकशाहीविषयीची प्रेरणा दृढ करण्याची आकाक्षा प्रगट होऊच शकत नाही, हेच सध्याच्या राजकीय वातावरणात दृष्टोत्पत्तीस येत आहे तेव्हा यातून लोकशाहीची लोक–प्रेरणा व त्याचा सकल्प आकारू शकणार नाही हे उघडच दिसते

लोकाच्या प्रेरणेतली लोकशाही सकल्पना ही मुळात राज्यघटना-निरपेक्षच असू शकते ती तशी असली तरच तिची मौलिकता सिद्ध होऊ शकते म्हणून राज्यघटना ही लोकशाहीची लोकाक्षेला पूरकच राहू शकेल लोकशाहीची लोकाक्षा राज्यघटनेला पूरक असून चालणार नाही तशी ती असूही शकणार नाही यात राज्यघटनेचा विरोध नाही, पण राज्यघटना लोकद्रोही बनू नये म्हणून अकुशाच्या स्वरूपातच ही लोकशाहीची लोकाक्षा अस्तित्वात यायला हवी आहे. हे शक्य होणार नसल्यास राज्यघटनेचा औपचारिक विस्तार जो ससदीय कार्यपद्धतीच्याद्वारे अस्तित्वात येतो त्यात लोकाची लोकशाही हरवून सपुष्टात येईल आणि या औपचारिकतेतूनच लोकशाही हुकुमशाहीत सहजपणे परिवर्तित होईल

हे होऊ नये असे ज्याना वाटते त्यानी लोकशाही ही लोकाच्या स्वातत्र्याचा द्रोह करणारी औपचारिक यत्रणा म्हणून अस्तित्वात ठेवण्याला हातभार लावू नये! औपचारिक लोकशाही मुळात लोकाच्या स्वातत्र्याची मूल्ये जतन करणारी नसते ती नष्ट करणारीच असते म्हणून ती वाझ असते हे लोकशाहीवादी पटवून घेतील तेव्हाच देशातली सध्याची हिंसाग्रस्त परिस्थिती ही लोकशाहीच्या वाझपणाचाच अपरिहार्य परिणाम आहे हे त्याच्या लक्षात येऊ शकेल !

□

विनोदी साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकाची बुद्धिमत्ता असामान्य असावी लागते व वृत्ती चौकस. कल्पकतेचं नैसर्गिक वरदान त्याला असावं लागतं. श्यामच्या या कथा वाचताना या साऱ्या गुणांचा प्रत्यय आपल्याला येत रहातो. —अभिप्राय 'महाराष्ट्र टाइम्स

**काही दिवस श्यामचे, काही राधाचे**

लेखक : फिरोझ रानडे

मूल्य : २५ रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# ‘एडस्’ एक नवा भस्मासुर

गेली दोन–तीन वर्षे ‘नेचर’, ‘सायन्स’, ‘न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन’ वगैरे जगद्विख्यात शास्त्रीय जर्नल्समधून व ‘टाईम’, ‘न्यूजवीक’ सारख्या तेवढ्याच विख्यात पण अशास्त्रीय मासिकांतून/नियतकालिकांतून पुन्हा पुन्हा चर्चिला जाणारा हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. कुठलाच उपाय न सापडल्याने हा रोग अत्यंत गंभीरही आहे. शिवाय तो आपल्याकडे येण्याची शक्यताही नाकारता येत नाही म्हणून या पाश्चात्य देशात हाहाकार माजवणाऱ्या रोगाची तोंडओळख करून देण्याचा हा प्रयत्न !

डॉ. अनुराधा सोवनी

बायबलच्या ‘ओल्ड टेस्टामेंट’ या भागात एक गोष्ट आहे गोष्ट तशी फार जुनी ख्रिस्ताच्या जन्माच्या किती तरी आधीची गोष्ट अशी– सोडोम आणि गोमोरा ही दोन गावे तिथली प्रजा उतली, मातली त्याची चालचलणूक बिघडली. त्याना विकृत लैंगिक सवयी लागल्या समलिंगी संभोग बोकाळला या सर्व पसाऱ्यात लॉट नावाचा सज्जन माणूस होता तो लोकाना सुधारायचे प्रयत्न करकरून थकला, पण काही फायदा होईना शेवटी देवाने लॉटला इशारा दिला, ‘मी ही पापी माणसे नष्ट करणार आहे, तू आपला बाहेर पड कसा!’ लॉट, त्याची बायको आणि दोन मुली बाहेर पडल्या आगीच्या वर्षावात दोन्ही गावे जळून खाक झाली

कुणी म्हणेल, ही झाली पुराणातली भाकड-कथा. आज या कथेचे प्रयोज़न काय?

‘एडस्’ या नावाच्या एका नव्या रोगाच्या संदर्भात या कथेचा वारवार उल्लेख केला जातो समलिंगी संभोग करणारे पुरुष (होमोसेक्शुअल्स यानाच ‘गे’ किंवा ‘होमो’ज)असेही म्हटले जाते ही. गोष्ट अमेरिकेसारख्या देशात आता लपवाछपवीची राहिलेली नाही. त्याची एक स्वतंत्र संस्कृतीच निर्माण झालेली आहे त्याचे क्लब्ज वेगळे, गल्ल्या वेगळ्या, स्नानगृहे, बार्स वेगळे. या संस्कृतीचे अस्तित्व एक कटु सत्य म्हणून बाकीच्या माणसांनी पचवले असले तरी मनातून त्याना मान्यता दिलेली नाही एवढेच नाही तर ‘होमो’ज् पापी आहेत म्हणून इतराच्या मनात त्यांच्याविषयी धिक्कार व तुच्छता असते हे ‘एडस्’ च्या निमित्ताने स्पष्ट झाले आहे या निमित्ताने एक नैतिक युद्धच उभे राहिले आहे

‘एडस्’ हा एक विचित्र रोग आहे. तो मुख्यत ‘होमोज्’ ना होतो या पापी माणसाना ही देवाने दिलेली योग्य शिक्षा आहे, अशी इतर जनतेची भावना त्यामुळे सोडोम वा गोमोराचा संदर्भ अपरिहार्यपणे येतो विशेषत होमोज गुदद्वारे संभोग करतात त्याला ‘सोडोमी’ अशीच संज्ञा असल्याने ही आठवण होणे स्वाभाविकच आहे

केवळ वैद्यकीय क्षेत्रातला प्रश्न न रहाता सामाजिक प्रश्न बनलेला हा रोग तसा अगदी अलीकडचा गेल्या चार वर्षांतला त्याची उत्क्रांती फार झपाट्याने झाली आहे मुख्य म्हणजे या रोगाने माणसे पटापट मरत आहेत आणि अजून नेमके औषध सोडाच, रोगाचे नेमके कारणही कोणाला ठाऊक नाही त्यामुळे सर्व पाश्चिमात्य देशात-विशेषत अमेरिकेत या रोगाने हाहाकार माडला आहे भीती आणि निराशेचे काळेकुट्ट वलय या रोगाभोवती आहे रोगाचा संसर्ग कसा होतो याचा पत्ता नसल्यामुळे होमोजना महारोग्यासारखे वाळीत टाकण्यात आले आहे अमेरिकेत नुकतेच घडलेले काही प्रसंग पुरेसे बोलके आहेत.

‘एडस्’मध्ये भेदरून जाण्याजोगे काही नाही,जनतेने घाबरून जाऊ नये, ‘गे किंवा ‘होमो’ लोकाना वाळीत टाकू नये असे टी व्ही वरून आवाहन करायचे होते, पण या कार्यक्रमाच्या चित्रणासाठी होमोज हेल्थ ऑफिसमध्ये जाण्यास टी. व्ही च्या कर्मचाऱ्यानी साफ नकार दिला ‘हवेतून किंवा कुणाशी केलेल्या हस्तांदोलनातून आम्हाला हा रोग झाला म्हणजे ?’ असे त्याचे म्हणणे होते

एका बँकेत एक माणूस घुसला आणि म्हणाला, ‘मी ‘गे’ आहे, मला ‘एडस्’ झालाय बऱ्या बोलाने पैसे टाका!’ हे ऐकताच बँकेचे कर्मचारी इतके घाबरले की त्याच्याकडे पिस्तुल, चाकू, सुरा काही नाही हे दिसत असतानाही ‘नको रे बुवा ह्याचा संपर्क’ म्हणून सर्वांनी भराभरा पैसे काढून दिले !

वार्सेस्टरमधील एका स्त्रीने तिच्या तरुण मुलाला घरातून हाकलून दिले ‘तो ‘गे’ आहे त्याला ‘एडस्’ झाला तर साऱ्या घराला लागण होईल आणि आम्ही सारे मरून जाऊ’ असे तिचे म्हणणे होते

सानफ्रान्सिस्कोमधील सर्व डेंटिस्ट आता ‘गे’ पेशंटच्या दाताची कामे करताना जणू एखादे मेजर ऑपरेशन करायचे आहे अशा थाटात हातात मोजे, तोंडाला मास्क, अंगावर गाउन अशा तयारीनिशी येतात. लाळेतून ‘एडस्’ चा प्रसार होईल अशी त्याना भीती वाटते. यावर रुग्णानी तीव्र नापसंती व्यक्त करूनही डेंटिस्ट आपल्या वागण्याची पद्धत बदलायला तयार नाहीत.

‘गे’ माणसे रक्तदान करायला गेली

तर ब्लड बँकस् त्याचे रक्त स्वीकारायला नकार देतात 'अेडस्' मुळे मेलेल्या माणसाना पुरायलाही कोणी तयार नाही. खरोखरी, 'अेडस्' झालेल्या होमोजची महारोग्यापेक्षाही दयनीय स्थिती झाली आहे एकोणीसशेऐंशीच्या मे महिन्यापासून होमोजचे आयुष्य सपूर्णत बदलून गेलेले आहे

### डॉक्टर अचंब्यात पडले

मे १९८० न्यूयॉर्कच्या माउट सिनाई मेडिकल सेंटरमध्ये एक ३२ वर्षाचा रुग्ण दाखल झाला. त्याला सततचा, न हटणारा ताप होता, भूक बिलकूल नव्हती, पोटात दुखत होते. गुदद्वाराच्या आसपास त्याला मोठाले व्रण होते. हर्पिस सिम्प्लेक्स आणि सायटोमेगॅलोव्हायरस अशा दोन व्हायरसैसचा रक्तात प्रादुर्भाव झाला होता

डॉ. फेडरिक सँगल त्याच्यावर उपचार करीत होते. इतक्या वेगवेगळ्या गोष्टीवर एकाच वेळी परिणाम करणारा हा कुठला रोग आहे याचे निश्चित निदान होत नव्हते. तेवढ्यात त्या रुग्णाची रोगप्रतिकारक शक्ती अचानक ढासळायला लागली आणि ऑगस्टमध्ये तो मेलासुद्धा !

रोगनिदान न झाल्यामुळे डॉ. सँगल अस्वस्थ होते. यावावत चर्चा करावी म्हणून त्यानी डॉ. डोनाल्ड आर्मस्ट्रांग याना फोन केला. डॉ आर्मस्ट्रांग तेव्हा 'मेमोरियल स्लोन केटरिंग कॅन्सर सेंटर' च्या साथीच्या रोगाच्या विभागाचे प्रमुख होते सर्व लक्षणे ऐकल्यावर ते चटकन उद्गारले अरेच्चा ! आमच्याकडेही असल्याच विचित्र केसेस येत आहेत !'

माउट सिनाई आणि मेमोरियन स्लोन केटरिंग या दोन्ही हॉस्पिटलसमधील तज्ज्ञ डॉक्टर्स एकत्र आले. सारखी लक्षणे दाखवणाऱ्या पाच केसेसची सर्वांनी मिळून चिकित्सा केली. तौलनिक चर्चा केली हे पाचही रुग्ण तरुण पुरुष होते--वय तीसच्या आसपास. सर्वांची रोगप्रतिकारशक्ती चागली होती, ती नतर ढासळत गेली होती (कधीकधी जन्मत.च ही प्रतिकारकशक्ती कमजोर असते कुठल्याच रोगजतूचा सामना न करता आल्याने अशी मुले लौकरच मरतात. याला कन्जेनायटल (म्हणजे जन्मत) इम्यून डेफिशियन्सी म्हणतात. होमोजना अॅक्वायर्ड अिम्यून डेफिशियन्सी म्हणजे नतर झालेली होती) सर्व रुग्णाना हर्पीस सिम्प्लेक्स या व्हायरसचा प्रादुर्भाव होऊन अगभर प्रचड फोड व व्रण उठले होते. या रोगाला काहीच नाव नसल्याने 'अेडस्' (A. I. D. S – Aquired Immune Deficiency Syndrome) असे सुटसुटीत नाव दिले गेले

त्यापाठोपाठ न्यूयॉर्क युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटरमध्ये एक रुग्ण दाखल झाला. त्याच्या अगावर जांभळट फोड उठले होते एका फोडाची बायॉप्सी (तुकड्याची तपासणी) करण्यात आली आणि तो रोग 'कापोसीज सार्कोमा' ठरला त्यापाठोपाठ तशा दोन केसेस त्याच हॉस्पिटलमध्ये आल्या तिन्ही रुग्ण तिशीच्या आतले होते.

'तिथले डॉक्टर्स अचब्यात पडले. तत्पूर्वी सर्व जगात मिळून फक्त तीन केसेस माहीत होत्या, त्याही सत्तरीला पोचलेल्या म्हाताऱ्यामध्ये इतक्या तरुण माणसाना हा कॅन्सर झालाच कसा हे त्याना कळेना पाठोपाठ याच रोगाचे इतर रुग्ण दाखल व्हायला लागले भराभर मृत्यूमुखीही पडायला लागले पन्नाशीच्या आतले १९ रुग्ण पुढील एका वर्षात आले, त्यातले सातजण ऑगस्ट १९८१ पर्यंत मेलेले होते

अमेरिकेत सी. डी. सी (सेंटर फॉर डिसीझ कट्रोल) मध्ये सर्व मृत्यूची नोद ठेवली जाते. तेथे १९८१ मध्ये दोन मृत्यूची नोद झाली लॉसइजेलिसमध्ये पाच 'होमोज' ना अेडस झाला होता त्याबरोबर त्याना न्यूमोनिया झाला हा न्यूमोनिया 'न्यूमोसिस्टीस कॅरिनी' या एकपेशीय प्राण्यामुळे झाला होता अशा केसेस अगदी क्वचित आढळतात. इथे तर एका वेळी अशा पाच केसेस होत्या ! त्यातले दोन रुग्ण त्या न्यूमोनियामुळे मेले.

### प्रसार कसा होतो ?

तऱ्हेतऱ्हेच्या विचित्र केसेस अमेरिकाभर उपटायला लागल्यावर या सर्वांचा मेळ घालण्यासाठी सी डी सी. तर्फे एक कमिटी नेमण्यात आली. सर्व अेडस्च्या रुग्णाची कालक्रमानुसार नोंद ठेवण्यात आली, तेव्हा समजले की, मे १९८० ते ऑगस्ट १९८१ या कालखडात एकूण १०८ रुग्ण नोदले गेले होते त्यापैकी ४६ मेले होते हे प्रमाण ४३ टक्क्याहूनही जास्त होते. (देवीसारख्या महाभयानक रोगातही मृत्यूचे प्रमाण २५% एवढेच होते, हे लक्षात घेण्याजोगे आहे लशीच्या शोधानतर तर हे प्रमाण शून्य टक्के आहे) या १०८ रुग्णापैकी ११% रुग्णाना कापोसीज् सार्कोमा होता, ३२ % लोकाना न्यूमोसिस्टीसमुळे होणारा न्यूमोनिया होता काही रुग्णाना दोन्ही झाले होते

एडस्चा प्रसार कसा होतो हे समजण्यासाठी या कमिटीतर्फे अभ्याससमित्या नेमण्यात आल्या. या समित्याचे सदस्य ठिकठिकाणी गेले दवाखाने, 'गे क्लब्ज्', लैंगिक रोगावर उपचार करणारी क्लिनिक्स, रस्त्याच्याकडेचे 'गे' अड्डे– सर्व ठिकाणी जाऊन ते होमोजना भेटले त्याच्याशी चर्चा केली, रोगाचे गाभीर्य त्याना समजावून सागितले, सहकार्याची विनती केली, सपूर्ण गुप्ततेची हमी दिली एडसच्या रुग्णाच्या जोडीदाराची नावे जाणून घेण्यासाठी हा सारा प्रयत्न होता नवी लागण थाबावी म्हणून या सर्व जोडीदाराची तपासणी करणे आवश्यक होते 'गे' माणसे एका जोडीदारावर कधी सतुष्ट नसतात. शर्ट बदलावा इतक्या सहजतेने ते जोडीदार बदलतात विशेषत सामुदायिक स्नानगृहामधून हा प्रकार मोठ्या प्रमाणावर चालतो एका होमोने सागितले की, एका सध्याकाळी त्याचा अठ्ठेचाळीस वेगवेगळ्या जोडीदाराशी एकापाठोपाठ सबध आला होता ! सर्वसाधारणपणे एका 'गे' माणसाचा आयुष्यभरात पाचशे जोडीदाराशी संबध येतो असे या पाहणीत आढळून आले. मात्र एडस् झालेल्या 'गे' माणसात हे प्रमाण दुपटीहून जास्त म्हणजे अकराशे जोडीदार एवढे आढळले !

पुरुषाच्या लैंगिकतेवर हाइट (Hite) कमिटी याच सुमारास सशोधन करत होती. त्याच्याकडे आलेल्या उत्तरानुसार एका विशिष्ट होमोने दोन हजाराहून जास्त जोडीदाराशी सबंध आल्याचे कबूल केले होते

प्रत्येक वर्षी किती जोडीदार बदलले जातात याची पाहणी केली असता असे निष्पन्न झाले की, ज्याना एडस् नाही अशी 'गे' माणसे किमान पचवीस तरी जोडीदार

बदलतात, तर 'एडस्' झालेल्यात हा आकडा साठावर आहे.

या सर्व पहाण्यामुळे झालेला फायदा म्हणजे 'एडस्' च्या स्वरूपाविषयी, कारण-मीमांसेविषयी काही तरी अटकळ बांधता आली 'हा देवाने स्वर्गातून पाठवलेला शाप आहे' इथपासून 'हा लैंगिक संबंधाद्वारे पसरणारा रोग असावा' येथपर्यंत टप्पा गाठता आला या अटकळीला आधार देणारा एक पुरावा म्हणजे 'एडस्' च्या रुग्णात लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या इतर रोगाचे प्रमाण खूप आढळले ५८% लोकांना गोन्ोरिया व ४७% रुग्णांना सिफिलिस होता

फक्त 'होमोज' नाच हा रोग का होतो याविषयी तर्कवितर्क सुरू झाले 'सोडोमी' सारख्या विकृत सवयीमुळे अनेक जोडी-दाराच्या गुदद्वाराशी, तोंडाशी 'गे' लोकाचा संपर्क घडतो माणसाच्या मलाशयात व तोंडात नेहमीच तऱ्हेतऱ्हेचे बॅक्टेरिया, व्हायरसेस व प्रोटोझुआ (अमीबासारखे एक-पेशीय प्राणी) असतात इतक्या प्रचंड प्रमा-णात सतत रोगजंतूशी संपर्क आल्याने 'गे' माणसाची रोगप्रतिकारकशक्ती कमजोर होते, अपुरी पडते व ढासळते. त्यामुळे नेहमी काबूत ठेवले जाणारे हर्पीससारखे व्हायरस, न्यूमोसिस्टिससारखे प्रोटोझुआ फोफावतात व मृत्यूस कारणीभूत ठरतात अशी एक उपपत्ती मांडण्यात आली

दुसरी उपपत्ती म्हणजे गुदमैथुनामुळे मलाशयास होणारी इजा. योनिमार्गाच्या भिंती चांगल्या जाडजूड असतात पेशीचे थरावर थर बसून त्या बनलेल्या असतात (स्ट्रॅटिफाईड स्क्वॅमस एपिथेलियम) याउलट मलाशयाच्या भिंतीवर पेशींचा एकच थर असतो (क्यूबॉयडल एपिथेलियम) त्यामुळे मलाशयाच्या भिंतीना सहज इजा होते, आतील रक्तवाहिन्याशी मग जोडीदाराच्या शुक्रजंतूचा, वीर्याचा, रक्ताचा, मलाचा प्रत्यक्ष संबंध येतो या रक्तवाहिन्यामार्फत वीर्य व शुक्रजंतू वाहून नेले जातात व रक्तात मिसळतात. त्याच्यामुळे रोगप्रति-कारक शक्ती कमजोर केली जाते किंवा लैंगिकसंबंधाद्वारे पसरणारे तऱ्हेतऱ्हेचे रोग-जंतू विशेषत व्हायरस प्रत्यक्ष रक्तात मिस-ळून प्रतिकारकशक्ती कमी करतात

कशाने का होईना, रोगप्रतिकारकशक्ती-वर अनिष्ट परिणाम होतो एवढे नक्की याचा पुरावा म्हणजे रक्तातील 'टी' पेशीचे प्रमाण रोगजंतू काय किंवा कॅन्सर काय, त्याच्या प्रतिबंधासाठी विशिष्ट पेशी असतात 'टी' आणि 'बी' लिम्फोसाइटस् 'बी' पेशी मुख्यत. रोगजंतूविरुद्ध प्रतिद्रव्य (अँटि-बॉडी) तयार करतात 'टी' पेशी इतर पेशी मारतात उदा कॅन्सरपेशी, बॅक्टेरिया 'टी' पेशीचे दोन प्रकार असतात 'सहा-य्यक' आणि 'प्रतिरोधक' या दोन्ही प्रका-राच्या संतुलनाने योग्य तो परिणाम साधला जातो, पण 'अेडस्'च्या रुग्णात सहाय्यक 'टी' पेशी अगदीच नगण्य असतात, तर प्रतिरोधक 'टी' पेशीचे प्रमाण खूप वाढलेले आढळते प्रतिरोध वाढल्याने 'बी' पेशीसुद्धा नीट काम करत नाहीत व रोगप्रती रोग-प्रतिकारक व्यवस्था कोसळते

तिसरी उपपत्ती म्हणजे अमाइल नायट्रेटचा रोगप्रतिकारकशक्तीवर होणारा अनिष्ट परिणाम हे द्रव्य खरे म्हणजे हृद्रोगावरचे औषध म्हणून बाजारात आले वायूच्या स्वरूपात ते गोल कॅपसूलसमध्ये भरलेले असते जरूर पडेल तेव्हा एक कॅपसूल फोडा-यची म्हणजे मोठा आवाज होऊन वायू बाहेर येतो, तो हुंगला म्हणजे रक्तवाहिन्या प्रसरण पावतात हृदयाला जास्त रक्तपुरवठा होतो आणि छातीतील कळ शमते. या गोळ्यांना त्याच्या आकारामुळे पर्लस् म्हणजे मोती म्हणतात किंवा फोडताना होणाऱ्या आवाजामुळे त्या 'पॉपर्स' म्हणूनही ओळ-खल्या जातात. याच त्रासदायक आवाजामुळे हृदयाच्या रोगासाठी होणारा वापर मंदा-वला; पण तोपर्यंत त्याचा दुसरा उपयोग होमोजनी शोधला होता रक्तवाहिन्याच्या प्रसरणामुळे शिश्न ताठर होते व संभोगसुख वाढते, म्हणून गे लोक सरसकट 'मोती' वापरायला लागले अेडस्ची कारणे शोध-ताना जी जी 'गे'जची वैशिष्ट्ये होती त्या सर्वांचा कसून अभ्यास केला गेला. तेव्हा लक्षात आले की, अमाइल नायट्रेटनेसुद्धा रोगप्रतिकारकशक्तीवर अनिष्ट परिणाम होऊन ती दुबळी बनते.

नेमक्या कुठल्या रोगजंतूमुळे रोगप्रति-कारकशक्ती कमी होते किंवा नेमक्या कोठल्या जंतूमुळे मृत्यू घडतो याचा शोध मग चालू झाला. सायटोमेगॅलो व्हायरस, हर्पीस सिम्प्लेक्स व्हायरस, एच. टी एल. व्ही (ह्यूमन टी सेल ल्यूकेमिया व्हायरस) हेपॅटायटिस बी व्हायरस (म्हणजे कावि-ळीचा व्हायरस) न्यूमोसिस्टिस या सर्वांची नावे या यादीत होती. 'गे' लोकात या सर्वच रोगजंतूचा प्रादुर्भाव फार मोठ्या प्रमाणात होता लैंगिक संबंधाद्वारे पसरणारा रोग सूक्ष्मातिसूक्ष्म रोगजंतूमुळे म्हणजे बहुधा विषाणु (व्हायरस)मुळे होत असावा असा अंदाज होता आणि मुख्य म्हणजे नेमका रोगजंतू सापडला तर त्याविरुद्ध लस तयार करून ही रोगाची साथ आटोक्यात आणता येईल अशी आशा होती

## एडस्–कोणालाही

दुर्दैवाने असा कोणताच सबळ पुरावा अजून हातात आलेला नाही. शिवाय रोग-जंतूचा आधी प्रादुर्भाव होऊन नंतर रोग-प्रतिकारकशक्ती कमी झाली की ही शक्ती कमी झाल्याने जंतूचा प्रादुर्भाव झाला हे ठरवणे कठीण आहे 'आधी कोंबडी की आधी अंडे' या सनातन प्रश्नाएवढाच हाही प्रश्न बिकट आहे.

त्याहूनही दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हा भस्मा-सुर आता फक्त होमोजपुरता मर्यादित राहि-लेला नाही ८२ च्या ऑगस्टमध्ये न्यूयॉर्कच्या हार्लेम हॉस्पिटल सेंटरमधील तीन डॉक्ट-रानी 'न्यू इंग्लड जर्नल ऑफ मेडिसिन' मध्ये एक पत्र प्रसिद्ध केले. त्यात त्यानी अेडस् झालेल्या एका रुग्णाचे वर्णन केले होते रोगप्रतिकारकशक्तीचा ऱ्हास, कापोसीज सार्कोमा वगैरे सर्व गोष्टी तंतोतंत जुळत होत्या, पण हा रुग्ण होमो नव्हता! मात्र त्याला अमली पदार्थांचे व्यसन असल्याने तो नेहमी स्वत ला हातातील नीलेत अमली औषधे टोचून घ्यायचा

त्यापाठोपाठ अमली पदार्थ टोचणाऱ्या-मध्ये 'एडस' ची साथच आल्यासारखे झाले. एकापाठोपाठ एक केसेसची नोंद व्हायला लागली १९८२ साली अशा माणसात एडस्-मुळे तेहेतीस मृत्यू घडले त्यातल्या आठ स्त्रिया होत्या!

१९८२ च्या डिसेंबरमध्ये एकूण ९५१ रुग्णाची 'एडस्' या निदानाखाली नोंद झाली होती त्या सर्व केसेस अमेरिकेतील

होत्या, पण पाठोपाठ बेल्जियम, फ्रान्स, स्विट्झरलंड, इग्लंड या सर्व देशातून अशाच केसेस आढळायला लागल्या होमोज किंवा अमली पदार्थ टोचून घेणाऱ्यात त्या मुख्यत्वे सापडायच्या, पण त्यापाठोपाठ १९८२ मध्येच तीन नवीन केसेस नोंदल्या गेल्या या तिन्ही रुग्णाना विकृत लैंगिक सवयी किंवा अमली पदार्थांचे व्यसन अजिबात नव्हते, पण हे तिघे हेमोफिलियाक होते. म्हणजे जन्मत च त्याच्या रक्तात रक्त गोठण्याच्या क्रियेसाठी आवश्यक असणारे 'फॅक्टर ८' नावाचे द्रव्य नव्हते. त्यामुळे या तिघाना पुन्हापुन्हा 'फॅक्टर ८' ची इंजिक्शने घ्यावी लागत.

म्हणजे केवळ लैंगिकसंबंधातून नव्हे, तर रक्तात टोचल्या जाणाऱ्या पदार्थांतूनही (कदाचित खराब, पुरत्या निर्जंतुक न केलेल्या सुयामुळे) एडस्चा प्रसार होत होता! तो पुरुषाना तसेच स्त्रियानाही होऊ शकत होता म्हणजे थोडक्यात कुणालाही होऊ शकत होता!

याच वेळी एक नवीनच गोष्ट उजेडात आली हाइटी (*Haity*) या बेटाचा एडस्शी काही तरी संबध होता मूळचे हाइटीचे रहिवासी; पण आता मियामीत राहणारे १९ जण १९८२ साली एडसने आजारी पडले. त्यापैकी सहा जणाना न्यूमोसिस्टीम न्यूमोनिया झाला ते साहीजण मेले उरलेल्या तेरापैकी आणखी चौघे मेले त्याच वेळी ब्रुकलिन शहरात दहा हाइटीवासियाना एडस् झाला त्यातले पाच मेले!

या बातम्यानतर डॉक्टर्स व शास्त्रज्ञाचे लक्ष हाइटीबेटावर केन्द्रित झाले तेथे दर आठवड्याला एडस्च्या दहा ते पधरा केसेस सापडू लागल्या म्हणजे एडस् आणि हाइटीबेटे याच्यात काही तरी निश्चित दुवा होता

कुणी म्हणाले, एडस् ज्या कुठल्या रोगजतूमुळे होत आहे, त्याना प्रतिकार करण्याची शक्ती जन्मत च हाइटीवासियाकडे कमी असावी. त्याच्यात फोफावलेला हा रोग अमेरिकेत स्थायिक झालेल्या हाइटीवासियामार्फत अमरिकेत पोचला असणार कुणी म्हणाले, हाइटीत पुरुषवेश्या स्वस्त नि चटकन मिळतात म्हणून न्यूयॉर्कच्या होमोजचे थवेच्या थवे हाइटीत नेहमी गर्दी करून असतात नेहमीच्याच एखाद्या व्हायरसमध्ये थोडासा बदल (म्यूटेशन) झाल्याने एखाद्या हाइटीवासियात हा *नवाच रोग उद्भवला असेल*, त्याच्याकडून तो हाइटीत पसरला असेल नि हाइटीत मौजमजेसाठी येणाऱ्या होमोजनी तो अमेरिकेत नेला असेल!

तिसराच अदाज म्हणजे एडस् आणि हाइटी येथे ही साखळी संपत नाही, तर त्यातला पुढचा दुवा म्हणजे विषुववृत्तीय आफ्रिका मियामी युनिव्हर्सिटीच्या विषुववृत्तीय रोगसंशोधनकेन्द्रात काम करणारे डॉ कॅगेलिन मॅक्लीऑड आणि डॉ मार्क व्हाइटसाईड याचा असा दावा आहे की, गेली कित्येक वर्षे आफ्रिकेत एडस् आहे क्यूबाचे सैनिक जेव्हा परत आले तेव्हा ते हा रोग बरोबर घेऊनच आले तिथून तो अमेरिकेत पसरला हाइटी आणि विषुववृत्तीय आफ्रिका दोन्ही ठिकाणी सारख्याच प्रमाणात आढळणाऱ्या एच टी.एल व्ही या व्हायरसकडे हे दोघे एक महत्त्वाचा दुवा म्हणून बघतात

काय असेल ते असो एडस्चे पेशटस दिवसागणिक वाढताहेत स्त्रिया, लहान मुले कोणीही त्यातून सुटलेले नाही. १९८३ साल सपले, तेव्हा सर्व जगात मिळून तेवीसशेपेक्षा जास्त रुग्णाची नोद झाली होती त्यातील बहुतेक सर्व मृत्युमुखी पडले आहेत! लागण झाल्यापासून सुमारे चार ते तीस महिन्यात लक्षणे दिसायला लागतात. अर्थात लागण नेमकी केव्हा झाली हे सागणे फारच कठीण आहे. लक्षणे दिसायला लागल्यापासून दोन महिन्यात मृत्यू घडू शकतो कधीकधी हा कालावधी दोन वर्षांएवढा असतो

सुरुवातीच्या सर्व केसेस, त्याच्या मृत्यूची कारणे योग्यरीत्या नोंदली गेली नव्हती; तेव्हा मृत्युमुखी पडलेल्याचे प्रमाण ४० टक्क्याच्या आसपास वाटत होते. जसजशी जास्त जास्त माहिती मिळत गेली तसतशा नोंदी सुधारल्या, आता हे प्रमाण १०० टक्क्याच्या जवळ आले आहे

इतरानाही लागण असली तरी अजूनही होमोजमध्ये एडस् जास्तीत जास्त म्हणजे ७० टक्के आहे अमेरिकेतील स्वच्छद वातावरणामुळे तेथे होमोजचे प्रमाण सर्वात जास्त आहे, त्यामुळे हा सपूर्ण देशाचा प्रश्न बनला आहे 'होमोज'चे आयुष्य तर उध्वस्तच झाल्यासारखे आहे. इतराना त्याच्याविषयी वाटणारी घृणा, तुच्छता आता उघड झाली आहे. मृत्यू केव्हा, कधी, कुणाकडून गाठेल याची शाश्वती नसल्याने होमोज सतत आत्यतिक भयाच्या छायेत वावरत आहेत. अनेकानी 'मोती' वापरणे, सार्वजनिक स्नानगृहात जाणे बद केले आहे. जोडीदार बदलणे थांबवून एकाच जोडीदाराबरोबर रहाणे पसत केले आहे निरोध, जेली वगैरे साधने वापरून सपर्क *टाळण्याचा प्रयत्न* चालू आहे कुठल्या जोडीदाराने कधी एडस्ची लागण केली हे सागता येत नसल्याने आता एकमेकाना घट्ट धरून रहाणाऱ्या या जमातीत परस्पराविषयी अविश्वास, सशय, चीड, तिरस्कार, द्वेष असे विचित्र वातावरण आहे लवकर सशोधन होऊन एडसवर परिणामकारक प्रतिबधक उपायाचा किंवा उपचाराचा शोध लागावा अशी होमोजची मागणी आहे या मागण्याकडे दुर्लक्ष होत आहे, तेही जाणूनबुजून अशी त्याची भावना आहे 'बरी घडली अद्दल' म्हणून कोणी पुरेसा वेळ किंवा पैसा या सशोधनात घालत नाही अशी त्याची तक्रार आहे त्यामुळे चिडून सप, मोर्चे, निदर्शने सुरू आहेत 'आम्हीही माणसे आहोत, आम्हालाही जगण्याचा हक्क आहे' 'एडस् सशोधनाला बजेट वाढवून द्या' असे त्याचे फलक असतात.

भारतात अजून तरी सगळीच सामसूम आहे. एडस्च्या एकाही रुग्णाची नोद अद्याप नाही म्हणजे आपल्याकडे हा रोग पोचलेला नाही असा निष्कर्ष निघू शकेल, पण दुसराही निष्कर्ष निघू शकतो अजून आपल्याकडे या रोगाची पुरेशी माहिती नाही, त्यामुळे या रोगाने मरणाऱ्या रोग्यावर 'न्यूमोनियाने मेला' यासारखे लेबल लावून नोद होत असेल ही शक्यता नाकारता येत नाही, या जेटयुगात परदेशवारी करणाऱ्याची सख्या खूप आहे कुणी लागण घेऊन आले तर लक्षणे दिसायलाच दोन वर्षे लागू शकतील तोवर किती जणाना लागण झाली असेल कोण जाणे!

अमेरिकेतल्याएवढ्या उघड रीतीने नसले तरी आपल्याकडे 'होमो' पुष्कळ आहेत. मोठाल्या शहरातून उदा. मुबई, दिल्ली, कलकत्ता–हा एक धदाच आहे. फक्त पुरुषानी एकत्र रहाण्याच्या ज्या सस्था असतात–हॉस्टेले, आर्मी किंवा पोलीस-कँपस्, तुरुग इ अशातूनही हा प्रकार चालतो हिजड्याची एक मोठी जमात याच प्रकारात मोडते तेव्हा जर परदेशातून लागण झाली तर ती पसरणे अवघड जाणार नाही

अशी वेळ आलीच, तर तोपर्यंत एडस्वर काही तरी रामबाण औषध निघालेले असावे अशी प्रार्थना करण्यापलीकडे आज आपल्या हातात काही नाही! □

# कौमार्यरोपणाचा किफायती धंदा

प्रा. गोपाळ दत्त कुलकर्णी

कदाचित् निसर्ग पुल्लिंगी असल्यामुळे असेल, परंतु निसर्गाने स्त्रीदेहाची यंत्रणा फुलप्रुफ करताना, तिची करता येईल तेवढी कुचंबणा करण्याची सोय केली असावी. स्त्रीदेहाची संरचना पुरुषदेहाहून 'टिकाऊ' आहे, पण हा टिकाऊपणा पुन्हा पुरुष-इच्छेवर अवलंबून आहे स्त्री मुक्ती आदोलनाने कळस गाठला तरी स्त्रीला तिचा मासिकधर्म (मेन्स्टुरुएशन-ज्याला इंग्रजीत मोघम सूचकपणे curse म्हणतात) गर्भधारणक्षमतेपासून मुक्ती नाही अंतर्वस्त्रे जाळून शरीराची एकही लक्ष्मणरेषा गळून पडत नाही स्त्रीचे वयात येणे, तिचे गरोदरपण, तिची अपत्यप्राप्ती, समारंभपूर्वक सोहळे म्हणून पार पडत असताना, तिच्यावर मनोमन दडपणाचे 'दस्तक' वाढतच राहतात स्त्री-पुरुष देहात structurally (संरचनात्मक) फरक जवळजवळ नाही आणि स्त्री-पुरुष विभेद-sexual आहेत, ते तर बाह्य आहेत प्रयोगशाळेतील काचपेटीत टांगलेला मानवदेहाचा सांगाडा- बाईचा की बुवाचा हा प्रश्न विद्यार्थी विचारत नाहीत म्हणून बरे, नाही तर विज्ञानशिक्षकाची भंबेरी उडून जाईल! असा एकूण स्त्रीदेहावर निसर्गाने जेवढी मेहनत घेतली आहे, तेवढीच मेहनत घेऊन पुरुष-निष्ठ समाजाने पहारे-चौकीदार बसवून स्त्रीदेह व मनावर हुकुमत दरोबस्त ठेवली आहे

¤

या पार्श्वभूमीवर वर्ष-दीड वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्यात औरंगाबाद जिल्ह्यात एका नवऱ्याने विवाहाच्या पहिल्या रात्री आपली वधू-नवरी कुमारी नाही, या संशयाने तिचा खून केला व तो पोलिसांचे स्वाधीन झाला, हे वृत्त आठवा दोन-अडीच वर्षापूर्वी इंग्लंडमध्ये येणाऱ्या तथाकथित गौरेतर वधूच्या कौमार्यकसोट्या घेतल्या जात होत्या म्हणून ब्रिटिश व भारतीय पार्लमेन्टात गदारोळ उठला होता. राजपुत्र चार्लसने तीन-चार वर्षापूर्वी प्रिन्सेस डायनाला वरण्यापूर्वी तिचीही कौमार्यकसोटी घेतल्या गेल्याच्या वृत्ताने, जगातील सर्व वृत्तपत्रानी काहूर माजविला होता औरंगाबादचा अडाणी नवरा (ज्या वरू नये तो नवरा असा तर हा सामाजिक शब्द नाही ?) व चार्ल्स याची मनोरचना कशी एकाच पुरुषी जड दिशेने मूढ चालते, ते पाहणे लक्षणीय ठरते ! त्यानंतर कौमार्यकसोटी गाजल्या नाहीत, पण कौमार्यरोपणाचा धदा मुंबईसारख्या शहरात तेजीत चालल्याच्या वार्ता संडे ऑब्झर्वरमध्ये फिचर म्हणून (२९-७-८४) व (१९-८-८४) उघडझाप चाललेल्या टाइम्स ऑफ इंडियात अग्रलेखाचे कॉलमात (४-८-८४) आली 'मार्ड' कॅपिटेशनवाल्या मेडिकल कॉलेजविरुद्ध शंखध्वनि, पाचजन्य करते कै अरुण लिमयेंनी 'क्लोरोफॉर्म' मध्ये डॉक्टर्समंडळीच्या सोनेरी टोळी (रॅकेट व क्लीशे) विरुद्ध लिहिताच गावोगाव चर्चा करून आम्ही सिझेरीन मुद्दाम करून पेशंटना गाजत नाही हो ! म्हणून पत्रके काढली, ती डॉक्टर्समंडळी स्त्रियांचे शारीरिक कौमार्य किंवा डॉ. राम मनोहर लोहिया म्हणत ती 'योनिशुचिता' थोतांड आहे, याविषयी काही फारसे बोलत नाहीत वा चर्चासत्रेही आयोजित करत नाहीत. गर्भपाताला १९७४ पासून कुटुंबनियोजन कार्यक्रमाखाली कायदेशीर मान्यता मिळूनही गर्भपाताला क्यूरेटींग किंवा अशीच टोपणनावे ठेवणाऱ्याच्या भीतीचा फायदा घेत, आजही स्त्रियांची पिळवणूक चालू आहे कौमार्यकसोटीएवढीच कौमार्यरोपण ही महिलांची विटंबना करणारी वैज्ञानिक 'चाल' आहे यावावत डॉक्टर्सनी हिप्पोक्रेटीसला स्मरून पुरुषजागरण केले पाहिजे; पण ते त्यांना धंद्यापोटी पुढे सुचत नाही (अशा कौमार्यरोपणासारख्या शस्त्रक्रिया करण्यात गुणवत्तेवर मेडिकल कॉलेजमध्ये शिरलेले पुढे आहेत, हे इथे वेगळे सांगण्याचे कारणही नाही.) ज्या कारणाने म्हणजे पुरुषी अविश्वासातून कोट्यवधि मुस्लिम महिलांच्या माथ्यावर 'चादोर', 'बुरखा', 'परदा' आला, तोच पुरुषी अहंकार कौमार्य-कसोटीच्या मिषाने आणि आता कौमार्य-रोपण ( Hymeno plasty किंवा डॉ. जॉर्ज सावा म्हणतो ती Hymenorrhaphy ) शस्त्रक्रियेच्या रूपाने पुढे येत आहे

## पुरुषांना मोकळे रान

स्त्रियाना पुरुषानी कापडी किंवा चिकाच्या पडद्यात ढकलले तर निसर्गाने कौमार्य-पटल निर्माण केले आहे ! (Hymenoplasty is a menace and disgrace, since this brand of plastic surgery does not bring any beauty, but it brings ugliness in human relationships- Dr. O, Rank ) प्लॅस्टिक सर्जरी श्रीदेवी पासून देवआनंदपर्यन्त चेहेरेपट्टीचा कमनीय करण्यासाठी वापरतात तेव्हा आपण ते समजू शकतो, परंतु कौमार्यपटल पुन्हा जोडणे ( Hymenoplasty ) करून ते करणारी व्यक्ती आयुष्यभर गिल्टी राहतेच, शिवाय ती फसविते त्या व्यक्तीचे काय ? पुरुषाचे अहंकार कधीकधी फसवून फुगविले जातात, हीच केवढी घोर वंचना आहे अनंतरंग रति रति कामसूत्रात कौमार्य रोपणाचा भास निर्माण करण्यासाठी नगरवधूनी रक्तप्राशनाने तट्ट फुगलेल्या जळवाचा वापर करून कसे फसवावे, याचे मार्गदर्शन आहे. अर्थात जळवाचा वापर १५ ते २० हजार रुपये खर्चून होणाऱ्या हायमेनोप्लास्टीपेक्षा किती तरी सभ्य फसवणूक आहे !

हायमेन म्हणजे स्त्रीयोनीतील कौमार्यपटल तो पूर्णत बंद नसतो त्या पटलास प्रसंगी एकाहून अधिक छिद्रे असतात म्हणून तर मासिकधर्म शक्य होतो धक्क्याने हा पटल भंग पावतो हा धक्का संभोगातून येणारा असतो असे नव्हे तरीही कौमार्य कसोटी म्हणून विवाहाच्या पहिल्या रात्री नवरीची अंतर्वस्त्रे तपासून, कौमार्यपटल भंगल्याची खात्री, पर्यायाने कौमार्याची खात्री केली जाते वास्तविक क्रीडापटु किंवा

सायकलसारखी वाहने सतत चालविणाऱ्या कुमारीचे बाबतीत हायमेनचा भग सभोगाशिवाय सभवतो, परतु अहकारी पुरुष virgin (कुमारिका) व तिचे Defloration (कौमार्यपटलभग) याचे स्तोम माजवून स्त्री–जीवनात माती कालवू शकतात लॅटिन मध्ये अघ्राण अस्पर्श कुमारिका virgo intacta ही सकल्पना मर्दुमकी, धार्मिक व सामाजिक रुढीनी ग्रस्त आहे जगातील काही अपवादात्मक समाज वगळता, कुमारिका शरीर ही 'प्राईझ' मानण्याची प्रथा आहे, (ही माहिती डिक्शनरी ऑफ सेक्स्युअल टर्म्समधून उद्धृत) स्त्रीचे कौमार्य हा तिच्या sex appeal चा भाग मानण्याने पुरुषाना मोकळे रान सापडले आहे वास्तविक पुरुष वयात येण्याचे समारभ, सोपस्कर कोणत्याच (पुरुषप्रधान) समाजात नाहीत तेव्हा पुरुषाला ना कौमार्य पाळण्याचे व पटलाचे बधन, ना कौमार्यपटलासारखे एखादे साधन! कुमार हा शब्दच 'कुत्सित मार' (मार म्हणजे मदन–मदनाला जो आपल्यास वश नाही म्हणून कुत्सा वाटते तो ! त्या शब्दाचे स्त्रीलिंग कुमारी !) वास्तविक प्रथम सभोगानतर रक्तपात हे २+२=४ एवढे साधे वैज्ञानिक समीकरण नाही त्यातच विवाहाचे वय, मुलगी वयात आल्यानतर १०–१५ वर्षेपर्यंत पुढे ढकलले गेल्याने, स्त्रियाचे कौमार्यपटल intact राहण्याची गॅरटी निसर्गही घेऊ शकत नाही तेव्हा फ्राईडने म्हटलेल्या 'Royal Road to the unconscious' वरून एडक्याप्रमाणे चालणे पुरुषानी थाबविले पाहिजे; परतु माणूस हा सर्वाधिक unteachable animal असल्याने, कित्येक श्रीमत पित्याच्या धनिक बाळचा कौमार्यपटलाच्या महागड्या शस्त्रक्रियाना सामोऱ्या जाणार हे उघड आहे वक्षस्थळाचे आकार टिकविण्यासाठी स्तनपान न देणाऱ्या मातापासून (आठवा आठवली तर शि म पराजपे याच्या गोष्टीतील स्वत चे मूल दारिद्र्यापोटी मारणारी ओलीदाई) ते वक्षस्थळात सिलिकॉन भरून कॅन्सरला कवटाळणाऱ्या महिलाचे हाल ! विलक्षण म्हणजे कौमार्य-रोपण शस्त्रक्रियाची चलती प्रगत इग्लड–अमेरिका–रशियाऐवजी गावठी साहेबाचे मागास देशात (भारत, ग्रीस, इटली, आफ्रिका, पाकिस्तान) आहे

## ब्लॅकमेलिंग

डॉ जॉर्ज सावा यानी 'सेक्स, सर्जरी, पीपल (१९६७) (ऊर्फ अॅबनॉर्मल सेक्स . ए डॉक्टर्स केसबुक) नावाचा ग्रथ लिहिला असून, त्यात स्वत च्याच पेशटचे अनुभव वर्णन केले आहेत त्यातील पहिलेच प्रकरण' द इम्पॉर्टन्स ऑफ बिईंग ए व्हर्जिन' असे आहे त्यात सोफिया व क्लॉडिया या ग्रीक व इटालियन तरुणीच्या कौमार्य–रोपणाची कहाणी आहे डॉ सावाने ३०-३५ वर्षापूर्वी जे पाहिले, अनुभवले त्यानतर भारतात ही कौमार्य–रोपणशस्त्रक्रिया येण्यास एवढी वर्षे मोडावीत हे नैसर्गिक आहे आपल्या आग्लशूद्र व पाश्चात्य–परित्यक्त व उच्छिष्ट ग्रहणवृत्तीत हे फिट्ट बसणारे आहे ! डॉ सावानी ही शस्त्रक्रिया Unethical मानली आहे.


'To reconstruct the hymen by hymenorrhaphy is neither too difficult, nor dangerous, but its unethical...because that operation is performed in order to deceive or should I again say–fool? a third paty' ही फसवणूक तीही पतीची ठीक नाही 'पिल' (pill) व मुलीची वाढती विवाहवये (म्हणजे पुरुषाचे बाबतीत कडोम व अधिक वाढती वये) या घटकामुळे व्हर्जिनिटीचे स्तोम-कौतुक पुरुषानी कमी केले पाहिजे तेव्हा जॉर्ज सावाच्या मते कौमार्यरोपण करून फारतर '२२ कॅरट' व्हर्जिन तयार होऊ शकते (माझ्या मते १४ कॅरट) भूतकाळ फारतर सुई–दोरा व शस्त्रक्रियेने शरीरापुरता पुसता किंवा झाकता येईल–मनाचे काय ?

२९–७–८४ च्या सडे ऑबजर्व्हर वृत्तानुसार ब्रीच–कॅडी, टाटा मेमोरियल व फ्लॅ सेंटर हॉस्पिटलसमध्ये काम करणारे तज्ज्ञ गुणवत (!) सर्जन्स हायमेनोप्लास्टी किंवा हायमेनोराफी नामक शस्त्रक्रिया करून उनाड–श्रीमंत–अविवाहित मैनाना कौमार्यदान करत आहेत एक तज्ज्ञ शल्यकर्मविशारद रु १५ ते २० हजार (फक्त) चार्ज करून आफ्रिकेतील व देशातील गुजराती व मुस्लिम तरुणीना कौमार्यदानाचे चुडेदान करत आहे 'प्रियकराने फसविले, आता पालक–समत विवाह करायचा आहे, तेव्हा कौमार्य शाबूत हवे' अशी विनवणी ऐकून दया येऊन, आपण त्या शस्त्रक्रिया करतो असे एका गुणवत डॉक्टरने सडे ऑब्झर्वरला सागितले ! अर्थात ही कौमार्यरोपणे करण्यास आईबाप गयावया, तीही नोटाची पुडकी घेऊन करत राहतात कौमार्य–रोपणार्थी अविवाहिता २१–२६ वयोगटातील आहेत करून–सवरून देवपूजेला (ससाराच्या) लागण्याचा हा कट आहे सौ सौ चुंहे खाके, बिल्ली चली हाज, किंवा वटसावित्री, असा हा सोपस्कार आहे कौमार्यरोपण इच्छुकात नोकरी करणाऱ्या तरुणीही आढळतात पूर्वी चोरटे गर्भपात होते, कडोम व पिलमुळे हल्ली कौमार्यरोपणाची सद्दी आहे सामाजिक सेवा किंवा पकात रुतलेल्या गायीची सोडवणूक या नावाखाली डॉक्टर्स मडळीची उखळे (की ऑपरेशनटेबल्स ?) पाढरी होत आहेत ज्या समाजात पुरुष कौमार्याची हमी नाही, त्या समाजात स्त्रियानाही तीच सवलत हवी हा आग्रह निर्माण होण्याऐवजी नसत्या पळवाटा शोधल्या जात आहेत शिवाय कौमार्यरोपण सहजसाध्य होत गेले तर विवाहपूर्व व्यभिचार व लैंगिक अनाचाराला–स्वैराचाराला प्रतिष्ठा नाही तरी 'पद' प्राप्त होईल ! एका पाऊण तासाच्या लोकल अॅनास्थेशियाने होणाऱ्या शस्त्रक्रियेसाठी १५ ते २० हजार रुपये चार्ज, तोही ब्लॅक मनी हा निव्वळ ब्लॅक मेलीगचा वैज्ञानिक प्रकार ठरेल कौमार्यरोपण शस्त्रक्रियेतही पुन्हा दोन प्रकार असून त्यापैकी एक बेभरवशी आहे तेव्हा ती करून गुण येईलच याची तशी खात्री नाही. याउलट बगलोरच्या एका प्रसिद्ध महिलाप्रसूतितज्ज्ञ डॉक्टरणीने 'हायमेन'चीच (कौमार्यपटलाची शस्त्रक्रिया विवाहापूर्वी करून घेण्याने विवाहोत्तर वेदनाना (सभाव्य) आळा घाला' असा प्रचार करून कौमार्यपटलाच्या महत्त्वाला 'छेद' देण्याचा उपक्रम अगिकारला आहे ती खरी समाजसेवा आहे 'योनिशुचिता' ही सकल्पना बळावल्याने भारतीय नारी पिळवणुकीच्या कर्दमात लोटली गेली, हे डॉ लोहियाचे विचार मोलाचे आहेत कारण कौमार्यपटलभग भीतीनेही कित्येक जणीचें विवाहोत्तर जीवन त्या धक्क्याने मनोव्याधिग्रस्त झाल्याची उदाहरणे कमी नाहीत नवरीचे कौमार्य अबाधित हवे, ही

अपेक्षा रास्त असेलही; परंतु ती अट म्हणून 'मस्ट' ठेवणे अनिवार्य असणे याचा अर्थच आपण दुहेरी नीतिमत्तेचा पुरस्कार सोडण्यास तयार नाही. कौमार्यरोपणाची शस्त्रक्रिया 'परव्हर्स' ( perverse ) तेवढीच व्हल्गर ( vulgar ) आहे. तेवढाच तो मॉडर्न मेडिकल टेक्नॉलॉजीचा दुरुपयोगी आहे. ज्याला Amniocentesis म्हणतात ती गर्भ–लिंग–चिकित्सा असाच भयंकर रानटी प्रकार आहे. ( ही क्रिया गर्भातील जीवाचे लिंग जाणून घेण्याची टेस्ट आहे ) गर्भातील जीव मुलगी असेलतर गर्भपाताचा मार्ग खुला होतो! तेव्हा 'मार्ड' जी वैद्यकीय शिक्षणाची चिकित्सा करून, विनशर्त संप मागे घेण्यात 'पुरुषार्थ' दाखविते, त्यांनी कौमार्य–रोपणाविरुद्ध जनतेत जागृती करून इशारे द्यावेत. अगदी प्राचीन हिंदू तत्त्वज्ञानग्रंथातही शारीरिक पापे मानसिक पापांहून कमी दर्जाची मानली गेली आहेत. तेच मानसिक व शारीरिक कौमार्याचे बाबतीत, विशिष्ट मर्यादेत खरे नाही का? स्त्रीदेह हा नदीप्रमाणे सतत पवित्र आहे. प्रत्येक मासिक धर्मानंतर तो शुद्ध होतो. ( इति–मनु ) व 'स्त्री रत्नं दुष्कुलादऽपि' हे सांगणारा चाणक्य इसवीसनापूर्वी होऊन जाऊनही, एवढे विचार जरठ किंवा सनातनी नाहीत. जेवढे आजचे ढोंगी पुरुष आणि कौमार्य–पटल रोपित तरुणी आहेत. अर्थात कौमार्यपटलरोपण करणाऱ्या डॉक्टरांच्या ढोंगाला तर तुलना नसे. त्यांच्या दृष्टीने तासात १५ ते २० हजारांची प्राप्ती एवढा गल्लाच महत्त्वाचा ठरतो. असे व्यभिचारी डॉक्टर्स इतरांना काय कुलीन कुमारपण देणार? □

# सूटकेस

● अनुवाद : श्रीकांत लागू ●




सरत्या ऑक्टोबरमधला एक दिवस. संध्याकाळच्या वेळेला थोरपेस्टेशनवर अल्बर्ट रँक थंडगार वाऱ्यात कुडकुडत होता.

अंगावर एक जुनाट वॉटरप्रुफ जाकोट होतं, हातात एक छोटीशी सूटकेस होती. स्टेशनवर रचलेल्या लगेजच्या आडोशाला उभा होता. आपल्याला कुणी सहज पाहू नये अशी त्याची इच्छा स्पष्ट कळत होती. त्याचं कारणही अगदी स्वच्छ होतं. म्हणजे त्याची कामगिरीच तशी भीषण होती. एका माणसाचा–त्याच्या शत्रूचा–खून करण्याचा त्याचा बेत होता. डेव्हिड टर्नरचा खून!

रँक उत्तरलंडनमधल्या एका छोट्या हॉटेलात हरकाम्या नोकर होता. जुगाराचा जबरदस्त नाद होता आणि त्यात हरतही होता. जुगारात आलेली जबरदस्त तूट भरून काढण्याच्या इराद्यानं एका छोट्या दुकानाच्या गल्ल्यावर डल्ला मारला होता. तेव्हा म्हाताऱ्या दुकानदाराच्या हातात नेमका सापडला. त्याच्याशी झटापट करून निसटून जाताना रँकनं त्याला ढकलून दिलं होतं. म्हाताऱ्याचं डोकं खाली पडताना दुकानाच्या पायरीवर आपटलं. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रावरून रँकला कळलं की, म्हातारा खपला होता!

हे प्रकरण एवढ्यावर थांबायचं नव्हतं. डेव्हिड टर्नरनं रँकला त्या रात्री त्या दुकाना-

तू न बाहेर पडताना पाहिल होत त्यानं ही बातमी वाचून एक नि एक दोन करून रॅंकला गाठल रॅंकन केलेल्या लूटीतला अर्धा वाटा आणि आठवड्याला दोन पौंड म्हणजे रॅंकच्या आठवड्याच्या मिळकतीतील अर्धा भाग एवढी खडणी टर्नरन गप्प रहाण्याकरता मागितली तो म्हणाला, 'मी पोलिसाना सागितलय् की दुकानातून उतरणाऱ्या माणसाचा चेहरा पाहिलाय, पण नक्की कोण ते आठवत नाही तू खडणी दिली नाहीस तर मला ते केव्हाही आठवू शकेल' रॅंकला सत्यपरिस्थितीची जाणीव झाली आणि तो थरकला

रॅंकन हप्ता द्यायला सुरवात केली, पण निर्माण झालेल्या विचित्र परिस्थितीनं धुमसत राहिला टर्नर जोपर्यत जिवत आहे तोपर्यत जिवाला लागलेला घोर कायम राहणार टर्नरला खतम करायचा या एकाच विचारान तो पूर्ण वेढला गेला

कळत न कळत त्याच्या मनात योजना पक्की झाली टर्नर मेल, एक्सप्रेस गाडीवर गार्ड होता त्याला त्याच्याच डब्यात एकट गाठायच आणि मग...

तेवढ्याचसाठी त्यान आपल्या अगरख्याच्या आत लोखडी टोक असलेला वजनदार सोटा लपवलेला होता लडनकडे जाणाऱ्या गाडीची वाट पहात उभा होता. घड्याळाबरहुकूम साडेपाच वाजता गाडी आली आधी केलेल्या पाहणीप्रमाणे भोजनयान शेवटून सहाव होत तसच, भोजनयान आणि गार्डाचा डबा याच्यामधले पाच डबे एका बाजूला बोळ असलेल्या पद्धतीचे होते त्या डब्याच्या टोकाला सामानाचे कप्पे आणि शौचालये होती त्याला हेही पक्क माहित होत की या गाडीला एकच गार्ड आहे आणि तो म्हणजे त्याचा शत्रू—डेव्हिड टर्नर!

इतर प्रवाशाच्या गर्दीत सहजपणे मिसळून रॅंक गाडीपर्यत आला भोजनयानानतरच्या डब्यात सगळ्यात शेवटी चढला एका कप्प्यात आपली सूटकेस ठेवली आणि लगेच पुन्हा प्लॅटफॉर्मवर उतरला रेगाळत चालत शेवटच्या डब्यापर्यत गेला हळूच आत चढून टोकाच्या सडासात शिरला आणि आतून कडी लावून घेतली हे सर्व करताना हातात हातरमाल धरायला विसरला नव्हता काही क्षणातच गाडी हलली.

थोरपेनतर पुढच स्टेशन सेलकास्टर एक तासानतर येणार होत त्यान तिकीटसुद्धा तिसऱ्या वर्गाच एवढेच सेलकास्टरपर्यतच काढल होत. त्या एक तासात सगळ्या डब्याच्या बोळात कुणाची वर्दळ होणार नाही या गोष्टीवर त्याची भिस्त होती कारण एक तर या दिवसात गाडीला गर्दीही फारशी नसते आणि जेवणाच वाटपसुद्धा सेलकास्टरनतर सुरू होत असे

ठरल्या वेळी तो सडासातून बाहेर पडला. गार्डाच्या डब्याला जोडणाऱ्या डुगडुगणाऱ्या बोगद्यातून गार्डाच्या डब्यात शिरला त्याला पहाताच टर्नर जागेवरून उडालाच

'बाप रे, रॅंक! काय, विचार काय आहे तुझा?'

'काही नाही. तुझ्याकडे छोटसं काम होत टर्नर'

'नाही, नाही इथे नाही या डब्यात तुला कुणी पाहिल तर माझी गच्छन्ति होईल!'

'अरे, एक मिनिटाच काम आहे माझ्याकडे एक योजना आहे चिक्कार पैसे मिळतील, पण त्यासाठी दोघाची गरज आहे तू येशील माझ्याबरोबर?'

पैसा म्हटल्यावर टर्नरला एकदम तोडवेना तो काही बोलणार एवढ्यात रॅंकन खिशातून कसलासा कागद काढला त्यावर कुठल्या तरी घराचा नकाशा चितारला होता 'हे बघ, या घरात खूप मौल्यवान वस्तू आहेत आणि तिथ कुणीही रहात नाही. पहाराही नाहीये'

टर्नर सहाजिकच तो नकाशा पहाण्याकरता खाली वाकला. तो क्षण साधून रॅंकन तडाखा हाणला. टर्नरन एक आचका दिला आणि तोडावर कोसळला!

रॅंकन आपला सोटा बाजूला ठेवला आणि उभा राहिला तेव्हा घामान नुसता निथळत होता खरा धोका आता यापुढेच 'आ' वासून उभा होता दुसरा एखादा प्रवासी त्याच वेळेला गार्डाच्या डब्यात आला असता तर रॅंकच्या गळ्याभोवती फास पडायला वेळ लागला नसता तिथून शक्य तितक्या लवकर सटकायला हव होत

पण कार्य अर्धवट टाकून जाण म्हणजे सर्वनाशाला आमत्रणच यापुढे सेलकास्टरपर्यतच प्रवास सूटकेस ठेवली होती तिथल्या जवळच्या सडासात लपून प्रवास करण आवश्यक होत कारण सेलकास्टरला गाडी थाबली की, हमालाचा घोळका गाडीच्या डब्याजवळ सामानासाठी वाट पहात असणार वर, सडासापर्यत जायचं तर मधल्या डब्यातील कोणाच्या लक्षात येणार नाही अशा तऱ्हेन जाण आवश्यक होत; पण हे सर्व कस पार पाडायच याची योजना त्यान आधीच पक्की केली होती

तो नकाशाचा कागद खिशात घातला. खिशातून रबरी हातमोजे काढून हातावर चढवले. हात घट्ट आवळून पुढच्या कामाला लागला खाली गुडघ्यावर बसून टर्नरचा युनिफॉर्म काढू लागला अपेक्षेपेक्षा काम जरा अवघडच निघाल जसजसा वेळ जाऊ लागला तसतसा रॅंक अधीर होऊ लागला. शेवटी एकदाचा निघाला आपल्या असलेल्या कपड्यावरच त्यान युनिफॉर्म चढवला हे करता याव म्हणूनच अगावर जाड गरम कोट न घालता स्टेशनवर कुडकुडत उभा होता टर्नर उचीला त्याच्याएवढाच होता, पण जास्त भरदार असल्यामुळे युनिफॉर्म कपड्यावर चढवल्यामुळे छान फिट्ट बसला या गोष्टीचा विचार त्यान आधीच केलेला होता. त्यान तोडात रबरी तुकडे बसवून चेहरा फुगीर केला. टोपीच छप्पर डोळ्यावर ओढल आणि आपल्याला त्या अवतारात कुणी ओळखणार नाही याची खात्री करून घेतली किंवा डब्याच्या बोळकडीत अतिशय मद प्रकाश होता, त्याचाही फायदा मिळणार होता

निघताना आणखी एक काळजी घ्यायची होती. डबा सोडताना लगेजच्या राशीमधे थोडी जागा करून टर्नरच प्रेत ओढून लपवल, आजूबाजूला ७/८ सूटकेसेस रचून ठेवल्या. सेलकास्टरला खून उघडकीला येणारच होता, पण निदान तो स्टेशनबाहेर पडून अदृश्य होईपर्यत वेळ मिळायला हवा होता

डब्यातून निघताना मागे वळून काही राहिल नाही ना याची खातरजमा करून घेतली. आपला सगळा धीर एकवटून तो निघाला. अत्यत सथ, सराईतपणे मधल्या डब्याच्या बोळातून चालू लागला त्याच्या नशिबान त्याला वाटेत कोणीही भेटल नाही- पाचव्या डब्याच्या टोकाला पोचल्यावरोबर मागच दार ओढून घेतल आता तो डब्याच्या

अगदी टोकाला म्हणजे सडास, सामान ठेवायची जागा आणि जेवणाच्या डब्याला जोडणारा डुगडुग बोगदा एवढया छोटयाशा जागेत होता त्यान आपली सूटकेस उचलली आणि सडासात शिरून दाराला कडी घातली. इतका वेळ रोखून धरलेला श्वास त्यान सोडला मनावरचा ताण एकदम उतरला सगळयात अवघड भाग पार पडला होता

सूटकेसमधे त्याचा ओव्हरकोट आणि हॅट होती. ते बाहेर काढल आणि अगावरचा युनिफॉर्म झटपट काढला. आतल वॉटरप्रुफ जाकिट वाढल, सोटा, रबरी हातमोजे या सगळया वस्तू सूटकेसमधे भरल्या त्याच्या योजनेमधे सूटकेस थोडी वजनदार असण आवश्यक होत वर ते जे काय वजन वापरायच त्यान फार जागाही व्यापली जाता कामा नये त्यासाठी शोधलेली वस्तू फार नामी होती. तो ज्या हॉटेलात काम करत होता तिथल्या हॉलमधल्या हिवाळी शेगडीच लोखडी बिडाच दार होत. नुकतच त्या दाराचं एनॅमल खराब झाल्यामुळ नवीन दार बसवल होत आणि जुन कचऱ्याच्या डब्यात फेकल होत रॅंकन फार विचारपूर्वक हे दार उचलल होत कारण कचऱ्याच्या डब्यातल दार कुठ गेल याची कोणी चौकशी करणार नाही आणि केलीच तर सफाई–कामगारानं नेल असणार अस समजायला काहीच हरकत नव्हती.

गाडीचा वेग यथावकाश कमी होत होत गाडी सेलकास्टरस्टेशनात येऊन थावली. रॅंक बाहेर पडला आणि ना रेगाळण ना घाई अशा सय चालीन निघाला दारापाशी इतर प्रवाशाच्या घोळक्यात शिरून इमानान, तिकीट दिल आणि बाहेर पडला. बाहेर पडला मात्र त्याला एकदम गळून गेल्यासारख झाल सगळा ताण एकदम सुटला. तो आता जवळपास पूर्ण सुरक्षित होता. एक आणखी छोटीशी काळजी घेतली की तो अगदी पूर्णपणे निर्धास्त होणार होता।

त्याला सेलकास्टरची बऱ्यापैकी माहिती होती. किंबहुना या कार्यासाठी त्यानं ती आधीच करून घेतली होती. नदीच्या रोखानं तो चालू लागला आणि गावाच्या टोकाला असलेल्या एका पुलापर्यंत पोहोचला. वारा जरी थावला होता तरी बऱ्यापैकी थडी होती साहजिकच रस्त्यावर माणसं अगदी तुरळक होती रॅंक पुलावर गेला. तिथं चिटपाखरूं सुद्धा नव्हत अर्ध्या पुलावर येताच खिशातून एक लाब दोरी काढली सूटकेसला बाधली. सूटकेस पाण्यापर्यंत सोडली आणि नीट बुडतेय याची खात्री करून दोरी सोडून दिली कसलाही आवाज न करता बॅग बुडाली. सूटकेस वजनदार व्हायला हवी होती ती एवढयासाठी रॅंक गावामधे आला आणि रेक्सबरोला जाणाऱ्या बसमधे चढला रेल्वेशी समातर दक्षिणेला पधरा मैलावर हे गाव होत तिथ उतरून इकडे तिकडे भटकून वेळ काढला आणि लडनकडे जाणाऱ्या पुढच्या गाडीचं एकेरी तिकीट काढून निघाला. सगळा प्रवास निर्वेधपणे पार पडला.

तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसला आणि घडलेल्या सर्व घटनाचा नीट विचार केला. ह! खरच पूर्ण निर्धास्त व्हायला हरकत नव्हती कसलाही पुरावा त्यान माग ठेवला नव्हता कितीही चतुर, डोकेबाज गुप्तहेर आला तरी कसलाही थाग लागला नसता. त्याचे आणि टर्नरचे काही सबध आहेत ही गोष्टच कुणाला ठाऊक नव्हती. दुकानातल्या मुलीन त्याचा चेहराच पाहिला नव्हता कुठल्याही तऱ्हेन त्याचा टर्नरच्या किंवा दुकानदाराच्या खुनाशी संबध जोडता आला नसता

प्रत्यक्ष खुनाची क्रिया सोडता इतर बाबतीतही त्यानं अतिशय दक्षता घेतली होती. सूटकेस, टोपी आणि रेनजाकोट पूर्वलंडनमध्ये वेगवेगळया दुकानातून घेतल्या होत्या. खरेदीच्या वेळी मेक-अप करून चेहराही बदलला होता

टर्नरच्या खुनाच्या दिवशी सबध दिवसाचा कार्यक्रम ठरवताना आणि अमलात आणताना काळजी घेतली होती. तो दिवस कुठे आणि कसा घालवला हे सिद्ध करण्याची अगदी जय्यत तयारी केली होती. नॉटफील्डला त्याच्या जन्मगावी तो गेला होता निरनिराळया हॉटेलातून नोकरीकरिता चौकशी करत हिंडला होता लडनमधील नोकरी सोडून या लहान गावात नोकरी कशासाठी तर जुगारामध्ये हरल्यामुळे कायमच कर्ज डोक्यावर घेऊन लडनमध्ये उजळ माथ्यानं हिंडण अशक्य झालं होत दुसरीकडे कुठे तरी नशीब काढाव म्हणून नॉटफील्ड खरोखरच चौकशी करत हिंडल्यामुळे तिथल्या हॉटेलमालकानी तो नॉटफील्डमध्ये असल्याची खातरजमा दिली असती आणि नॉटफील्डहून थोरपेला बसमधून प्रवास केल्याची साक्ष देणारा कोणी निघेल अशी शक्यता फारच कमी होती. कारण जेमतेम तासाभराचाच प्रवास होता.

त्याची गाडी किंग्ज क्रॉस स्टेशनात रात्री साडेनऊला पोचली कुणी हटकलंच तर नॉटफील्डहून सरळ सेंटपॅंक्रॉसला दहा वाजून दहा मिनिटानी येणाऱ्या गाडीन आली अस सागायचं त्यासाठी चालत सेंटपॅंक्रॉसला गेला. दहा-दहाची गाडी आल्यावर रीतसर घरी गेला दहा-दहानतर आपण आलो याचा निश्चित पुरावा असावा म्हणून घरमालकिणीशी उगीच अवातर गप्पा केल्या. जेवण मिळेल का वगैरे विचारलं आता सर्वार्थानं तो निश्चित झाला होता

रॅंक सतत समाजाच्या विरोधात फटकून राहत असे, पण त्याच्या दुर्दैवाने न्यू स्कॉटलडयार्डचे सुपरिटेंडेन्ट फ्रेंच हे त्याच समाजाचं प्रतिनिधित्व करत होते श्री फ्रेंच याच्या दृष्टीन या प्रकरणाची सुरुवात एका टेलिफोनकॉलमुळे झाली सेलकास्टरहून चीफ कॉन्स्टेबलन खुनाची इत्थभूत वार्ता सागून, टर्नर हा लडनचा असल्यामुळे प्रकरण स्कॉटलडयार्डकडे सोपवल. 'आमचे इन्स्पेक्टर कटलर त्या गाडीबरोबरच निघाले आहेत रात्री नवापर्यंत तुमच्याकडे पोचतील.'

यथावकाश कटलर आल्याची वर्दी मिळाली 'या, या इन्सपेक्टर, काय गडबड झाली सेलकास्टरमध्ये? फ्रेंचसाहेबानी स्वागत केल !

कटलरन स्वागताचा स्वीकार करून सागितल की, दुसरा गार्ड मिळाल्याबरोबर गाडी सोडली आणि गाडीच्या डब्यामध्येच चौकशी करायची सूचना मिळाली होती

फ्रेंच–'सागा काय काम निघाल चौकशीत ?'

कटलरन भोजनयानापासून सुरुवात केली होती त्या डब्यातून कोणीही इकडून तिकडे गेलं नसल्याची ग्वाही तिथल्या प्रत्येक कर्मचाऱ्यान दिली. त्यामुळं गुन्हेगाराची हालचाल मागच्या पाच डब्यामध्येच झाली असली पाहिजे. त्या डब्याच्या तपासणीतही काहीच निष्पन्न झालं नाही कटलरनं त्या डब्यामधल्या उतारूचे नाव–पत्ते उतरून

घेतले त्याच्याकडे [चौकशी केली तोपर्यंत किंग्ज कॉसस्टेशन आलसुद्धा

बऱ्याच उतारूनी थोरपेहून गाडी सुटल्यानतर काही वेळान गार्ड डब्याच्या बोळातून पुढे गेल्याच पाहिल होत, पण तो परत आपल्या डब्याकडे गेल्याच मात्र कुणीच पाहिल नव्हत तो मनुष्य खरोखरच अदृश्य झाला होता आणखी एक गोष्ट लक्षात आली होती, ती म्हणजे कुठलाही उतारू दोन ते तीन मिनिटापेक्षा आपल्या जागेवरून हलला नव्हता

'आहे खरा गुतागुतीचा मामला!' फ्रेंच म्हणाले 'तुम्हाला बरीच खटपट करावी लागणार आहे आमच्या बाजून काय काम करता येण्यासारख आहे ते पहातो'

फ्रेंच आपल्या शब्दाला जागणारे होते पुढच्या एक-दोन दिवसात केलेल्या चौकशीतून बऱ्याच गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या ख्रिस्तवासी गार्ड वसतिगृहात एकलकोडा रहात असे. समाजात फारसा मिसळत नसे. पैशाच्या बाबतीत जरासा 'हा' होता. एकूण आजूबाजूच्या परिसरात फारसा लोकप्रिय नव्हता तरीसुद्धा त्याला कुणी जबरदस्त शत्रू होता अस मात्र दिसत नव्हत

सेलकास्टरहून मिळालेल्या माहितीनुसार गार्डाचा युनिफॉर्म शोधण्याचे प्रयत्न असफल झाले होते कुठल्याही डब्यात, स्टेशनवरच्या सगळ्या लपवण्यासारख्या जागा, अगदी रेल्वेमार्गसुद्धा तपासून झाला होता सेलकास्टरमधून बाहेर पडणाऱ्या कुणाच्याही अगावर दिसला नव्हता

फ्रेंच यानी लुडलो इन्स्पेक्टराची नेमणूक लडनमधल्या चौकशीच्या कामावर केली होती त्या दोघाची चर्चा चालू होती फ्रेंच विश्लेषण करत होते. 'टर्नर हा एकच गार्ड गाडीवर होता, त्याचा युनिफॉर्म गायब आहे, तेव्हा एक गोष्ट स्पष्ट होते की गार्डाचा युनिफॉर्म घालून कोणी तरी डब्यातून पुढे गेल, त्या अर्थी तोच मनुष्य खुनी असला पाहिजे!'

'मलाही तेच वाटत' लडलो

'त्यातूनच आणखी गोष्टी जाणवतात. खुनी उचीन टर्नरएवढाच आणि अगान मात्र त्याच्यापेक्षा किरकोळ असावा. कारण त्याच्याशिवाय अगावर असलेल्या कपड्यावर युनिफॉर्म फिट्ट बसणार नाही.'

लुडलो खुशीत येऊन माडीवर थाप मारत म्हणाला, 'फारच ग्रेट, साहेब! माझ्या हे डोक्यातच आल नाही!'

'आणखी एक गोष्ट' फ्रेंच पुढ म्हणाले, 'खुनी सेलकास्टरलाच उतरला असला पाहिजे कारण सडासात, बोळात कुणीही नव्हतं आणि 'त्या' प्रवासात कुणीही बाहेरच डब्यातही आल नाही·

'ज्या अर्थी युनिफॉर्मचा ठावठिकाणा कुठेच लागत नाही त्या अर्थी मारेकऱ्यान तो आपल्याबरोबर नेला असला पाहिजे तो अगावर युनिफॉर्म घालून बाहेर गेलेला नाही. तसच गमतीन हातावर कोट टाकूनही जाण शक्य नाही. तेव्हा त्यान तो युनिफॉर्म कशात तरी दडवून नेला असणार त्यासाठी त्यान काय वापरल असेल?'

सर्व परिस्थिती लक्षात घेता सूटकेसचाच वापर केला असणार यावर दोघाच एकमत झाल फ्रेंच यानी तपासमार्गातला पहिला मैलाचा दगड निश्चितच गाठला होता

'आणखी एक पाऊल पुढ जाऊ' फ्रेंच बोलत राहिले 'विचार असा करायचा की, तुम्ही खुनासारखा गभीर गुन्हा केला आहे आणि महत्त्वाचा पुरावा-युनिफॉर्म तुमच्याजवळ आहे, तर तुम्हाला चैन पडेल का?'

लुडलो हसत म्हणाले, 'त्यापेक्षा नायट्रोग्लिसरिनचा डबा माझ्याजवळ असेल तर जास्त बर वाटेल'

'अगदी बरोबर कारण जर सापडलात तर फाशी नक्की! तेव्हा शक्य तितक्या लवकर ती सूटकेस हातावेगळी करायला हवी सेलकास्टरमध्येच लडनला येईपर्यंत थावण अशक्य म्हणजे सेलकास्टरमधल्या मडळींना काम आल.

फ्रेंचनी सेलकास्टरच्या चीफ कॉन्स्टेबलना फोन लावला.

'आम्हाला तुमच्या विचारदिशेची कुणकुण आधीच लागली आहे, त्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत' फोनवर उत्तर 'आम्ही त्या दिशेनं हालचाल सुरू केली आहेच. सूटकेसच्या शोधासाठी मोठ इनामही जाहीर केल आहे सर्वसामान्य नागरिकाना मज्जाव असलेल्या जागाही आम्ही शोधत आहोत'

'एक सूचना करतो. कचरासाठवणीच्या जागाचाही तपास घ्या!'

'त्याही तपासण्याच काम चालू आहे'

'नदी? नदीच काय?'

'नदीवर काही जागा आहेत जिथे कुणाच्याही लक्षात न येता वस्तू टाकता येईल एक घाट आहे, दोन पूलही आहेत आम्ही त्याही जागी खोलवर शोधायचा प्रयत्न करतो आहोत'

'झकास! जर तिथे असेल तर नक्की मिळेल!' फ्रेच याची खात्री झाली की ते स्वत सुद्धा यापेक्षा जास्त काही करू शकले नसते

तपश्चर्येला लवकरच फळ आल पाणबुड्याच्या प्रयत्नाना यश मिळाल आणि फ्रेंच जेव्हा दोन दिवसानी आपल्या ऑफिसात आले तेव्हा ती सूटकेस त्याची वाट पहात होती सूटकेस सापडल्याची बातमी अत्यत गुप्त ठेवली आहे अशी चिठ्ठीही सोबत होती

मैलाचा दुसरा दगड गाठला होता

चौकशीन आता वेगळच वळण घेतल. सूटकेस, रेनजाकीट, टोपी, सोटा आणि लोखडी दार या वस्तूचा माग काढण्याच काम फ्रेंच यानी वेगवेगळ्या सहकाऱ्यावर सोपवलं पहिल्या चार वस्तूच्या बाबतीत निराशाच पदरी पडली, पण फ्रेंच याच्या मार्गदर्शनाखाली पाचव्या वस्तून मात्र आशेचा किरण दाखवला

शेगड्याच्या उत्पादकाकडून म्हणजे त्या विशिष्ट प्रकारच्या शेगड्याच्या-ज्याना ज्याना गेल्या काही आठवड्यात बदली दरवाजे पुरवले गेले आहेत त्याची यादी गोळा केली गेली. लुडलो लडनमधल्या खरेदीदाराकडे फिरू लागले यथावकाश रँक काम करत असलेल्या हॉटेलात पोचले हॉटेलच्या मालकीणबाईनी ते दार पहाताच ओळखल लुडलोनी आणखी खोलात उडी मारली आणि हाती लागल ते अस. तिथला हरकाम्या नोकर टर्नरच्या उचीचा आणि किरकोळ होता! गेले काही दिवस चिंताक्रात दिसत होता. गुन्हा घडला त्या दिवशी तो रजेवर होता इतकी माहिती मिळताच लुडलोच रक्त सळसळू लागल रँकवर पाळत ठेवायला एकाला सागून ते तडक स्कॉटलडयार्डमध्ये गेले

'छान कामगिरी केलीत!' फ्रेंचनी शाबासकी दिली 'आपल्याला हवा असलेला

मनुष्य तोच यात सशय नाही; पण आणखीही काही पुरावा हवा त्या दिवसाच्या आपल्या कार्यक्रमाविषयी त्यान काही तरी बहाणा तयार ठेवला असणार, पण आपण तो उधळून लावू घेऊन या त्याला'

अशा तऱ्हेन मैलाचा तिसरा दगड गाठला आणि पारही झाला!

खुनाच्या घटना घडल्यानतर रँकची मानसिक अवस्था अत्यत विचित्र झाली होती. कसले कसले भास होत होते दिवाभीत झाला होता. जुगाराच्या कर्जासोबत आता भीतीच सावटही त्याच्या राशीला लागल होत हॉटेलवर सशयास्पद माणस, पोलीस दिसू लागले. त्याना पाहताच त्याची केविलवाणी अवस्था व्हायची, हातापायाना कप सुटायचा छातीत प्रचंड धडधड सुरू व्हायची भूतकाळाचा विसर पडण्यासाठी तो आता कसलीही किमत द्यायला तयार होता या सगळ्या विचारान तो अत्यत अगतिक झाला होता

एके दिवशी हॉटेलात शिरताच रँकला दोन धिप्पाड माणसं त्याची वाट पहाताना दिसली मात्र, त्याच्या पायात शिशाचे गोळेच भरले, पण ते दोघे त्याच्याशी अत्यत मऊपणे, सौहार्दान बोलू लागले त्यांनी मान्यच करून टाकलं की, आपण पोलीस आहोत आणि ते करीत असलेल्या तपासात त्याची मदत होईल अस वाटल्यावरून ते भेटायला आले होते. सुप फ्रेंच ती केस हाताळतायत, तर त्याना भेटायला स्कॉटलँडयार्डमध्ये यायला तुझी हरकत नाही ना असही रँकला विचारल

मोटारीत अत्यत शाततामय वातावरणात रँक जरा सैल झाला आपल सगळ धैर्य एकवटल त्यानं बहाणा तर पक्का तयार केलेला होता. आपल मन ठिकाणावर ठेवून त्याच गोष्टीला चिकटून रहायच एवढच त्याला आता करायच होत

फ्रेंचनी बोलायला सुरुवात केली आणि एकदम मुद्द्यालाच हात घातला त्यामुळं रँक जरा धास्तावलाच. अत्यत गभीर आवाजात फ्रेंचनी सागून टाकल की, टर्नरचा खून झालाय आणि त्याच सबधात ही चौकशी आहे असंही सुचवल की, प्रश्नाना उत्तर द्यायची नसतील तर तशी मोकळीक आहे

'आमच्या माहितीप्रमाणे खुनाच्या दिवशी तू रजेवर होतास. तर त्याबद्दल तुला काही सागायची इच्छा आहे काय?'

रँक जरा मोकळेपणी श्वासोच्छ्वास करू लागला ज्या गोष्टीची त्यान अपेक्षा केली होती, त्या उत्तरासाठी त्यानं तयारीही तशीच जबरदस्त केली होती आणि त्याच उत्तर खरही होत फक्त गडबड होती ती सध्याकाळी चार ते आठ या वेळासबधी त्याबाबत त्यानं खुलासा केला की, सध्याकाळी एका कॅफेमध्ये जेवण घेतल आणि आपल्या तरुणपणातल्या आठवणी जाग्या होतील अशा ठिकाणाना भेटी देत भटकलो

उत्तर सगळ छान सुरळीत चालू होत फ्रेंचही मन लावून ऐकत होते. अचानक त्यानी एक आडवळणी प्रश्न विचारला, 'नोकरीसाठी नॉटफील्डमध्ये हिडत होतास? मला काही उलगडा होत नाहीये. म्हणजे समजा तुला तिथे नोकरी मिळाली असती तर तुझ्या मालकीणबाईना न कळवता तू तिथच रहाणार होतास?'

रँकला त्या अनपेक्षित प्रश्नाचा नीट बोधच झाला नाही, पण त्यान तात्काळ उत्तर मात्र दिल. 'छे! छे! अस कस? मी परत लडनला आलो असतो आणि राजीनाम्याची नोटीस दिली असती'

फ्रेंचनी मान डोलावली. 'अच्छा, म्हणजे त्या रात्री तिथे रहायच्या तयारीन तू गेला नव्हतास.'

'नव्हतोच रहाणार'

'अस होत तर मग ते बरोबर कशाला नेल होतस?' फ्रेंचनी शातपणे विचारल

हा प्रश्न विचारताना बाजूच्या टेबलाकडे त्यानी अगुलिनिर्देश केला आणि रँकच्या दृष्टीत अकस्मात 'आ' वासून उभी असलेली त्याची सूटकेस भरली. रँक भीतीनं अवाक् झाला. त्या सूटकेसमधून सोटयाच्या आणि युनिफॉर्मच्या कडा त्याच्याकडे रोखून पहात होत्या तो गर्भगळित झाला आणि चक्कर येऊन धाडकन् पुढे कोसळला! ☐


**उसानंतरची नवी लाट .... निलगिरी लाट**

अनिश्चित पाण्यावरही हमखास उत्पन्न देणारे
दणकट पीक .... निलगिरी !

यां पिकाची सविस्तर माहिती देणारे मराठीतील पहिले पुस्तक

**निलगिरीची शेती**

किंमत : रुपये पंधरा

**लेखक : विनायक पाटील**

पुस्तक मिळण्याची ठिकाणे—

**( १ ) नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी संस्था, लि.**
संदीप अपार्टमेंटस्, त्रिंबक रोड, नाशिक ४२२ ००२

**( २ ) राजहंस प्रकाशन, नागनाथपाराजवळ,**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

१५ रुपये म. ऑ. ने पाठवल्यास ट. ख. माफ.
पुस्तक रजि. पोस्टाने पाठवले जाईल.




# हिंदुपरंपरेच्या अध्यापनात व चर्चेत रंगलेला काळ

## (७)

प्रा. स. शि. भावे

'**ल**हान, मध्यम नको. मी १५० मिनिटांचा मोठा तास घेईन !' एक दिवस विचार करून मी लँगवर्दीला सांगितले.

खरे म्हणजे मी विचार असा फारसा केलाच नाही. दीडशे मिनिटांचा तास असू शकतो या नव्या शोधावरच मी खूष होतो. म्हणून तो मोठा 'तास' मी पत्करला.

खरा विचार माझा वेगळाच चालू होता. छोटा–मोठा–मध्यम अशी तासाची निवड शिक्षक म्हणून मी करू शकत होतो–या अपूर्व स्वातंत्र्याने मी सुखावलो होतो... अभ्यासक्रम ठरविण्याचे स्वातंत्र्य, अध्यापनाच्या तासाला वेळ किती याचे स्वातंत्र्य, अध्यापनपद्धतीचे स्वातंत्र्य, परीक्षापद्धतीचे स्वातंत्र्य. शिक्षक––विद्यार्थी–अभ्यासाचा विषय असे त्रिकूट ठरले आणि एका सेमेस्टरचा काळ ठरला, की बाकी सारे स्वातंत्र्य !

पण स्वातंत्र्य ही जशी संधी असते तशी मोठी जबाबदारी देखील. ते मी थोडेसे विसरलो होतो. २७ मार्चला मी माझे पहिले 'सेशन' घेतले, त्या वेळी हे जबाबदारीचे मनावर चांगले बिंबले.

वेळ : दु. १२–३०. स्थळ : Leighton Hall मधील ४०२ क्रमांकाची खोली. भूमिका : वीस उत्साही विद्यार्थी, एक गंभीर चेहऱ्याचा पण खळाळून हसणारा संचालक रसेल लँगवर्दी,...आणि एक वरून प्रसन्न पण आतून जरा गडबडलेला शिक्षक –मी.

'अॅज यू नो, हिअर इज प्रोफेसर भावे ऑफ द फर्गसन कॉलेज, पूना...' रसेलने प्रस्तावना केली आणि खाली बसताना माझ्याकडे पाहून जवळजवळ ओरडलाच, 'नाउ, इट इज युअर क्लास, सदाशिव. शूट ऑन !'

परदेश. परके विद्यार्थी. उत्साही आणि हसतमुख (दिसत) असले म्हणून काय झाले. विद्यार्थीच ते. पहिलाच तास म्हटल्यावर ते माप काढायला बसले असणारच. मनात अशी अस्वस्थता होती. २–४–६ सेकंद उलटत होती...आणि एकदम शिक्षकाच्या अनुभवी मॅन्युअलमधले महत्त्वाचे सूत्र आठवले : 'उत्तर देण्यापेक्षा प्रश्न विचारणे सोपे.' माझी समस्या सुटली. एव्हाना आणखी चार सेकंद निघून गेली होती. अशा दहा–बारा सेकंदांच्या आद्य मौनानंतर, परदेशी कॉलेजच्या वर्गात, माझे शिकवण्याचे पहिले वाक्य बाहेर पडले.

मी विचारले, 'तरुण मित्रांनो, मी तुम्हाला आमच्या हिंदुपरंपरेप्रमाणे हा विषय शिकवला तर तुम्हाला आवडेल का ?'

'हो हो. अवश्य. नक्कीच !' अनेक रंगीबेरंगी आवाजातले आवेशपूर्ण होकार खिदळण्यासह उधळले गेले.

'मग मी गप्प बसतो आणि तुम्हीही गप्प बसा !' मी म्हणालो.

'व्हॉट्स द ट्रिक ?' प्रश्नांचा कोरस.

'इट्स् नॉट अ ट्रिक. इट्स् अ वे.' मी उत्तर दिले. उठलो. छान काळ्या, गुळगुळीत फळ्यावर एक श्लोकार्ध लिहिला. (श्लोकार्धच बरा. म्हटलेच आहे, 'श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि' इ. इ.)

> गुरोस्तु मौनं व्याख्यानम्
> शिष्यस्तु छिन्नसंशयः ।

तो त्यांना म्हणून दाखविला. म्हणायला लावला. प्रत्येकाकडून, चुकतमाकत का होईना, नेटाने म्हणवून घेतला, लँगवर्दीने देखील म्हणण्याचा प्रयत्न केला.

यानंतर मात्र उत्तरे देण्याची पाळी माझ्यावर आली.

'हिंदुधर्माची मुख्य तत्त्वे सांगाल का ?' 'तुम्ही हिंदु आहात का ?' 'आम्हाला हिंदु होता येईल का ?' 'तुम्ही किती हिंदुप्रथा पाळता ?' 'भारतीय साहित्य आणि हिंदु साहित्य एकच म्हणता येईल का ?' 'ख्रिस्ती धर्म आणि हिंदुधर्म यांची तुलना या अभ्यासक्रमात तुम्ही करणार आहात का ?' 'भारतात भाषाभेद आहेत, आर्यअनार्य भेद आहेत हिंदुधर्म एक असताना हे भेद कसे ?'... प्रश्नांवर प्रश्न येऊ लागले.

ऐकत असताना माझे मन नोंद करीत होते. या मुलांनी माझा विषय निवडला आहे तो केवळ गंमत म्हणून, लहर म्हणून किंवा केवळ कुतूहल म्हणून नव्हे. या निवडीमागे वाचन आहे आणि मुख्य म्हणजे विचार आहे. पुन्हा जबाबदारीची जाणीव वाढली. यांची जिज्ञासा पुरी करायची आहे असे आव्हान जाणवले.

मी उत्तर देऊ लागलो. उत्तर देताना विचार करू लागलो. पहिले सेशन संपले तेव्हा परस्परांचा परिचय चांगला झाला होता.

¤

पहिल्या तासात चर्चा केलेल्या गोष्टी दुसऱ्या तासाला पक्क्या केल्या. त्यात तास, विषयखंड, वाचायची पुस्तके व लेख आणि परीक्षेची पद्धत–असा तपशील ठरला. मुले, लँगवर्दी व मी यांच्यातील चर्चेत एकमताने ठरला.

या कार्यक्रमाचा टंकलिखित आराखडा

प्रत्येकाला दुसऱ्या दिवशी दिला वाचनीय पुस्तके व लेख याची यादी ग्रंथपालाकडे दिली नंतरच्याच दिवशी ती पुस्तके व लेख, एका स्वतंत्र शेल्फात, फक्त आसच्याच विषयासाठी – close reserve method वेगळी काढून ठेवण्यात आली लॅंग्वर्डीचे ऑफिस, टकलेखक, झेरोक्सयंत्र, ग्रंथालय– सारी यंत्रणा तत्परतेने आपापली जबाबदारी पार पाडत होती

अध्यापनक्रमात मी एक गमंत मुद्दाम केली होती प्रथम १९ व २० या शतकातील थोड्या साहित्याचा विचार योजला होता त्याना आधीच कटाळा येऊ नये म्हणून नंतर एकदम मागे जाऊन वेदापाशी सुरुवात करून पुन्हा दलित साहित्यापर्यंत आलो होतो. मी निवडलेले विषय आणि त्यासाठी वाचायचे साहित्य, हे आज आठवताना काहीसे आश्चर्य वाटते आहे एवढे सारे या विद्यार्थ्यांनी एका सेमेस्टरात वाचले कसे ? आणि इतक्या विषयाची चर्चा तरी कशी झाली ? पण ती झाली खरी थोडा तपशील येथे देतो.

◦ 'आधुनिक भारतीय मनाची कोंडी' (वाचण्यासाठी) ... 'आधुनिक कवितेतील भक्ती' हा अशोक केळकर व सदाशिव भावे याचा लेख. त्यातील १२ कवींच्या १७ निवडलेल्या कविता शिवाय एका इंग्रजी नवनीतातील मर्ढेकराच्या १२ कविता

◦ १९ व्या शतकातील हिंदुमनाचे आधुनिकीकरण ..वाचा ..राजा राममोहन राय, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक... उतारे

◦ २० व्या शतकातीलआधुनिक हिंदु मन...रवींद्रनाथ ठाकूर, महात्मा गांधी, डॉ. राधाकृष्णन–उतारे.

◦ ऋक् व अथर्ववेदातील सूक्ते, बृहदारण्यक-छांदोग्य-श्वेताश्वतर अशी उपनिषदे– त्यातील उतारे

◦ रामायण व महाभारत

◦ अभिजात संस्कृतपरंपरा...शाकुंतल, मेघदूत, मुद्राराक्षस, मृच्छकटिक.

◦ षड्दर्शने ...व शंकराचार्यांचा अद्वैत-सिद्धान्त.

◦ भगवद्‌गीता

◦ भारतातील विविध भक्तिसंप्रदाय... अप्पर, पुरंदरदास, ज्ञानदेव, तुकाराम, मीराबाई, सूरदास, चैतन्य, कबीर, नानक, दादू, तुलसीदास, एकनाथ, चोखा मेळा

◦ एकोणिसाव्या शतकातील नायक... 'चतुरंग' (रवींद्रनाथ टागोर), 'श्रीकांत' (शरच्चंद्र चतर्जी)

◦ विसाव्या शतकातील नायक . 'गारंबीचा बापू' (श्री. ना पेंडसे), 'देव चालले' (दि. बा मोकाशी), 'संस्कार' (अनंत मूर्ती )

◦ झोपडपट्ट्या व स्त्रिया ... 'पाथेर पांचाली' (विभूतिभूषण बंद्योपाध्याय); 'उमराव जान' (हादी महंमद रुसवा), 'चक्र' (जयवंत दळवी)

◦ ग्रामीण संस्कृती – लोकसंस्कृती ... 'बनगरवाडी' व 'वावटळ' (व्यंकटेश माडगूळकर).

◦ दलित विद्रोह नामदेव ढसाळ, दया पवार, शंकरराव खरात, बाबुराव बागूल... जोतिबा फुले, डॉ. आंबेडकर.

◦ अस्तित्ववादी प्रेरणा...नेमाडे, किरण नगरकर, गौरी देशपांडे.

◦ राष्ट्रवादी आधुनिकता...पं. जवाहरलाल नेहरू

ही यादी अधिक वाढवीत नाही. यादीतील नावांखेरीज इतर अनेक लेखकांच्या कथा–कविता–कादंबऱ्यांतील हिंदूधर्माच्या आविष्कारछटांचा उल्लेख करणे अपरिहार्य होते. त्या साऱ्या लेखकांचा उल्लेख करणे मला आवडेल. एका दृष्टीने ते इष्टही होईल; पण या निरीक्षणमालिकेत आता ते शक्य दिसत नाही. अशा लेखकांना उद्देशून येथे दिलगिरी प्रकट करतो

या अभ्यासक्रमाबरोबर ४० निबंधविषयांची यादी दिली होती परीक्षापद्धतीमध्ये असे ठरले होते की, पंचवीस टक्के मूल्यमापन वर्गातील चर्चेवरून व्हावे आणि पंचाहत्तर टक्के मूल्यमापन सत्र–निबंधावरून व्हावे. टर्म–पेपरकरिता विद्यार्थ्यांनी निवडावे म्हणून हे विषय तयार केले होते. वर्गातील चर्चेची थोडी कल्पना या विषयावरून येईल...

'रामायणातील राजधर्म', 'अर्जुनाचा स्व–धर्म', 'शाकुन्तला' तील अभिज्ञान, 'महाभारतातील आदर्श राजा', 'दोन माता : गांधारी व कुन्ती', 'दोन मामा : शकुनी व कृष्ण', 'मेघदूतातील निसर्गपूजन', 'शंकराचार्यांचे व ज्ञानदेवांचे अद्वैत', 'फुले–आंबेडकरांचे क्रांतिकारकत्व'; 'लो टिळक व श्री. अरविंद याची गीताभाष्ये', 'गांधीजींचे सत्याग्रहतत्त्व', 'बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील ग्रामीण शहाणपण', 'जातीयता आणि अस्पृश्यता', 'पं नेहरूनी केलेला भारताचा शोध' इ. इ

या चाळिसातून प्रत्येकाने एक निवडला काहींनी आपल्या जिज्ञासेनुसार विषय नवे करून घेतले उदाहरणार्थ एकाने 'शाकुंतल आणि मेघदूत यातील प्रेमभावनेची तुलना' असा विषय घेतला होता प्रत्येकाने ठरल्या तारखेला निबंध पुरे करून दिले. टंकलिखित दोन प्रती एक तपासून दिली एक बरोबर इकडे आणली आज जेव्हा या वीस निबंधांकडे मी बघतो तेव्हा दोनशेएक पृष्ठांचे एक पुस्तकच तयार झालेले दिसते विद्यार्थी व मी, दोघांनी मनापासून व भरपूर काम केल्याचे समाधान मिळते

□

कितीही नाही म्हटले तरी हा तपशील थोडा कंटाळवाणाच, पण तो मुद्दाम दिला आहे. त्यावरून, तिकडचे विद्यार्थी किती काम करायला तयार असतात हे लक्षात येईल.

विद्यार्थ्यांचे वाचन, निबंधलेखन त्यासाठी खोलीत, ग्रंथालयात, आहारात, आमच्या अपार्टमेंटमध्ये चर्चा यामध्ये दिवस कसा उलटत असे हे कळत नसे

आणखी एक गमत हिंदुधर्मावर इतकी आणि अशी सलग चर्चा, तीही परदेशी–परधर्मी विद्यार्थ्यांबरोबर, मी प्रथमच करीत होतो त्यातून जसे त्याना, तसे मला स्वतःलाही, हिंदुधर्माच्या काही सकल्पनाचे अर्थ नव्याने समजत गेले यांपैकी काही अर्थ गभीर, तर काही कल्पनारंजन करणारे देखील होते

आमच्या वर्गातील चर्चा उत्तरोत्तर रंगत गेल्या त्यातील एक गमतीची चर्चा आठवते

'पुनर्जन्म कशाला ?' एक प्रश्न

'ती एक श्रद्धा आहे.' माझे उत्तर

'आताच्या आधुनिक जगात या श्रद्धेचा काय उपयोग ?'

'समजून करून घेतला, तर आहे.'

'म्हणजे कसा ?'

आता हे आव्हान आल्यावर मला मजेशीर कल्पना सुचली मी विचारले, 'तुमच्या धर्मात जन्म किती ?'

'एकच.'

'हा एक जन्म सपल्यावर काय?'

'देवाच्या निर्णयाची वाट पाहायची'

'अखेरच्या दिवसापर्यंत त्या दिवशी देव पापपुण्याचा अखेरचा निवाडा करतो'

'निवाड्यानतर काय?'

'कायमचा स्वर्ग किंवा कायमचा नरक'

'ही एक श्रद्धाच ना? मग हिच्यापेक्षा पुनर्जन्माची श्रद्धा अधिक चागली नाही का?'

'कशी?'

'पुनर्जन्म हा एक अखड आशावाद आहे या जन्मात नाही तर पुढच्या-त्याच्या पुढच्या जन्मी; पण मोक्ष नक्की! मग काय चागले? असख्य वळसे घेत मोक्ष की एकाच जन्मात पापपुण्याचा झटपट निकाल?'

या वेळी सेशन सपले, पण जेनीच्या मनातली चर्चा संपली नाही. घरी, चुकली, डॉमिटरीत, परतल्यावर तिने पुनर्जन्मावर कविता लिहिली नतरच्या सेशनमध्ये वर्गात ती वाचून दाखविली आणि चर्चा नव्या वळणाने सुरू झाली

'श्री भावे, सस्कृत-साहित्यात ट्रॅजिडी नाही, अस तुम्ही सागितलंत पुनर्जन्माच्या कल्पनेमुळ अस असेल का?' जॅनेटने विचारले.

या योगायोगाचे मला विलक्षण आश्चर्य वाटले.

बरोबर तीस वर्षांपूर्वी हा प्रश्न मी रा श्री. जोगसराना विचारला होता. त्या वेळी ते आम्हाला नाटक हा वाङमयप्रकार शिकवीत होते ट्रॅजिडीविषयी बोलताना, सस्कृतात शोकान्तिका नाही, असे ते म्हणाले. माझ्या मनात विचार सुरू झाला. हिंदुधर्म हा 'कायम दुर्गती' मानणारा धर्म नाही शेकडो, लाखो जन्माच्या प्रयत्नानतर असेल, पण या धर्मात सर्वांना सफलतेचे आश्वासन आहे या व्यापक, उदार, समाश्वासक दृष्टीत ट्रॅजिडी वसत नाही त्या वेळी तो प्रश्न सराना विचारताना गटेच्या 'फाउस्ट'चे सानेगुरुजीनी जे रूपातर केले आहे त्याची आठवण झाली होती स्वतच्या श्रद्धाळू हळवेपणाने गुरुजीनी 'नदी शेवटी सागराला मिळेल' असे नाव दिले आहे जॅनेट विचारत होती तेव्हा मला कविश्रेष्ठ गटेच आठवत होता 'शाकुतला'ला डोक्यावर घेऊन नाचणारा. 'पृथ्वीवरून स्वर्गापर्यंत नेणारे' शाकुतल अशा या शाकुतलाचे शेक्सपियरच्या 'विंटर्स टेल'शी साम्य दाखवीत मी बोलत होतो. चर्चा रगली होती मध्येच जॅनेटने हा प्रश्न विचारला जोग–मी–जॅनेट याच्या रूपान ट्रॅजिडीबाबत एका प्रश्नाची तीन पिढ्याची साखळी भारत ते अमेरिका अशी पुरी झाली होती!

अशा किती चर्चा साऱ्या लिहायच्या तर, हिंदुधर्माच्या सकल्पनाची आधुनिक सदर्भात आधुनिक पिढीनं केलेली चिकित्सा, असा एक वेगळा पुरा ग्रथच तयार होईल

¤

केवळ कार्लटनला आणि त्याही केवळ वर्गात अशा चर्चा होत असत असे नव्हे. इतर विद्यापीठात अथवा सस्थात निमत्रित म्हणून व्याख्याने दिली. कार्लटनला विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या मडळात भाषणे झाली, मुलाखती झाल्या. कार्लटनच्या टेकाडावर किंवा कॅनॉननदीच्या तीरावरून फिरताना विद्यार्थ्यांशी किंवा शिक्षक सहकाऱ्याशी गप्पाष्टके चालायची. या साऱ्या बडबडीचे प्रकट–अप्रकट केंद्र एकच असे हिंदुधर्म, हिंदुधर्मपरपरा.

कोलोराडो स्प्रिग्ज येथे कोलोराडो कॉलेज आहे. तेथे डॉ जेन कॉवेल या तत्त्वज्ञान विभाग–प्रमुख आहेत. त्याच्या खास व्यासगाच्या विषयापैकी एक आहे सौदर्यशास्त्र त्यानी मला तेथील भाषणासाठी मुद्दाम विषय दिला– 'हिंदुकलादृष्टी' तिथे बोलता बोलता सहज सुचले की शकराचार्यांच्या अद्वैतमताच्या आधारे हिंदुसौंदर्यशास्त्राची उभारणी करण्याचा प्रयत्न करावा म्हणून त्या दिशेने बोलत गेलो. विद्या–अविद्या, पारमार्थिक आणि व्यावहारिक अशा दोन सत्ता अशा सकल्पनाची उभारणी सौदर्यानुभवाच्या क्षेत्रात कशी करता येईल हे तपासत–सागत गेलो...भाषण ध्वनिमुद्रित होत होते माझी तद्री वाढत होती, प्रभाकर पाध्याच्या निधनाची वार्ता अमेरिकेत बऱ्याच उशीरा कळली होती त्याच्यासह केलेल्या चर्चांची आठवण दुखाची धार तीव्र करीत होती. या दुखाच्या धारेचे पाणी भाषणाला चढत होते कोलोराडोचे हे भाषण म्हणजे पाध्याना आदराजलीच होती.

मिनेसोटा विद्यापीठात 'दक्षिण आशिया मडळ'– South Asion Consortium– आहे. या मडळातर्फे व्याख्यान व चर्चा ठेवण्यात आली होती विषयाची फर्माइश त्याचीच होती 'आधुनिक भारतीय मन आणि हिंदुधर्मपरपरा' विषयाच्या प्रतिपादनात 'निर्गुण भक्ती' आणि 'नास्तिकदर्शन' यावर मी थोडे बोललो होतो. त्यावर नतरच्या चर्चेत तीव्र शका प्रकट करण्यात आल्या.

दक्षिण आशिया मडळाचे बहुतेक सदस्य एका बाजूने मिनेसोटा विद्यापीठात प्राध्यापक तर दुसऱ्या बाजूने भारत आणि आशिया याचे तज्ज्ञ दोनदा–चारदा भारत–नेपाळ–चीन अशा वाऱ्या करून आलेले. शिवाय गभीर निष्ठा असणारे ख्रिस्ती धर्मीय त्याना या कल्पना पटेनात नुसत्या पटेनात असे नव्हे, तर समजेनात

नास्तिकदर्शन' आणि 'निर्गुण भक्ती' असे म्हणता येणार नाही, या कल्पनात अतर्गत विसगती आहे असा त्याचा तार्किक आक्षेप होता तो खूप रगला शेवटी आमचे म्हणणे असे तर तुमचे म्हणणे तसे एवढ्यावरच तो थाबला कारण चर्चेच्या कार्यक्रमाची वेळ सपली नतरच्या जेवणात कोपऱ्या–कोपऱ्यात या वादाचे पडसाद उमटत राहिले मला मजा वाटत होती. या सकल्पना वर्गातल्या मुलाना चटकन आणि सहजपणे समजल्या होत्या, पण येथे अनुभवी, व्यासगी तज्ज्ञाना त्या मान्य होत नव्हत्या

पैकी 'नास्तिकदर्शना'ची चर्चा ज्या दिशेने वाढत गेली ती लक्षणीय होती दोन धर्ममतामधील पायाभूत अतर या चर्चेत आपोआप व्यक्त होत होते

'तुमच्या नास्तिकदर्शनात नीति–तत्त्वाची उभारणी कशावर केली आहे?' एका अनुभवी धर्मगुरूचा प्रश्न

'मी आपल्या प्रश्नाचा रोख नाही समजलो.'– मी

'म्हणजे अस की देव मानल्याखेरीज नीती कशी शक्य आहे?'

'देव मानायला कशाला हवा? तो एकत्वान असतोच मग तुम्ही त्याला देव म्हणा, सत् म्हणा, ब्रह्म म्हणा. आपल्याला कोणता देव अभिप्रेत आहे?'

'सद्वर्तनाचे पारितोपिक देणारा आणि पापी वर्तनाला करुणेने शासन करून सुधार-

णारा देव मला अभिप्रेत आहे. अशी देवावर श्रद्धा असेल तरच माणूस चांगला वागेल, एरवी नाही. '

'म्हणजे नास्तिकांना नीतीसाठी आधार नसतो, असं आपणाला सुचवायचं आहे काय ?'

'सुचवायचं नव्हे, म्हणायचं आहे. सगुण–निर्गुण, देव–ब्रह्म यांचं अद्वैत मानणं म्हणजे काहीसा अहंकार झाला. सगुण-साकाराला निर्गुण-निराकाराच्या पायरीवर चढवता येणार नाही. ही नम्रतेची मर्यादा नसेल तर नीतितत्त्व येईलच कसे ? तुमचे अद्वैत हे नीतीच्या अतीतच नव्हे तर नीतीच्या विरोधी आहे, असे म्हणणे भाग आहे. आपली श्रद्धा दुखावली असेल तर माफ करा.' अंगभूत सौजन्याने धर्मगुरूंनी स्वमत मांडले.

या वादात निर्णय लागणे शक्यच नव्हते. मीही गप्प राहिलो. 'पुन्हा केव्हा भेटल्यावर पुन्हा बोलू' असा दिलासा आम्ही एकमेकांना दिला. सभा संपली.

अपार्टमेंटला परतताना मी अवन्तीला म्हटले, आजची चर्चा करताना मला वामन मल्हारांच्या 'रागिणी'तील चर्चा आठवत होती. प्रियब्रह्मस्वामी, भय्यासाहेब, आनंदराव, उत्तरा, नानासाहेब, शास्त्रीबुवा ही वामन मल्हारांची नावे बदलली की चर्चा तीच ! ◻

योगायोग असा की, एका अमेरिकन वामन मल्हारांशी चर्चा होण्याचा अपूर्व योग चालून आला. अमेरिकेतले हे वामन मल्हार म्हणजे मॅकालॅस्टर कॉलेजातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक डेव्हिड व्हाइट. यांनी इतर तत्त्वशाखांप्रमाणे 'हिंदु तत्त्वज्ञान' अनेक वर्षे शिकविले आहे. भगवद्गीता हा त्यांच्या खास चिंतनाचा आणि प्रेमाचा विषय आहे. गीतेतील अध्याय व श्लोक यांचा संदर्भ ते केव्हाही देऊ शकतात. जवळजवळ सारी गीता अशी मुखोद्गत आहे याचा त्यांना अभिमान आहे. वामन मल्हारांसारखेच त्यांचे व्यक्तिमत्त्व सौम्य मोहक आहे आणि ते आपल्या व्यासंगात बुडून गेलेले आहे.

त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाली तीही योगायोगाने. कार्लटन येथील आमचा सहकारी मित्र डॉ. फिलिप एम्ब्लोम हा डेव्हिड दांपत्याचा मित्र. एका शनिवारी आम्ही मिनेआपोलिसची साउथ एशियन लायब्ररी बघायला जाणार होतो. ते सहज बोलताना फिलिपने बीव्हर्लीला– म्हणजे सौ. डेव्हिड व्हाइट यांना सांगितले, तर त्यांनी सरळ जेवायलाच बोलावले. ग्रंथालय पाहून साडेबाराच्या सुमारास आम्ही 'मड पाय' या मध्यवर्ती उपहारगृहात जमलो. उपहारगृह साधे पण दर्जेदार होते. मुख्य म्हणजे तेथे भारतीय पद्धतीचे जेवण मिळणार होते. आमच्या गप्पांच्या विषयपत्रिकेवर प्रमुख विषय होता बीव्हर्लीच्या कविता ऐकण्याचा, पण प्रत्यक्षात दोन चर्चा झाल्या. एक डेव्हिडची व माझी– भगवद्गीतेवर. दुसरी बीव्हर्ली, अवन्ती व फिलिप यांची. कवितावर.

भगवद्गीतेवर बोलता बोलता डेव्हिड व मी वामन मल्हारांच्या आवडत्या विषयावर आलो. 'गीतेत कार्याकार्यनिर्णयाची कसोटी आहे काय ?' यावर वामनरावांनी केलेला युक्तिवाद प्रसिद्ध आहे. एक तर निर्णयाचे आत्मस्वातंत्र्य मान्य करा, नाही तर निर्णयाची नैतिक जबाबदारी टाकू नका– अशी त्यांची भूमिका आहे. तसेच, भगवद्गीतेने या प्रश्नाचे निःसंदिग्ध उत्तर दिलेले नाही असेही त्यांचे मत आहे. हा विषय आल्यावर डेव्हिडने स्वतःची वेगळी भूमिका प्रकट केली. तो म्हणाला, 'गीतेत निर्णयाचे आत्मस्वातंत्र्य आहे' अशी माझी खात्री आहे. येत्या दोनतीन महिन्यांनी एका चर्चासत्रात 'गीतेत निर्णयस्वातंत्र्य आहे' असा निबंध मी वाचणार आहे. त्याची प्रत मी तुला धाडीन.' नंतर तो तपशीलवार बोलत राहिला. त्याची भूमिका लोकमान्यांच्या भूमिकेशी जुळणारी आहे. 'गीतारहस्य' तू इंग्रजीत वाचले आहेस का ? असे मी त्याला विचारलेदेखील. त्याने ते वाचलेले नाही. मी आता ते त्याला पाठवणार आहे.

अमेरिकेत, तीन–साडेतीन महिने, मी हिंदुधर्मचर्चेत पुरेपूर रमलो होतो. हिंदुधर्म इतरांना समजून देत होतो आणि मला स्वतःला हिंदुधर्म अधिक साकल्याने, अधिक सूक्ष्म छटांनी समजत होता. देश परकीय, चिंतनाचा विषय मात्र आपला असे मनोज्ञ मिश्रण झाले होते. वैचारिक सुख असे ज्याचे वर्णन करता येईल असे सुख होत होते.

एवढ्यात एक घटना घडली. मिनेआपोलिसच्या हिंदुमंदिरात माझे प्रवचन झाले. विषय होता 'महात्मा गांधींचे हिंदु–तत्त्व.' मिनेआपोलिसमधील बहुसंख्य हिंदुसमाज आला होता. सकुटुंब, सपरिवार. रविवारी सकाळी आधी प्रार्थना, मग थोडे भजन, मग प्रवचन आणि मग भोग–प्रसाद असा दर रविवारप्रमाणे कार्यक्रम झाला. दुपारी कार्लटनला परतलो.

सोमवारी सकाळी फोन खणखणला. भल्या पहाटे, म्हणजे साडेसात वाजता. झोपेतून उठवल्याबद्दल माफ करा; पण राहवलं नाही म्हणून फोन केला. आपलं कालचं प्रवचन फार आवडलं. आमच्या शाळेत जाणाऱ्या मुलांनी ते ऐकायला हवं. म्हणजे त्यांना हिंदु–भारतीय असल्याबद्दल सध्या वाटतं तसं अपराधी वाटणार नाही. आपण इकडे आहात तोवर दर रविवारी इथे या. अवश्य.' इतके सांगून प्रा. मांगलिक यांनी फोन बंद केला.

माझ्या मनात प्रश्न घुमत राहिला. हिंदु असल्याबद्दल येथील मुलांना अपराधी का वाटावे ? ◻




पुस्तके

# सत्तांतराचा अभ्यासपूर्ण इतिहास

डॉ. वि. मा. बाचल, फर्गसन कॉलेज, पुणे

'योग्य काळ येईल तेव्हा भारताच्या हितासाठी आपल्याला बदल करावा लागेल.. अगदी स्वार्थाच्या दृष्टीनेही विचार केला तरी सुनियंत्रित पण अंकित ठरलेल्या हिंदुस्थानापेक्षा स्वतंत्र हिंदुस्थान, बेबंद कारभाराखाली असला तरी आपल्या फायद्याचा ठरेल.. आपल्या व्यवस्थेखाली हिंदी लोकांच्या मनाचा इतका विकास होईल की, ही व्यवस्थाच अपुरी पडेल. आपल्या अंकित असलेल्या नागरिकांना सुराज्यामुळे अधिक चांगल्या राज्यासाठी आपण तयार करू. युरोपीय ज्ञानाचा लाभ झाल्यामुळे पुढे–मागे अशी वेळ येईल की, हे लोक युरोपीय संस्थांचीही मागणी करतील... हा दिवस जेव्हा उजाडेल तेव्हा तो ब्रिटिशांच्या इतिहासातील सर्वात मोठ्या अभिमानाचा ठरेल !'

हे मेकॉले यांचे ब्रिटनच्या कॉमन्ससभागृहातील १८५३ च्या एका भाषणातील उद्‌गार ९४ वर्षांनी खरे ठरले आणि भारतात सत्तांतर घडले. या सत्तांतराचा नाट्यपूर्ण इतिहास अभ्यासपूर्ण रीतीने, रोचक भाषेत विख्यात पत्रकार गोविंद तळवलकर यांनी दोन खंडात सादर केला आहे. या धावत्या आढाव्यात घटनात्मक बाजूवर भर असून येथील राजकीय चळवळी, इंग्लंडमधील स्थित्यंतर व जागतिक घडामोडी या सर्वांचा परिणाम कसा झाला याचा मागोवा घेण्यात आला आहे. देशी व परदेशी घडामोडींमागील तात्त्विक व नैतिक प्रेरणांचा, विविध तत्त्वज्ञानांचा, दहशतवादी चळवळींचा, प्रादेशिक अथवा गटवार आंदोलनांचा सविस्तर अभ्यास नाही, हे ग्रंथकाराने सुरुवातीसच मान्य केले आहे. आपले विवेचन सादर करताना गोविंदराव तळवलकरांनी असंख्य संदर्भग्रंथांचा, ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास केला आहे. इतकेच नव्हे तर लॉर्ड बटलर, डॉ. आर. जे. मूर, सी. एच. फिलिप्स, एच. व्ही. हॉडसन, पीटर रॉब डेव्हिड पेज, लॉर्ड लिस्टोवेल, वुड्रो वॅट इत्यादी अनेक संबंधित तज्ज्ञांच्या मुलाखती घेतल्या आहेत. वादग्रस्त मुद्द्यांबाबत मूळच्या अधिकृत कागदपत्रांचा वेध घेत चिकित्सक अभ्यास करण्याच्या तळवलकरांच्या पद्धतीमुळे त्यांच्या विवेचनाला संशोधकाच्या सूक्ष्मतेची जाण आहे; परंतु अभ्यासविषयाची मांडणी मात्र संशोधकी रुक्षता टाळून वेधक पद्धतीने केलेली असल्याने ते कुठेही कंटाळवाणे झालेले नाही.

इ. स. १७७३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीवर ब्रिटिश संसदेचे नियंत्रण प्रस्थापित करणारा रेग्युलेटिंग ॲक्ट मंजूर झाला तर त्याच दरम्यान १७७४–७५ मध्ये अमेरिकेतील वसाहतींनी ब्रिटिशांची सत्ता झुगारून दिली. जगाच्या दोन वेगळ्या भागांसंबंधी असलेल्या या घटना नियतीच्या दृष्टीने परस्परसंबंधी ठरल्या. कारण असे की, अमेरिकेबरोबरील व्यापार घटल्याने हिंदुस्थानबरोबरील व्यापाराला महत्त्व प्राप्त झाले आणि केवळ पन्नास वर्षांच्या काळात संपूर्ण भारत ब्रिटिश नियंत्रणाखाली आला. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातील ही साम्राज्यवृद्धी कशी झाली याचे त्रोटक परंतु नेमके वर्णन प्रास्ताविकात आढळते. व्यापारी कंपनीचे रूपांतर हळूहळू परंतु निश्चितपणे राजकीय सत्तेत कसे झाले, वॉरन हेस्टिंग्ज, वेलस्ली, डलहौसी यांनी कोणती भूमिका बजावली, कंपनी सरकारच्या अत्यंत कार्यक्षम अधिकाऱ्यांनी भ्रष्ट मार्गांचा अवलंब कसा केला, शस्त्र आणि शास्त्र याबाबतीत आपले श्रेष्ठत्व सिद्ध करणाऱ्या ब्रिटिशांनी भारतीयांचा कसा पराभव केला हे सांगत असतानाच मन्रो, माल्कम, एल्फिन्स्टन, मेटकाफ यांसारख्या अधिकाऱ्यांनी 'शास्त्रीपंडितांना आश्रय दिला. नवी शिक्षणपद्धती आणली, पाठ्यपुस्तके तयार केली याचाही निर्देश केला आहे. (महाबळेश्वर या महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणाची उभारणी मालकम्‌ने केली,म्हणून सुरुवातीस त्यास मालकम पेठ असेही नाव होते.) विल्यम बेंटिंकने सुधारणा–पर्व सुरू केले, बालहत्याबंदी, सती–बंदी, विधवा–विवाहमान्यता या सुधारणांबरोबर रेल्वे, पोस्ट, तारव्यवस्था, राष्ट्रीय महामार्ग, कालवे, इंजिनिअरिंग विद्यालयाची स्थापना या गोष्टी भावी काळात अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या. भारतातील औद्योगिक विकासाचा आणि दळणवळणाच्या क्रांतीचा पाया ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात घातला गेला हे सत्य नाकारता येत नाही.

### व्यक्तिप्रधानता व संस्थाप्रधानता

वासुदेवशास्त्री खरे यांच्या मार्मिक निर्देशाचा प्रास्ताविकात उल्लेख आहे. ते म्हणतात.

'समूहरूपाने आम्ही केलेली कार्ये यशस्वी होत नसल्याने आमचे राज्ययंत्र पाश्चात्यांप्रमाणे संस्थाप्रधान असू शकत नाही. ते व्यक्तिप्रधान असते... शिवाजीने माणसे तयार केली, किल्ले बांधले, सेना-आरमार निर्माण केले... सर्व काही केले; पण मागून संभाजी गादीवर येताच मागची पंचवीस–तीस वर्षांची मेहनत मातीमोल ठरली... ईस्ट इंडिया कंपनीत असा प्रकार होऊ शकत नाही. तिचा प्रमुख अधिकार आधी अयोग्य माणसांच्या हाती जात नाही आणि गेलाच तर तो माणूस संस्थेच्या कायद्यांनी चोहोकडून जखडून गेला असल्यामुळे संभाजी अगर बाजीराव याप्रमाणे स्वच्छंदाने वागू शकत नाही....पेशवाईचे राज्ययंत्र अव्यवस्थित व व्यक्तिप्रधान होते आणि ईस्ट इंडिया कंपनीचे राज्यतंत्र सुव्यवस्थित व संस्थाप्रधान होते.'

ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची ही जमेची बाजू होती. त्याचबरोबर आर्थिक दारिद्र्य, उपासमारी, हातमागउद्योगाची पीछेहाट, वाढत्या भारामुळे शेतीची झालेली दुर्दशा, खालसा झालेल्या संस्थानांचे असंतुष्ट लोक यामुळे विरोध वाढत होता. या

विरोधाची परिणती १८५७ च्या उठावात झाली

ब्रिटिशांची सत्ता स्थापन होत असतानाच दोन विचारप्रवाहांचा प्रभाव आढळतो 'हिंदुस्थानावर इंग्लडने हळूहळू प्रभुत्व स्थापन केले आहे, असा उद्देश त्याने खास करून बाळगला होता असे नव्हे, पण एक काळ असा येईल की, इंग्लड हे प्रभुत्व नष्ट करील. अशा परिस्थितीत हप्त्याहप्त्याने सत्तांतर करावे' अशी भूमिका बाळगणारा एक गट होता तर 'भारतीयावर राज्य करणे हे ईश्वरदत्त कार्य आहे ते अधिकाधिक काळ चालले पाहिजे.' अशी दुसऱ्या गटाची भूमिका होती. अगदी ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारापासून सुरू झालेले हे धोरणात्मक द्वंद्व १९४७ साली सत्तांतराची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालले असे आढळते

दुसऱ्या प्रकरणात तळवलकरानी १८५७ च्या उठावापासून कॉंग्रेसच्या स्थापनेपर्यंतच्या काळाचा आढावा घेतला आहे

१८५७ च्या उठावाने ब्रिटिशांच्या भारतातील सुधारणावादी राजसूययज्ञाचा घोडा थोपविला गेला हिंदी लोकाना पौर्वात्य पद्धतीचे शिक्षण द्यावे की पाश्चिमात्य या वादाचा निकाल पाश्चात्याच्या पद्धतीच्या बाजूने लागला या संदर्भात लेखकाने मेकॉले, लोकहितवादी, चार्लस् ट्रेव्हेलियन इत्यादींच्या विचाराचा सविस्तर परामर्ष घेतला आहे दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या काळात भारतात स्थापन झालेल्या विविध राजकीय-सामाजिक संस्थांचे कार्य होय कलकत्त्यातील बेंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी, पुण्यातील डेक्कन असोसिएशन व सार्वजनिक सभा, मद्रासची नेटिव्ह असोसिएशन या संस्थानी सामाजिक अभिसरणाचे आणि राजकीय विचारजागृतीचे प्राथमिक कार्य केले. या कार्यातून भारताच्या राष्ट्रवादी चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लडमध्ये साम्राज्यवादी आणि उदारमतवादी सत्ताधीशांची सत्तासक्रमणे चालत असताना त्यांचा परिणाम भारतातील व्यवस्थेवरही अपरिहार्यपणे होत असे उदाहरणार्थ, ग्लॅडस्टनच्या काळात झालेली लॉर्ड रिपन यांची नेमणूक. स्वतत्र वृत्तपत्रे, शिक्षणप्रसार, सार्वजनिक सेवात हिंदी लोकांचा वाढता सहभाग ही रिपनच्या कारभाराची सूत्रे होती याचाच महत्त्वाचा दृश्य परिणाम म्हणजे स्थानिक स्वराज्यसंस्थासंबंधीचा ठराव. या १८८४ च्या ठरावाने भारतातील स्थानिक संस्थाच्या लोकशाहीचा पाया घातला, हे निर्विवाद होय

विशेष म्हणजे भावी काळात हिंदुस्थानची फाळणी करण्यास कारणीभूत ठरलेला द्विराष्ट्रवाद या काळात जोपासला गेला. सर सय्यद अहमद यानी १८७६ मध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जीच्या नॅशनल इंडियन असोशिएशनला प्रतिशह देण्यासाठी नॅशनल सेंट्रल महामडेन असोसिएशन स्थापन केली. मुसलमान हे स्वतत्र राष्ट्र आहे, ते मानले पाहिजे अशी भूमिका अहमदानी सातत्याने घेतली. १८८५ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय सभेच्या—कॉंग्रेसच्या—स्थापनेचे श्रेय ह्यूम याना दिले जाते. तळवलकरानी अनेक कागदपत्राच्या आधारे 'या श्रेयात ह्यूम याचा मोठा वाटा असला तरी सर्व श्रेय त्याच्याकडे जात नाही' असे दर्शविले आहे डफरिन, रॉबर्ट ऑसबोर्न याचाही कॉंग्रेसच्या स्थापनेत वाटा असल्याचे स्पष्ट केले आहे. कॉंग्रेसच्या स्थापनेमागील प्रेरणाचा अधिक विस्ताराने विचार व्हावयास हवा होता हे मात्र येथे नमूद करावेसे वाटते.

तिसऱ्या प्रकरणात ग्रंथकाराने कॉंग्रेसच्या स्थापनेपासून १९०९ सालच्या मोर्ले-मिंटो सुधारणापर्यंत आढावा सादर केला आहे.

कॉंग्रेस, तिच्या मागण्या व घटनात्मक सुधारणा याबाबत लॉर्ड डफरिन याची दोलायमान स्थिती होती ह्यूम याचेबरोबर त्याचे खटकेही उडत १८८८ मध्ये डफरिन यानी प्रांतिक विधिमंडळाचा पाया विस्तृत करण्याची शिफारस आपल्या अहवालात केली. या उदारमतवादी सूचनांच्या मागे हिंदुस्थानातील सुशिक्षिताच्या असंतोषाची धार बोथट करण्याची दृष्टी होती असे आढळते. राष्ट्रवाद्याना सवलती द्याव्या, पण त्यानंतर मात्र राष्ट्रवादी प्रवृत्तींना कडक शासन करावे अशी त्याची सूचना होती. या संदर्भात अँटनी पॅट्रिक मॅक्डोनेल याच्या अहवालाचाही विचार आवश्यक आहे. कॉंग्रेसचा वाढता प्रभाव त्यानी ओळखला आणि 'स्थानिक लोकाना कारभारविषयक असमाधान व्यक्त करण्यासाठी अधिकृत, सार्वजनिक व प्रतिष्ठित साधन मिळवून द्यावे' अशी शिफारस केली. याचा दृश्य परिणाम म्हणजे १८९२ चा कायदा. या कायद्याने विधिप्रक्रियेत भारतीयाना अधिक सहभाग मिळाला गव्हर्नरजनरलच्या कौन्सिलच्या सभासदाना प्रश्न विचारण्याची मुभा मिळाली आजच्या ससदीय पद्धतीत प्रश्नोत्तराच्या तासाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे या पद्धतीची सुरुवात अशत १८९२ मध्ये झाली हे निर्विवाद.

## कर्झनशाही आणि सुधारणा

यानंतरच्या काळात रिपनच्या उदारमतवादाला काट देणाऱ्या लॉर्ड कर्झनची कारकीर्द सुरू होते. त्याने प्रतिनिधित्वाचे तत्त्व नाकारताना म्हटले, 'हिंदुस्थानातील प्रचंड लोकसंख्या ही मूक आणि अज्ञानी आहे, जनतेच्या कल्याणाची जबाबदारी ब्रिटिश सरकारवर आहे हिंदुस्थानात प्रातिनिधिक कारभाराची अद्याप वेळ आली नाही.' व्हॅलेंटाइन चिरोलसारख्या भारतद्वेषी व्यक्तीनेही कर्झनच्या या धोरणात धूर्ततेचा अभाव असल्याचे म्हटले. 'कॉंग्रेसचा शांतपणे मृत्यू घडावा अशी भारतात असताना माझी महत्त्वाकाक्षा राहील.' असे म्हणणाऱ्या बगालच्या फाळणीचा जनक कर्झनने अनेक दूरगामी सुधारणा केल्याचे तळवलकरानी स्पष्ट केले आहे. जमीनमहसूलविषयक धोरण, पाटबंधाऱ्याची वाढ, कर्जनिवारणाचे कायदे, शेतीसुधारणेचा पाया, रेल्वेबोर्डाची स्थापना, सहकारी संस्थाचा कायदा, पुराणवस्तूचे जतन इत्यादी सुधारणा म्हणजे कर्झनच्या कारभाराची भारताच्या दृष्टीने जमेची बाजू होय. कर्झनला 'रावण' म्हणून रेखाटणाऱ्या अभ्यासकाकडून ही बाजू दुर्लक्षिली जाते हे लक्षात येईल.

कर्झननंतर लॉर्ड मिंटो व्हाइसरॉय झाले. मोर्ले-मिंटो सुधारणाच्या संदर्भात निर्माण झालेले द्वंद्व ग्रंथकाराने विस्ताराने दिले आहे. मुसलमान हे वेगळे राष्ट्र असून त्याच्यासाठी विभक्त मतदारसंघाची आवश्यकता आहे असे १९०६ साली स्थापन झालेल्या मुस्लिम लीगचे प्रतिपादन होते. ही मागणी लॉर्ड मोर्ले याना मान्य नव्हती. उलटपक्षी मिंटो यानी नगरपालिकेपासून कौन्सिलपर्यंत मुसलमान जमातीला खास प्रतिनिधित्व मिळावयास हवे हे मान्य केले. विभक्त

मतदारसघाची मागणी मान्य न झाल्यास विशेष आदोलन उभार- ण्याची मुस्लिम लीगची धमकी होती. शेवटी मोर्ले यानी पड खाल्ली आणि १९०९ च्या सुधारणा कायद्यात विभक्तमतदारसघाची पद्धती मान्य झाली. ही एक प्रकारे पाकिस्तानच्या निर्मितीची पहिली पायरी होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही

## जहाल–मवाळ वाद

इकडे [मोर्ले-मिंटो] याच्यातील द्वद्व सुरू होते तेव्हा राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चळवळीतील जहाल–मवाळाचे मतभेद स्पष्ट होत होते. नामदार गोखल्याना बहिष्काराचा मार्ग पसत नव्हता, तर लोकमान्य टिळकासारख्या जहालानी बहिष्कारयोग सर्व देशानेच अगीकारावा असे प्रतिपादन सुरू केले जहाल–मवाळ–वाद विकोपास जाऊन १९०७ साली सुरत येथे कॉंग्रेस दुभगली. नामदार गोखले याच्या ससदीय कामगिरीचा ब्रिटिश सरकारने मुक्त कठाने गौरव केला १९०६ सालच्या गोखले याच्या अर्थसकल्पावरील भाषणाबाबत ' इग्लडच्या पार्लमेंटातही असे भाषण ऐकावयास क्वचित मिळते ' हे मिंटो याचे उद्गार लक्षणीय होत. नामदार गोखले याचा मुसल- मानाच्या खास मतदारसघाला विरोध नव्हता. मोर्ले–मिंटो सुधार- णाच्या कार्यवाहीच्या वेळी मात्र मवाळाचाही भ्रमनिरास झाला. कौन्सिलामध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी प्रभावी ठरतील ही त्याची अपेक्षा फोल ठरली. गोखले याच्या निधनानतर १९१५ साली टिळकाच्या जहाल नेतृत्वाखाली कॉंग्रेसचे कार्य प्रभावी ठरू लागले. होमरूल चळवळीचा जोर वाढू लागला दरम्यान १९१७ साली मॉंटेग्यू यानी ऐतिहासिक महत्त्वाची घोषणा केली. हिंदुस्थान हा ब्रिटिश साम्राज्यातर्गत भाग रहावा, जबाबदार शासनपद्धतीचा वाढत्या प्रमाणावर स्वीकार करावा ही घोषणेतील महत्त्वाची सूत्रे होती. जबाबदार शासनाची पुढची पायरी म्हणून प्रातामध्ये द्विदल पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आणि काही विषयाबाबतचा कारभार मत्र्याकडे सोपविण्यात आला. मॉंटफर्ड सुधारणाचे अशत स्वागत झाले 'उजाडले पण सूर्य कुठे आहे ?' या मथळ्याखाली टिळकानी केसरीत अग्रलेख लिहिला. गव्हर्नरच्या विशेष अधिकारा- मुळे प्रातातील द्विदल पद्धतीचा बोजवारा उडाला. हिंदी नेते आणि ब्रिटिश सरकार याच्या अधिकाराच्या विभागणीबाबत परस्परविरोधी अन्वयार्थाने स्वायत्ततेचा सूर्य उगवू शकला नाही.

## असहकार-पर्व

मॉंटफर्ड सुधारणाच्या अमलबजावणीच्या काळात देशातील राष्ट्र- वादी चळवळीने अधिक उग्र रूप धारण केले महात्मा गाधीच्या असहकार चळवळीचे युग सुरू झाले. या चळवळीने साम्राज्यसत्ते- विरुद्धचा लढा अधिक व्यापक बनला या काळात स्वराज्यपक्षाची स्थापना झाली या पक्षाने कौन्सिल–राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली. मॉंटफर्ड सुधारणाची अमलबजावणी कशी होते हे तपास- ण्यासाठी भारतात पाठविण्यात आलेल्या सायमन कमिशनचे, त्यात एकही भारतीय सभासद नसल्याने काळ्या निशाणानी, 'सायमन गो बॅक ' या घोषणानी ३ फेब्रुवारी १९२८ रोजी स्वागत (?) झाले. असहकाराचे नवे पर्व सुरू झाले–

वास्तविक पाहाता तत्कालीन परिस्थितीच्या सदर्भात सायमन योजना बऱ्याच [अशी] पुरोगामी होती, परतु सायमनसमितीयोज- नेच्या रचनेतील [दोषामुळे तिचे यथार्थ स्वागत झाले नाही असे म्हणावे लागते. 'सायमन अहवालात औदार्य नाही, तो थड आहे, नव्हे काही ठिकाणी भावशून्य आहे ' हे लारकी याचे उद्गार लक्षणीय आहेत सायमन अहवालाला प्रत्युत्तर म्हणून मांडला गेलेला नेहरू अहवाल हा भारताच्या घटनेचा आराखडा मानला जातो. आजच्या आपल्या घटनेने मान्य केलेली अनेक मूलतत्त्वे या अहवालात आढळ- तात. याचा अर्थ आम्ही स्वतत्र झालो तर आमच्या शासनाचे स्वरूप काय असेल याची कल्पना राष्ट्रीय चळवळीच्या नेत्याना होती हे लक्षात येते. वसाहतीचे स्वराज्य हा वादग्रस्त मुद्दा अहवालात होता, हा अहवालही सर्व पक्षानी, सुरळीतपणे मान्य केला नाही या अह- वालाबाबतची पुस्तकातील चर्चा फारच त्रोटक वाटते सध्याच्या घटनेशी तुलना करता हा अहवाल किती पुरोगामी होता ( अथवा नव्हता ) हे माडणे इष्ट ठरले असते

यानतरच्या काळात उभ्या राहिलेल्या समस्याचे स्वराज्याचे स्वरूप, जातीय निवाडा, हिंदु–मुस्लिम सबध प्रात आणि सस्थाने याचे सबध–विस्तृत चिकित्सक निवेदन, गोलमेजपरिषदाची पार्श्व- भूमी, १९३५ चा कायदा, महायुद्धाच्या पार्श्वभूमीचा कालखड या सदर्भात केलेले आढळते १९३७–३९ या काळात प्रातात स्थापन झालेल्या लोकनियुक्त सरकारानी प्रातिक स्वायत्ततेच्या प्रयोगात आर्थिक शैक्षणिक सदर्भात किती महत्त्वाचे कायदे केले याचा त्रोटक निर्देश उपयुक्त ठरला असता आम्हास योग्य सधी लाभली तर आम्ही त्याचा विनियोग कसा करू शकतो हे लोकनियुक्त सरकारानी प्रत्यक्ष कार्य करून दाखविले. ब्रिटिश शासनाने पन्नास वर्षांत केले नसते असे कायदे दोन वर्षांत केले गेले. शेतीसुधारणा, मजूर कल्याण, कर्जबाजारीनिवारण याबाबतचे कायदे अत्यत महत्त्वाचे होत

## माउटबॅटन-पर्व

सत्तांतराच्या दुसऱ्या खडात १९४२ च्या चले जाव चळवळीपासून सत्तांतराची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या पाच वर्षांच्या घडामोडीचा सविस्तर आढावा घेतला आहे महायुद्धाचे स्वरूप अधिक विघातक होत गेले तसा भारताच्या घटनात्मक पेच सोडविण्याच्या प्रयत्नाना वेग आला. मुख्य तेढ होती पाकिस्तानच्या मागणीबाबत. या संदर्भात गाधीजी–राजाजी याच्याबरोबरच व्हाइसराय वेव्हेल, कूपलड, कॅसे झाफरुल्लाखान यानी आपापल्या योजना सादर केल्या. भारतीय सघराज्याच्या चौकटीत अल्पसख्याकाना विशेष संरक्षण देणे अथवा मुस्लिमांसाठी स्वतत्र राज्याची मागणी मान्य करणे हे मतभेदाचे विषय होते. राजाजीच्या योजनेत पाकिस्तानची कल्पना मान्य केली होती तर राजाजी योजनेचा वस्तुनिष्ठ विचार करावा असे म्हणत गाधीनी त्या योजनेस अनुकूलता दर्शविली होती स्वयनिर्णयाचे तत्त्व राजकीय विभाजनासाठी स्वीकारणे अभिप्रेत असले तरी मतदानाचा हक्क फक्त मुसलमानानाच दिला पाहिजे हा जीनाचा आग्रह होता, तर कॉंग्रेस ही मुस्लिमाचीही प्रातिनिधिक सस्था आहे व स्वयनिर्ण- याचे बाबतीत वादग्रस्त प्रदेशात मुस्लिमाबरोबरच हिंदूनाही मत- दानाचा हक्क हवा ही कॉंग्रेसची मागणी होती. ग्लान्सी, ट्विनॅम यासारख्या गव्हर्नराना पाकिस्तानची योजना पसत नव्हती घटना-

त्मक पेच सोडविण्यासाठी व्हाइसरॉय वेव्हेल यानी प्रामाणिक प्रयत्न केले आणि सिमलापरिषद बोलाविली. त्यात अनेक पर्यायी योजनावर चर्चा झाली. मा. वेव्हेल यांनीच मान्य केल्याप्रमाणे 'जिनांचा आडमुठेपणा व दुराग्रह ही सिमला परिषदेच्या अपयशाची मूळ कारणे होत' इकडे सुभाषचंद्राच्या आझाद हिंद सेनेच्या कार्यामुळे आणि मुंबईतील आरमारी बंडामुळे भारतीय सेना आपणाशी एकनिष्ठ राहील याची ब्रिटिश शासकाना शाश्वती वाटेना. दुसरे महायुद्ध सुरू झाल्याबरोबर प्रांतिक स्वायत्ततेचा प्रयोग गुंडाळण्यात आला. युद्धाबाबतची कॉंग्रेसची भूमिका, लोकशाही विरुद्ध फॅसिझम याचा संघर्ष, सोव्हियट रशियाची युद्धातील दोस्तराष्ट्राबरोबरील सहकार्याची भूमिका, जपान्यांची आशियातील मुसंडी आणि त्यामुळे भारतीयांच्या सहकार्याची निकड आणि परिणामस्वरूपी समझोत्याचे प्रयत्न म्हणून क्रिप्स याची नेमणूक या घटनाचे पुस्तकातील वर्णन समाधानकारक आहे. गांधी–नेहरू, नेहरू–सुभाष, गांधी–राजाजी, गांधी–जीना यांच्यातील सहमतीचे आणि मतभेदाचे विस्तृत विवेचन केले आहे. सर्वांचे समाधान करण्याच्या प्रयत्नातून क्रिप्स यांच्या योजनेला लाभलेले 'कुणाचेही समाधान न करणारे' अपयश, 'बुडत्या बँकेवरचा पुढच्या तारखेचा चेक' या स्वरूपाची योजना आणि विशेष म्हणजे क्रिप्स याच्या अतिमहत्त्वाकांक्षी वृत्तीमुळ झालेली योजनेची शोकांतिका फिल्डन–क्रिप्स संवाद व प्रा. स्टोक्स याचे योजनेच्या अपयशाबाबतचे निरूपण वाचले म्हणजे तळवलकरांची सर्व बाजूचा जास्तीत जास्त साक्षेप विचार मांडण्याची धारणी लक्षात येते, प्रभावी वाटते.

## जिनांचे कुशल डावपेच

दुसऱ्या महायुद्धाने ब्रिटिश साम्राज्य आर्थिकदृष्ट्या विकलांग होऊ लागले होते. साम्राज्याचा भार पेलणे अवघड जात असल्याने साम्राज्याचे विघटन होणे अपरिहार्य होते. महायुद्धानंतर मजूरपक्ष अधिकारावर आला आणि त्याच्या भारताविषयीच्या अनुकूल भूमिकेमुळे घटनात्मक पेच सोडविण्याचे अखेरचे प्रयत्न सुरू झाले. यातून त्रिमंत्री योजना उभी राहिली. अत्यंत गुंतागुंतीची आणि अनेक अन्वयार्थ असू शकणारी. ब्रिटिशांची भारतातून माघार हा फक्त काळाचा प्रश्न होता फाळणी टाळणे हा कॉंग्रेसचा पवित्रा, त्यासाठी केंद्रसत्ता प्रबळ हवी अशी तिची मागणी तर प्रांतांचे गट अधिक स्वायत्त व्हावे ही जिनांची आग्रही मागणी. हंगामी सरकारची रचना हाही वादाचा मुद्दा होताच. पंतप्रधान अॅटली यांची भूमिका उदारमतवादी तर निर्णायक महत्त्व असलेल्या ब्रिटिश नेत्यामध्ये व्हाइसरॉय वेव्हेल व अलेक्झांडर एका बाजूला तर क्रिप्स व लॉरेन्स दुसऱ्या बाजूला. एकाची भूमिका मुस्लिम लीगला अनुकूल तर दुसऱ्याची कॉंग्रेसला वेव्हेल यांची राजकीय कार्यशैली परिणामकारक ठरत नव्हती आणि त्याच्या प्रामाणिक प्रयत्नाना यश येत नव्हते. वेव्हेल याचा कॉंग्रेस पुढाऱ्यावर (गांधीसह) विश्वास बेताचा. वेव्हेल याची भारतातील पुढाऱ्याबद्दलची अजमावणी त्याच्या रोजनिशीवरून लक्षात येते. अॅटली वेव्हेल याच्या कार्यपद्धतीवर नाराज व असमाधानी होते अशा परिस्थितीत सत्तासंक्रमणाच्या काळात अधिक उदारमतवादी व कार्यकुशल नेतृत्व शोधण्याचा प्रयत्न झाला. त्यातून माउंटबॅटन यांची व्हाइसरॉय म्हणून निवड झाली ब्रिटिशसत्ता निश्चित कालमर्यादा देऊन संपुष्टात आणण्याचे जाहीर केल्यामुळे हिंदी राजकीय पक्ष वास्तव परिस्थितीचा विचार करू शकतील या भूमिकेतून कोणत्याही स्थितीत जून १९४८ पूर्वी सत्तांतर होईल अशी ऐतिहासिक घोषणा अॅटलीनी केली आणि या सत्तांतराचे स्वरूप ठरविण्याची अवघड कामगिरी माउंटबॅटन याचेकडे आली. माउंटबॅटन याचे व्यक्तित्व, त्याची उदारमतवादी वृत्ती, सर्वांना समजून घेण्याची शैली आणि प्रामाणिक प्रयत्नाची पराकाष्ठा यांमुळे आपल्या कार्यात ते यशस्वी होऊ शकले या सर्व घटनाचे वेधक वस्तुनिष्ठ वर्णन पुस्तकात आहे. फाळणी टाळण्याचे कॉंग्रेसनेत्यानी कसे अतोनात प्रयत्न केले आणि जिनांनी कुशल डावपेचानी ती भाग कशी पाडली याचे सविस्तर विवेचन आढळते. पाकिस्तानची मूळ कल्पना जिनांची नव्हे परंतु त्यानी ती निग्रहाने कशी प्रत्यक्षात आणली हे वाचले म्हणजे जिनांची मुत्सद्देगिरी लक्षात येते. या सर्व काळात बंगाल, बिहार आणि पंजाब प्रांतात होणाऱ्या भयानक जातीय दंग्यानी फाळणीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याची परिस्थिती निर्माण झाली. विशेष लक्षात येते ते हे की वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत यासारख्या करारी दृढ नेत्यानी फाळणी अपरिहार्य असल्याचे मान्य केले आणि महात्मा गांधींची संमती सर्वांत शेवटी आणि अत्यंत नाखुशीने आली. माउंटबॅटन यांनीही महात्मा गांधीबरोबरील चर्चेपेक्षा नेहरू, पटेल, आझाद, पंत यांच्याबरोबरील चर्चेला प्राधान्य दिले. यामुळे महात्मा गांधी हे फाळणीचे शिल्पकार या आक्षेपात तथ्य राहात नाही. कोणत्याही स्थितीत मुस्लिम प्रभुत्वाखालील राजवटीत न राहण्याचा आणि अशी राजवट आल्यास तिला प्राणपणाने विरोध करण्याचा निर्धार शीख नेत्यानी व्यक्त केला आणि त्यानीही फाळणीस जास्तीत जास्त विरोध केला. व्ही. पी. मेनन, कृष्णमेनन, व्ही. शंकर या दाक्षिणात्य राजनीतिज्ञानी सत्तांतराचे अंतिम स्वरूप ठरविण्यात महत्त्वाचा भाग घेतला. हिंदुमहासभा, कम्युनिस्ट, समाजवादी यांची एकंदर राजकीय निर्णयप्रक्रियेतील भूमिका नगण्य ठरली. वसाहतीचे स्वराज्य अपेक्षेपेक्षाही लवकर हाती आले आणि शेवटच्या काळात अॅटली-माउंटबॅटन यानी ज्या तऱ्हेने हे साधले त्यामुळे केवळ त्याचेच कौतुक झाले असे नव्हे तर राष्ट्रीय चळवळीत-विशेषत: चले जाव चळवळीत निर्माण झालेली कटुता निवळण्यात आणि भावी काळातील भारत–ब्रिटन याच्या सौहार्दाच्या संबंधाचा पाया रचण्यास मदत झाली भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व संपुष्टात आले.

लॉर्ड मिंटो याची जातीय मतदारसंघाना मान्यता देण्याची भूमिका शेवटी फाळणीस कारणीभूत ठरली. भारतमंत्री लॉर्ड मोर्ले याचा त्यास विरोध होता त्यानी तो विरोध आग्रहाने टिकवून जातीय मतदारसंघ टाळले असते तर फाळणी अपरिहार्य झाली असती का, त्याचप्रमाणे मुस्लिम–लीग व जिनाना अधिक अनुकूल भूमिका घेणाऱ्या वेव्हेल याना लवकर बदलून फाळणीस विरोध करणाऱ्या त्रिमंत्रियोजनेच्या सूत्रास प्राधान्य देण्याचे प्रयत्न झाले असते तर फाळणी टाळता आली असती का? या प्रश्नाना उत्तर देणे अवघड आहे. परंतु या प्रश्नाना अर्थ आहे निश्चित. ब्रिटिशानी जाताजाता जाणूनबुजून फाळणी केली हे नेहमी केले जाणारे विधान अतिशयोक्त असून आमच्यातले मतभेद मिटविण्यात आम्ही असमर्थ ठरतो आणि परकीयाना चंचुप्रवेशास साहाय्य करतो हे भारतीय

इतिहासाचे मूळ सूत्र सत्तांतराच्या बाबतीतही खरे करतो असे म्हणावे लागते.

### ब्रिटिशांची अगतिकता

'सत्तांतर' या नावाबद्दल मतभेद होण्याची शक्यता आहे. भारताचे स्वातंत्र्य भारतीयांनी क्रांतीच्या मार्गाने मिळविले असे म्हणता येणार नाही. आता जावेच लागणार आहे तर जाताजाता मोठेपणा मिळवून का जाऊ नये या भूमिकेतून शेवटच्या दोन-तीन वर्षांत ब्रिटिशांनी समन्वय, समझोता, विचारविनिमय यावर भर दिला. मजूरपक्षाची भूमिका त्यास कारणीभूत ठरली. ॲटली सत्तेवर असण्याऐवजी चर्चिल असते तर इतक्या लवकर ही प्रक्रिया पूर्ण झाली नसती. अंतिम प्रक्रिया ज्या तऱ्हेने घडली ते पाहता 'सत्तांतर' हे नामाभिधान अयोग्य वाटत नाही, परंतु तळवलकरांनी आपल्या सर्व विवेचनामध्ये ब्रिटिश दप्तरातील कागदपत्रांवर, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मुलाखती, वक्तव्ये यावर अधिक भर दिला आहे हे जाणवते. १८६१ पासून हळूहळू परंतु निश्चित सत्तासंक्रमण कसकसे झाले याचा आढावा अभ्यासपूर्ण आहे यात वाद नाही. संपूर्ण ग्रंथाच्या चौकटीमध्ये राष्ट्रीय चळवळ, सविनय कायदेभंग, बहिष्कार, सत्याग्रह यामुळे निर्माण झालेल्या दबावावर व त्यामुळे झालेल्या ब्रिटिशांच्या अगतिकतेवर आवश्यक तितका भर दिला गेला नाही. १८८५–१८९२, १८९२–१९०९, १९०९–१९१९, १९१९–३५, १९३५–४२, १९४२–४५–४७ या सत्तासंक्रमणाच्या प्रत्येक खंडात राष्ट्रीय चळवळीने वाढत्या उग्रतेने ब्रिटिशांवर दबाव आणला म्हणून हे तथाकथित 'सत्तांतर' झाले. अन्यथा विसाव्या शतकात भारत स्वतंत्र झाला नसता. फ्रेंच-पोर्तुगीजांपेक्षा ब्रिटिश शासक अधिक समंजस व उदारमतवादी असल्याने सत्तांतर 'शांततेच्या' मार्गाने झाले, या विधानात सत्यांश आहे. ब्रह्मदेश–श्रीलंका येथे राष्ट्रवादी चळवळीचा प्रभाव नसतानाही विघटनाच्या प्रक्रियेत ते सहज स्वतंत्र झाले, भारताचेही तसेच झाले असते असे म्हणून राष्ट्रीय चळवळीचे मोल कमी करणे इष्ट नाही. भारताचे भौगोलिक–नैसर्गिक–आर्थिक स्थान संपूर्ण जगात, ब्रिटिश साम्राज्यात इतके महत्त्वाचे आणि निर्णायक आहे का, ब्रह्मदेश–श्रीलंकेचे उदाहरण बरोबर नाही. दुसरे असे की, भारतातील क्रांतिकारकांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले असे म्हणणे धाष्ट्र्याचे ठरेल; परंतु महाराष्ट्र, बंगाल, पंजाब येथील क्रांतिकारकांनी आपल्या परीने ब्रिटिश साम्राज्याच्या पडझडीला हातभार लावला हे नाकारता येणार नाही. भारताच्या बाबतीत घडले ते सत्तांतर, क्रांती नव्हे हे मान्य केले तरी ग्रंथकाराने क्रांतिकारकांच्या कार्यास अपेक्षित न्याय दिला नाही असे म्हणावे लागते भारतात घडले ते सत्तांतरच आहे हे सिद्ध करण्यासाठी पुराव्यामागे पुरावे सादर करणाऱ्या तळवलकरांनी क्रांतिकारकांना दूरान्वयानेही उल्लेखिले नाही हे साधी सूची चाळली तरी लक्षात येईल. पुस्तकात शुद्धिपत्र असले तरी अद्यापही सनाच्या–तारखांच्या ढोबळ चुका अनेक आहेत, छपाईतील दोषांचा तो परिणाम आहे. असो.

गोविंदराव तळवलकरांनी पत्रकार असूनही एखाद्या अभ्यासू इतिहासकाराच्या दृष्टीने, तटस्थ भूमिकेतून ओघवत्या भाषेत लिहिलेले हे दोन खंड भारताच्या शंभर वर्षांच्या इतिहासातील अनेक शंकांचे निरसन करण्यास आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदारमतवादी भूमिकेस उजळा देण्यास निश्चितच कारणीभूत आहेत. □

सत्तांतर : १९४७. खंड–१
गोविंद तळवलकर
मौज प्रकाशन, मुंबई
पृष्ठसंख्या २९१ डेमी मूल्य : ५५ रुपये.
□

सत्तांतर : १९४७. खंड–२
गोविंद तळवलकर
मौज प्रकाशन, मुंबई
पृष्ठसंख्या . ३२२ डेमी. मूल्य . ६५ रुपये
□

रंगभूमी

# महत्त्वाकांक्षी कार्यक्रम घेऊन निर्माण झालेली 'प्रयोग थिएटर ॲकॅडमी'

वि. भा. देशपांडे

मुंबईच्या परिसरात हौशी-प्रायोगिक नाट्यसंस्थांचे उदंड जाळे पसरलेले आहे. दरवर्षी नव्याने काही संस्था निर्माण होतात, कालांतराने काही अस्तंगत कशा झाल्या ते ध्यानातही येत नाही त्यातून सातत्याने कार्यरत असणाऱ्या संस्था फारच अल्प; पण हे चक्र असेच चालू राहणार. जर संस्था अनेकार्थांनी जीर्ण झाली आणि ती संपली तर वाईट वाटण्याजोगे काही नाही. तसेच काही नव्या दमाच्या मंडळींना नव्याने संस्था काढून काही करावेसे वाटले तर त्यात वावगे काहीच नाही!

मालाडची 'प्रयोग' ही संस्था तशी अगदी नवीन नाही; पण त्यांनी 'प्रयोग थिएटर ॲकॅडमी, मुंबई' अशा नामकरणाने नव्याने आपले कार्य आरंभित केले आहे. ही एक स्वायत्त नाट्यसंस्था आहे. संस्था नव्याने काही करू इच्छित असली की, तिच्यासमोर अनेक स्वप्ने असतात, अनेक संकल्प असतात, तसे यांच्याही समोर आहेत. उदाहरणार्थ नाट्यशिक्षणशिबिरे आयोजित करणे, अभिनय आणि नाट्यस्पर्धांचे आयोजन, नाट्यसंदर्भ–ग्रंथालयाची निर्मिती, नाट्यविषयक चर्चा, परिसंवाद, लोककलांचे संवर्धन, बालरंगभूमी-प्रायोगिक रंगभूमी यांच्यासाठी रंगमंच उपलब्ध करून देणे, नि व्यावसायिक स्तरावर नाट्यनिर्मिती करणे इत्यादी.

सामान्यत. संस्थेच्या आरंभाला असे

संकल्प माडण्याची किंवा घोषित करण्याची पद्धती असतेच. यातले काही सकल्प नित्याचे असतात. शेवटी आपल्या सोयीपुरती नाट्य-निर्मिती करणे इतक्याच मर्यादित वर्तुळात ते कार्य फिरत राहते, पण या अॅकॅडमीच्या सदर्भात तसे घडणार नाही असे दिसते, याचे कारण त्यानी संस्थास्थापनेच्या संदर्भात अधिक व्यापक दृष्टिकोन ठेवलेला दिसतोय माझ्या दृष्टीने त्यामध्ये दोन–तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे नाट्य–संदर्भग्रंथालयाची निर्मिती ही अतिशय महत्त्वाची, मोलाची गोष्ट आहे नाटकाच्या पुस्तकाची यादी काही श्रमाने विशिष्ट ग्रथालयांत मिळू शकते; पण नव्या नाटकाचा पहिला प्रयोग कोठे, केव्हा झाला ? त्यातले कलाकार, तंत्रज्ञ आदी गोष्टीचा तपशील मिळण्याचे निश्चित ठिकाण आज हवे आहे. ज्या कोणा अभ्यासकाला नाट्यविषयक कोणताही संदर्भ हवा असला की, तो तत्परतेने मिळावयास हवा. आज अनेकजण निरनिराळ्या कारणानी नाटकाचा अभ्यास करू इच्छितात, त्याना अगदी प्राथमिक स्वरूपाचे संदर्भ मिळवायचे म्हणजे त्यासाठी कमालीची यातायात करावी लागते. ती कमी होण्यासाठी अशा संदर्भग्रंथालयाची नितात आवश्यकता आहे. याच सदर्भग्रथालयाचा फायदा जो कोणी पुढे रंगभूमी–इतिहास लिहील त्याला होऊ शकेल.

दुसरी गोष्ट म्हणजे लोककलाचे सवर्धन करण्याची योजना. ही योजना सदर्भ गोळा करण्यापेक्षाही अधिक गुतागुतीची आणि आव्हानात्मक आहे. असा प्रयत्न अगदी मोजक्या सस्थांनी आरंभित केलेला आहे; पण आणखी कार्याची जोड त्याला आवश्यक आहे. आता अनेक आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. विशेषत: ध्वनि आणि दृश्य एकत्रित करण्याची साधने उपलब्ध आहेत त्याचा उपयोग करून लोककलाचे जतन आणि संवर्धन करणे शक्य आहे. या सस्थेतल्या तरुण कार्यकर्त्यांनी जर मनावर घेतले तर निदान महाराष्ट्रातल्या विविध लोककलाचे ध्वनिमुद्रण, चित्रीकरण मोठ्या प्रमाणात करता येईल. हे ध्वनि–चित्रीकरण केवळ लोककलाचेच करून भागणार नाही तर नाट्यक्षेत्रातील कलावंताचे, त्यांच्या रंगमचीय कारकीर्दीचे विस्ताराने करायला हवे. गेल्या काही वर्षांत कित्येक कलावंत अकस्मात निधन पावले त्याच्यापैकी क्वचितच कोणाचे चित्रीकरण मोठ्या प्रमाणात उपलब्ध असेल ! एखादा कलावत असा अचानक गेला की, आपण हळहळतो, ते व्यर्थ असते. नाट्यकलेचे आणि लोककलेचे जतन–सवर्धन विशिष्ट कालखंडातील विकासक्रमाने व्हायला हवे. एक तर ते रंजनाच्या स्तरावर सामान्य रसिकाला आस्वादता यायला हवे आणि दुसरे म्हणजे अभ्यासकाना उपलब्ध व्हायला हवे !

तिसरी महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे प्रायोगिक, प्रबोधनपर, वैशिष्ट्यपूर्ण बहुचर्चित कलाकृतीसाठी रंगमंच उपलब्ध करणे अशा प्रकारचे वेगळे प्रयोग जेव्हा मुबई आणि पुणे या शहरी घडतात तेव्हा त्याना प्रयत्नाने रंगमच उपलब्ध होत असतो. प्रश्न आहे पुणे–मुबईबाहेरच्या कलावतासाठी तो उपलब्ध करून देण्याचा. आज परिस्थिती अशी आहे की, औरगाबाद, नगर, सोलापूर, सागली, नाशिक, वाई, कोल्हापूर, लातूर आदि ठिकाणी अनेक तरुण कलाकार आपापल्या ताकदीनुसार नवे प्रयोग करीत आहेत. त्याचे प्रयोग त्याच्या गावी जाऊन जेव्हा प्रत्यक्ष पाहण्याचा योग येतो तेव्हा नेहमी असे वाटते की, यातले चागले जे आहे ते पुणे–मुंबईपर्यंत जायला हवे. इच्छा असूनही ते शक्य नाही. कारण अनेक अडचणी उभ्या असतात. त्या कमी करण्यासाठी आणि या नव्या मंडळींना रगमंच उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तुत अॅकॅडेमीने सज्ज व्हायला हवे !

हे सारे संकल्प मार्गी लावायचे म्हणजे कलादृष्टी असलेले मनुष्यबळ हवे आणि मुख्य म्हणजे मोठ्या प्रमाणात आर्थिक बळही हवे. मी ही शका जेव्हा या अॅकॅडेमीच्या संदर्भात महत्त्वाचे काम करणाऱ्या भारत ताडेलला विचारली, तेव्हा तो म्हणाला, या दोन्ही बाबतीत आम्हाला अडचण नाही. काम करायला उत्साही माणसे भरपूर आहेत. तसेच आर्थिक बळही निर्माण करीत आहोत. ते ऐकून मला मनपूर्वक आनद झाला. कारण माणसे अनेकदा पैशापायी ओठगून राहतात, स्वप्ने ही स्वप्नेच राहतात. त्या पैशासाठी नको त्या मडळीकडे जाऊन नको ते समझोते करावे लागतात. तसे या अॅकॅडेमीच्या संदर्भात होणार नाही असे दिसते. होऊ नये अशी अपेक्षा आहे. म्हणूनच या मंडळीकडून कोणत्या प्रकारचे कार्य मूर्त स्वरूपात होते ते पाहण्याची उत्सुकता आहे. खरे तर या सस्थेने जे कार्य योजलेले आहे ते केवळ त्याचे नाही. ते व्यापक स्वरूपात साऱ्या रंगभूमीचे कार्य आहे. ज्याना ज्याना अशा कार्याविषयी आस्था असेल त्यानी स्वेच्छेने अगर निमत्रणानुसार आवर्जून जायला हवे त्यातून काही निश्चितच चांगले घडेल !

□

## पॅरिसमधील नाट्यसंस्थेचे पुण्यात फ्रेंच नाट्यप्रयोग

'इटर युरोप स्पेक्टॅकल्स' ही पॅरिसमधली एक नामवत नाट्यसस्था. ही सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे. या संस्थेने पुण्यात नुकतेच काही नाटिकाचे प्रयोग केले. अर्थात या साऱ्या नाटिका उपहासिका होत्या. ज्या देशात मोपलिअरसारखा थोर नाटककार जन्मला त्याच ठिकाणच्या नाटककाराच्या ( जॉर्जस् कोर्टलिन ) या उपहासिका. यातला सारा विरोध प्राधान्याने शब्दाधिष्ठित. शेवटच्या उपहासिकेत कृतीवर अधिक भर शब्दप्रधान नाटक असले की, ती भाषा अवगत असावीच लागते. त्यात विनोद कळण्यासाठी त्यातल्या छटा माहीत असाव्या लागतात. माझ्या शेजारी बसलेल्या गृहस्थाला मराठी–फ्रेंच दोन्ही येत होते; पण अशा समजूत घेण्याला मर्यादा असतातच. तशा त्या निर्माण झाल्या. त्यामुळे त्यावर फार विस्ताराने लिहिण्यात मतलब नाही; पण फ्रेंच नाट्यप्रयोग पाहण्याचा आनद मात्र मिळाला.



# ‘माणूस’ दिवाळीतला तेजस्वी अग्निबाण!

पुण्याहून त्रिवेंद्रमला निघतानाच न पाहिलेल्या डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि खरं तर बुधवार संध्याकाळचं रॉकेट लॉंचिंग बघण्याचे वेध लागले होते.

कंटाळवाण्या प्रवासात मधेच जाग येऊन बघते तर सगळीकडे नुस्ती हिरवळ आणि पाणीच ! आणि इकडे तिकडे चित्रकाराच्या सराईत कुंचल्यातून उतरावेत तसे नारळीच्या झाडांचे तिरपे–उभे आकर्षक फटकारे ! निसर्गानं तेव्हा जी खडखडून जाग आणली ती त्रिवेंद्रम येईपर्यंत. आता गाडी चक्क ‘ द ग्रेट ’ स्पेस सेंटरकडे ! . . . ‘ स्ट्रिक्टली प्रोहिबिटेड ’चा बार ओलांडून गाडी पुढे गेली तेव्हा मात्र आता काय बघायला मिळणार म्हणून सावरून बसले.

समोर आली सेंटरची भव्य, दिमाखात उभी असलेली नऊ मजली इमारत आणि सेंटरमधलं उत्साही प्रसन्न वातावरण.

गेल्या गेल्या सेंटरचे संचालक डॉ. गोवारीकर यांची ओळख होते. आता खरी कामाला सुरुवात... डोक्यात खूप प्रश्न आहेत.

सेंटरची सुरुवात कशी झाली ?

महत्त्वाचे टप्पे कोणते ?

या संशोधनप्रकल्पात काम करणाऱ्या व्यक्तींची प्रेरणा कोणती ?
आणि अर्थातच भविष्य ?

मनात एक ठरवून टाकते–खूप लोकांशी बोललं पाहिजे, थोड्या दिवसात जमेल तितकं पाहिलं पाहिजे. कामाची उत्साही सुरुवात डॉक्टरांच्या ओळखीपासूनच होते... झटपट मुलाखती ठरवल्या जातात, केव्हा काय पहायचं तेही ठरवलं जातं.

दुसऱ्या कार्यक्रमातला महत्त्वाचा भाग म्हणजे प्रत्यक्ष रॉकेट उडताना पाह्यचं ...
रात्री झोपेतही डोळ्यांसमोर राकेटच !

बुधवार . . . मुलाखतीमध्ये दुपारचे तीन कधी वाजले कळलंच नाही. आता लॉंचिंगचे वेध.

टर्लस्‌मधली संध्याकाळ. काटा पाचकडे झेपावतोय. रॉकेट लाँचरवर नाक वर करून तयारीत उभं आहे ... समोर उसळणारा समुद्र आणि किनाऱ्यावर उत्साहानं उसळणारी बघ्यांची थोडी गर्दी. अधिकाऱ्यांची सराईत झटपट हालचाल.

डॉ. गोवारीकर टर्लस्‌चे संचालक डॉ. राणेंची ओळख करून देतात. राणे उड्डाणाची माहिती सांगताहेत तोच काउंट डाउन 10–9–8– पुन्हा पुन्हा तपासणी . . फेरतपासणी
सगळ्यांची नजर लॉचरवरच्या रॉकेटवर एकवटलेली आणि 3–2–1
एक मोठा स्फोट .. धुराचे प्रचंड लोट .. वाळूचे विखुरलेले कण ... निमिषार्धात रॉकेट वर झेपावतं. बघ्यांचे उत्साही चीत्कार. आकाशात आणखी एक स्फोट ...

पहिला टप्पा गळून दुसरा टप्पा पुढे झेपावतो आहे, जणू काही सगळं अवकाशच त्याला कवेत घ्यायचं आहे.

आत्ता, माझ्यासमोर भारतीय बनावटीचं रॉकेट भारतीय भूमीवरून यशस्वीपणानं उडालं आहे.

इंटरनॅशनल स्पेसक्लबचा भारत सभासद आहे

अग्निबाण तंत्रज्ञानात स्वयंपूर्ण असणाऱ्या मोजक्या देशात माझा भारत आहे.

अशा भारताची मी नागरिक आहे याबद्दल मला अभिमान आहे.

डॉक्टरांना आता खूप प्रश्न विचारायचे आहेत .. या यशस्वी उड्डाणांची सुरुवात खरंच कुठे आहे ? वीस वर्षांची ही अखंड परिश्रमगाथा मला देशाच्या सगळ्या कोपऱ्यांत पोचवायची आहे.

**मेधा राजहंस**

# विक्रम साराभाई स्पेस सेंटर . . . त्रिवेंद्रम

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28


'मला नवल वाटतं की, ज्या आईपणापायी आयुष्यातल्या अनेक गोष्टी आणि व्यक्ती आणि अनुभव यांच्याकडे पाठ फिरवली, त्यापायीच त्या आईपणाचं सार्थक झालेल्या मुलांनीही माझ्याकडे पाठ फिरवली ! मी नसते या मुलींची आई तर माझं त्यांच्याशी छान सूत जमलं असतं– इतक्या खऱ्या आणि मानलेल्या भाच्यांशी जमतं तसं ! कधीकधी वाटतं, मी बापच व्हायला हवी होते आणि तो आई. त्याच्या स्वभावात आला मायाळूपणा; अपराध नुसता पोटात घालणारा नाही तर तो विसरूनच जाणारा मोठेपणा; स्वतःला हसत मुरड घालून त्यांची भर करणारा सहज उदारपणा; आणि माझ्या स्वभावात ? काटेकोर न्याय, तर्कशुद्ध विचारसरणी, नियमपालन, बेतशीर व्यवस्थितपणा यांची आवड; आवडच का हाव ? पण पडेल ते कसं तरी साजरं करावंच लागलं. अखेर आमच्या पिढीत तरी आईपणा आईने आणि बापपणा बापाने केला. मग त्याला आम्ही थोडी वळणे–वाकणे, पुस्त्या–अस्तरे जोडली, तरी पण मूलभूत भूमिकांत फरक खरे तर पडलाच नाही. आता बघायचे काय होते ते.'

□

आईपणा अनुभवण्याची उत्कट इच्छा असलेली
तरीही आईपणाच्या ओझ्याखाली गुदमरून मुलांना थोडं दूर ठेवणारी.
आणि रूढ आईपणापासून मुक्त होऊ पहाणारी
तरीही लांबच्या, जवळच्या, प्रेमळ उभ्या–आडव्या नात्यांच्या गुंत्यातून
हलकेच सुटू पाहणारी... 'ती'

□

एका प्रामाणिक व संवेदनशील स्त्रीचं अतिशय हळुवार चित्रण करणारी आणि रूढ नात्यांचाही अंतर्मुख होऊन पुन्हा पुन्हा विचार करायला लावणारी **गौरी देशपांडे** यांची वेधक कादंबरी.

# 'माणूस'
# दिवाळी अंकात